UNIVERSAL
LIBRARY
OU_192456
UNIVERSAL
LIBRARY

# पांढरे गुलाब

— लेखक —

**विश्वनाथ बी. वाणी बी. ए., बी. टी.**

शिक्षक एस्. ए. पी. हायस्कूल रावेर.

— प्रस्तावना लेखक —

**श्रीमंत सरदार राजे रामचंद्रराव रघुनाथराव देशमुख**

बी. ए, एल्. एल्. बी.

जुलै १९४१ ] **प्रथमावृत्ति** [ कि. एक रुपया

प्रकाशक:- **राममाऊ मोरे** मॅनेजिंग डायरेक्टर
**दि प्रकाशमाला लि० अमळनेर.**
मुद्रक- **वा. ल. कुळकर्णी**
प्रोप्रायटर- न्यू श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस जळगांव.

---



## काव्य किरण मालेचीं

### महाराष्ट्र शाहीर कै. कवि तिवारी कृत संग्राह्य पुस्तके

( संपादक व प्रकाशक:-**मि. का. मोरटके** जळगांव )

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **महाराणा प्रतापसिंह** | ऐतिहासिक खंड काव्य आवृत्ती २ री | किं. १० आणे |
| (२) | **मान्यांची यमुना** | सामाजिक खंड काव्य आवृत्ती २ री | किं. ७ आणे |
| (३) | **चंडी शतक** | चित्र काव्य संग्रह | किं. १२ आणे |
| (४) | **कविता वनिता** | वनिता विषयक सुंदर काव्य संग्रह | किं. ८ आणे |
| (५) | **कुमुद्वती** | स्फुट कविता | किं. ८ आणे |
| (६) | **अभंगमाला** | आवृत्ती दुसरी | किं. ७ आणे |
| (७) | **नंदिनी** | सचित्र खंड काव्य | किं. ८ आणे |
| (८) | **मराठी शिवराज भूषण** | अलंकारिक काव्यग्रंथ | किं. १॥ रु. |
| (९) | **मन्दाकिनी** | प्रेम व स्फूट गीतावली | किं ६ आणे |
| (१०) | **मराठ्यांचीं संग्रामगीते** | | किं. १। रु. |
| (११) | **झांशीची संग्राम देवता** | | किं. ८ आणे |

प्रस्तुत वाङ्मय काव्य रसिकांस आनंद देणार तर आहेच पण मराठी काव्याचा काळजी पूर्वक अभ्यास करणारास ते अत्यंत उपयुक्तही आहे.

---

पुस्तके मिळण्याचे ठिकाण:-**दि प्रकाशमाला लिमिटेड अमळनेर**

# -: अर्पण पत्रिका :-

माझे परमपूज्य परमप्रिय

परलोकवासी आई व वडील

यांच्या तीर्थरूप पवित्र चरणी

सप्रेम, सादर आणि सविनय

—समर्पण

लेखक

## प्रो बा रा. कोलटकर एम. ए., टी. डी. ( लंडन ), यांचा अभिप्राय.–

[ कोल्हापूर येथील बी टी कॉलेजमधील प्राध्यापक श्री. बा रा कोलटकर, एम्. ए., टी डी. ( लंडन ), यानी माझ्या 'पाढऱ्या गुलाबा' वर आपल्या चार ओळी अभिप्रायाप्रीत्यर्थ अत्यत जिव्हाळ्याच्या आपुलकीने मला दिल्यात, त्याबद्दल मी त्याचा सदैव ऋणीच राहीन. — लेखक ]

" आमच्या मध्यम ( Secondary ) विद्यालयातील शिक्षकाचे लक्ष वाङ्मयनिर्मितीकडे अधिकाधिक वळू लागले आहे, ह्या सर्वस्वी इष्ट घटनेचे ताजे प्रत्यतर म्हणजे रावेरचे श्री व्ही. बी. वाणी बी. ए., बी टी. याचा 'पांढरे गुलाब' हा लघुकथासग्रह होय. ह्यातील कोणत्याही कथेत कसलेही भयकर रहस्य. कूट वा मनोविश्लेषण नाही ही गोष्ट अनेक वाचकाना समाधानाचीच वाटेल. मध्यमवर्गांतील सुशिक्षित तरुणतरुणींच्या ठराविक वळणाच्याच या प्रेमकथा असल्या, तरी त्या सर्व निर्मल आल्हाद देणाऱ्या आहेत. अकृत्रिम भाषा, चटकदार सवाद नि विशुद्ध वातावरण या आपल्या गुणामुळे त्या कोणत्याही वाचकाचे घटकाभर सात्त्विक रंजन करतील अशी माझी खात्री आहे

श्री. वाणी याच्या सारख्या कुशल व सहृदय शिक्षकाने आपला व्यासग असाच चालू ठेवल्यास आपल्या वाङ्मयाचे हितच होईल "

टीचर्स कॉलेज, कोल्हापूर.
१४–७–४१ } बा. रा. कोलटकर

# दोन शब्द

श्री. व्ही. बी. वाणी बी. ए. बी. टी. यांच्या ‘ पांढरे गुलाब ’ या लघुकथा-संग्रहाला प्रस्तावनेदाखल दोन शब्द लिहिण्यास फार आनंद होत आहे.

हल्लीं मराठी-वाङमयाचे लघुकथा-युग सुरू आहे, असे म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. थोडक्या वेळांत वाचकाचे मनरंजन करण्याचें सामर्थ्य लघु-कथात असल्यामुळे, व मोठमोठ्या कादबऱ्या किंवा गंभीर स्वरूपाचे इतर ग्रंथ वाचण्याची फुरसत धीर व आवड असल्याचे भाग्य, आपल्यापैकी फारच थोड्यांच्या वाट्यास येत असल्यानें, हा वाङमय प्रकार बहुजन-समाजांत फारच लौकर लोकप्रिय झालेला आहे आणि यामुळे वाङमय- क्षेत्रात प्रथम पदार्पण करतांना, नवोदित लेखकाचें लक्ष या अभिनव प्रकाराकडे आकृष्ट होऊन, त्या मार्गानेंच वाङमयांत प्रवेश करण्याची त्यांची प्रवृत्ति होणें, साहजिक आहे.

श्री. वाणी याचा हा पहिलाच लघुकथा-संग्रह प्रसिद्ध होत असून, त्यात आठ कथांचा समावेश करण्यात आला आहे या सर्वच गोष्टींची भाषा अगदीं सोपी व सहजसुंदर असून, बहुतेक सर्व कथाचे विषयही नित्य-परिचयाचे व घरगुती असे आहेत. श्री. वाणी यांचा कल, केवळ कथानकाचा विशेष परिपोष करण्याकडे किंवा त्यात अद्भुतरम्यता उत्पन्न करण्याकडे नसून समाजात दृष्टीस पडणाऱ्या निरनिराळ्या व्यक्तींचे मनोविश्लेषण करून, त्यांच्या मनांत होत असलेलीं सूक्ष्म आंदोलनें चित्रित करण्याकडे आहे. असें त्याच्या या कथा वाचून वाटते. ‘ पांढरे गुलाब ’ व ‘ शेवटीं काय ? ’ या दोन गोष्टी, या दृष्टीनें वाचनीय आहेत. तसें खरोखरी कांहीं कारण नसतांना, केवळ कांहीं एका विशिष्ट परिस्थितीमुळें अतिशय प्रेमळ पतिपत्नींतही कांहीं वेळा कसा गैरसमज उत्पन्न होऊं शकतो व उत्पत्ती प्रमाणें त्याचा लयही कसा आपोआ-

पच होतो, हे लेखकानें ' पाढरे गुलाब ' या गोष्टींत फारच कुशलतेने दाखविलेले आहे, निसर्गदत्त स्त्रीस्वभावाला एखाद्या स्त्रीनें दाबून टेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी शेवटीं निसर्गच कसा प्रभावी ठरतो, हेही ' शेवटी काय ? ' या गोष्टींत उत्तम रीतीने विशद केलेले आहे, बाकीच्या गोष्टीतही, या प्रमाणेच निरनिराळ्या व्यक्तींचे मनोव्यापार परिस्थित्यनुरूप, कसे चाललेले असतात, ते दाखविले आहे

मजुराच्या आयुष्यक्रमावर व त्यांच्या सामाजिक जीवनावर ज्या एकदोन गोष्टी या सग्रहात आहेत, त्यामध्ये थोडा कृत्रिमपणा भासमान होतो, आणि असें होणे हें एका दृष्टीनें साहजिकच आहे. आपण नेहमी ज्या समाजात वावरतो, व ज्याच्या परिस्थितीचा सुखदु:खाचा, आशा - आकाक्षाचा आपल्याला प्रत्यक्ष अनुभव असतो, अशा समाजातील व्यक्तींच्या जीवन—क्रमावर व परस्पर- संबधावर त्याच समाजातील एकाद्या व्यक्तीने गोष्टी लिहिल्या तर त्या यथार्थदर्शी होणें स्वाभाविकच आहे, परतु, ज्याच्याशी आपला प्रत्यक्ष सबंध आलेला नाहीं अशा समाजातलि व्यक्तींचा आयुष्यक्रम व मनोव्यापार आपण चित्रित करूं लागलों,तर त्यात थोडा कृत्रिमपणा येणे अपरिहार्य आहे. असो

श्री वाणी यांचा हा पहिलाच लघुकथा—सग्रह प्रसिद्ध होत असला, तरी त्यांत त्यांच्या भावी यशाचीं बीजें जागोजाग वेखुरलेलीं आहेत. आपल्या पाढऱ्या गुलाबाच्या ताटव्यातील फक्त आठच फुलें काढून त्यांनीं सध्या वाचकाच्या पुढे सादर केलीं आहेत. परंतु. मला आशा वाटते कीं ते लौकरच आपल्या पांढऱ्या गुलाबांच्या एक मोठा गुच्छ तयार करून त्याच्या सौंदर्यानें व सुपरिमलानें, अखिल मराठी वाचकवर्गास आनदित करून सोडतील.

रावेर
ता. ५।७।१९४१ } राजे रामचंद्रराव रघुनाथराव देशमुख

# वाचण्यांपूर्वी

फावल्या वेळात लिहिलेल्या लघुकथांचा हा संग्रह मराठी वाचकापुढे सादर करतांना मला खरोखरच फार आनंद वाटतो. प्रस्तुत पुस्तकात सकलित केलेल्या लघुकथांपैकीं कांही आधींच 'ज्ञानमंदिर,' 'विहंगम,' 'साहित्यसग्रह' इत्यादि मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'लेखन तंत्र' या दृष्टीने माझ्या 'पांढरे गुलाब' कडे दृष्टिक्षेप केल्यास, ते कितपत सुंदर दिसतील, हें माझें मलाच सागता येणे कठीण आहे. मनाला वाटलें व हृदयाला पटले तेच मी लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे, अर्थात् तो कितपत साध्य झाला आहे, हें पाहण्याचें काम वाचकाचें आहे. वाङ्मयप्रांतात माझें हें पहिले पाऊल पडत असतांना वाचकाकडून योग्य ती सहानुभूति व उत्तेजन मला मिळेल अशी आशा बाळगणें चुकीचें होणार नाही असें वाटते.

पुस्तकाचें प्रकाशन कार्य माझे मित्र **रामभाऊ भोगे** यांनीं मित्रप्रेमाने व आपुलकीच्या भावनेने आपल्या शिरावर घेतलें, याबद्दल मी त्याचा अत्यत ऋणी आहे.

सदर पुस्तकाकरिता प्रस्तावनेदाखल स्वत:चे 'दोन शब्द' **श्रीमंत सरदार राजे भाऊसाहेब देशमुख** रावेर यांनीं, विनति करतांच, सहानुभुतिपूर्ण आपलेपणानें लिहून दिल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतों. त्याचप्रमाणें माझे बरेच मित्र, हितचिंतक व विद्यार्थी यानीं देखील या कामीं वेळोवेळीं मला जी मदत केली, ती बद्दल त्याचेही आभार मानताना मला साभिमान आनदच होत आहे.

रावेर पू. खा.
ता.५।७।४१

नोकरा शिवाय
सर्वांचा नम्र
— लेखक

# — अनुक्रमणिका —


| | | पान |
|---|---|---|
| (१) | दोन शब्द | ... |
| (२) | वाचण्यापूर्वी | .... |
| (३) | पांढरे गुलाब | १ |
| (४) | शेवटी काय ? | १९ |
| (५) | प्रेमपूर्ति | ४० |
| (६) | यांत चूक कुणाची ? | ५३ |
| (७) | अभागी प्रेम | ६७ |
| (८) | मजूर | ८५ |
| (९) | कर्तव्योत्तर प्रेम | ९२ |
| (१०) | दरिद्री लक्ष्मी | १०६ |

# पांढरे गुलाब : १

शीलेला पांढऱ्या गुलाबांची भारी आवड! एकदोन पांढरे गुलाब तिच्या हातात असले अगर वेणीवर खोंवलेले असले, ह्मणजे तिला केवढा मोठा आनंद होत असे!

अगदी लहानपणापासूनच आवड होती ही तिची. पांढरे गुलाब तिला हसायला अन् नाचायला लावत असत. त्याचा तो पांढरा तांबूस गहिरा रंग तिला नेहमींच मोठा मोहक वाटे इतर प्रकारचे गुलाब काय कमी होते बाबासाहेबांच्या --शीलेच्या वडिलांच्या- बागेंत ? पण पांढऱ्या गुलाबात त्या साऱ्यापेक्षा काहीतरी विशेष जादू भरली असल्यासारख शीलेला वाटे.

ह्मणूनच तिला पांढरे गुलाब जीव की प्राण वाटत.

* * * *

बाबासाहेबांच्या घरात घरची अशीं तनिच माणस. ते स्वत. अन् त्याची दोन मुल — शीला व विनू. त्याची पत्नी विनूच्या जन्मानंतर तीन वर्षांनींच निवर्तली होती, आणि या गोष्टीचा मात्र बाबासाहेबांच्या मन स्थितीवर मोठाच परिणाम झालेला होता. पुष्कळ वेळा ते स्वतःशींच खूप विचार करीत बसत आणि सचिंत होत. मनःस्वास्थ्याच्या अभावी त्याच्या शरीरप्रकृतीवरहि परिणाम होऊन, ते कितीतरी वेळां अन् कितीतरी दिवस सारखे आजारी असत.

शीला मात्र तशाहि परिस्थितींत त्याच चांगलंच रंजन करीत असे. भारीच खेळकरपणा भरला होता तिच्या अंगांत. तिचे आवडते पांढरे गुलाब तर अगदीं ऊत आणीत तिच्या या

आनंदी वृत्तीला. ती आपल्या या वृत्तीनं सबंध घर खेळायला लावीत असे आनंदानं.

आनंदी माणसच दुसऱ्यांनाही आनंदित करू शकतात, अन् त्यांतच त्याचाही आनंद असतो. शीला हसायला – खेळायला लागली म्हणजे बाबासाहेब आपलं सारं दुःख विसरून जात, विनू रडतांना हंसायला लागे आणि घरांतली नोकर माणसंदेखील आपल्या आवडत्या शीलाताईकडे कौतुकानं पहात पहात आनंदानं क्षणभर जागच्या जागींच थांबत.

शीला किती खेळकर, किती आनंदी अन् किती उल्हासी वाटे साऱ्यांना! ! फुलपाखरूच एक ! !

*           *           *           *

आज शीलेचा उल्हास कुठल्याकुठं मावळला होता. संध्याकाळची वेळ. ती आपल्या आवडत्या पांढऱ्या गुलाबाच्या ताटव्या जवळ येऊन उभी होती किती निस्तेज आणि विमनस्क दिसत होती ती यावेळी ! स्वत:शीच विचार करीत जवळच डोलणाऱ्या पांढऱ्या गुलाबाकडे शून्य दृष्टीनं पहात ती कितीतरी वेळ उभी होती. तिचा दोन वर्षांचा सुधीर जवळच एका कॉटवर पडला होता. त्याला झोप लागली होती आता. शीला मधूनमधून त्याच्या कपाळावरील मलमपट्टीकडे पहात होती, अधिकाधिक गंभीर होत होती ती

इतक्या गंभीर चेहऱ्यानं जणू कांहीं ती आपल्या साऱ्या आयुष्याचाच विचार करीत होती कीं काय असं कुणाही पाहणाराला वाटलं असतं.

हो खरंच, तिच्या डोळ्यांपुढून यावेळीं आपल्या बालपणा-पासून आत्तांपर्यंतची कित्तीतरी चित्रं फिरून जात होती.

वर सांगितल्याप्रमाणं स्वतःच्या रम्य अशा बालपणाचा चलच्चित्रपट तिच्या बावरलेल्या दृष्टीपुढून झर्रकन् निघून जायला फारसा वेळ लागला नाही

ती मनातच आपल्या आजच्या आयुष्याशीं – विवाहित आयुष्याशी -आपल्या बालपणच्या आयुष्याची तुलना करू लागली.

कित्ती वाईट वाटलं असेल तिला यावेळी !

अस का व्हावं ? तिला सुहासचा राग आला असेल का ? सुहासशीं लग्न करण्यात आपली चूक ··· छे, छ, शक्यच नाहीं सुहासचा विचार डोक्यात येताच तिला तो सुहासच्या पहिल्या भेटीचा – गोड प्रसग आठवला.

*　　*　　*　　*

बाबासाहेबाची प्रकृति नीट नसल्यामुळें ते शीला व विनू यासह हवापालट करण्याकरिता ह्मणून पुण्याहून कोल्हापूरला येऊन राहिले होते. राजारामपुरींत त्यानीं एक छानसा बगला भाड्यानं घेतला होता. शीला गेल्या जूनमध्येंच मॅट्रिकची परीक्षा पास झाली होती. बाबासाहेबांच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें कॉलेजमध्ये जायचं कीं नाही, हें अजून तिचं ठरलंच नसावं

कोल्हापूरला येऊन जवळ जवळ पंधरा वीस दिवस झाले होते. शीलेला येथें जरा चमत्कारिक व कधीं कधीं फारच बेचैन झाल्यासारख वाटे. कारण तसं क्षुल्लकच होतं म्हणा ऽ ऽ ! — तिनं विनूला सांगितलहि होत तें.

तिला येथें तिचे आवडते पांढरे गुलाब मिळत नसत. विकत घेणेंही तिला आवडत नसे. फुलासारख्या मंगलमोहक वस्तूची किंमत पैशानीं काय करायची असंच वाटत असाव तिला !

तिला आपल्या खिडकींतून जवळपासच्या लहान लहान बगिच्यात मधून मधून पांढरे गुलाब फुललेले दिसत असत. किती भुकेल्या दृष्टींनं पहात असे ती त्याच्याकडे ! घ्यावेतसे वाटून देखील भारी हताश होत असे ती.

एके दिवशीं सध्याकाळीं काय झाल कीं शीला आणि विनू फिरायला बाहेर पडले. टेबलाईकडे जात होते ते. शीला तिच्या नेहमींच्या उल्हासी वृत्तींत नव्हतीच. विनू घटकेंत तिच्याकडे, घटकेंत इकडेतिकडे, भिरभिरत्या दृष्टीन पहात आपल्या ताईबरोबर जात होता. एकदम मध्येंच थाबून दुरूनच – "ते बघ ताई, पांढरे गुलाब ! कित्ती सुदर अन् छान आहेत ग ऽ ऽ !" तो म्हणाला. पांढऱ्या गुलाबाकरिता ताईची किती तळमळ आहे, हें माहितच होत विनूला ! ! "हो खरोखरच" – शीला उत्तेजित होऊन म्हणाली. "मग मागायची कां तीं तुझ्याकरता त्या बाग-वानाकडून ?" गुलाबाच्या त्या रोपट्यापासून सुहास दहा बारा हातांवर उभा होता – त्याच्याकडे बोट दाखवून विनू म्हणाला.

"छट् ! वेडा कुठला ? अन् ते बागवान माळी का आहेत?"

"नसतील ! मी जातोंच अन् सागतो त्याना कीं आमच्या ताईला पांढर गुलाब फार फार आवडतात, अन् म्हणून थोडेसे....

"नको ह ऽ ! ते गुलाब आपले नव्हत. विनू ते आप-

त्याला कसे मिळतील ! " शीलेच्या या वाक्यांत सुंदर पांढरे गुलाब हाताच्या अंतरावर असूनही ते मिळण्याची असहायता पुरेपूर भरली होती

सुहासच्या कानावर त्यांचे शब्द पडत होते. तो गालांतल्या गालात हसत होता.

" ताई तो गृहस्थ काय दुष्ट आहे ग ऽऽ ! आपण त्याच्या फुलाविषयीं बोलू लागतांच पहा तो ते गुलाब किती पटपट तोडू लागला आहे ! जस कांहीं आपण त्याच्या गुलाबावर मोठा दरवडाच घालणार होतो ! " – गाल फुगवीत विनू म्हणाला.

सुहासला हंसू आवरेना. तो एकदम मोठ्यान हंसला, आणि शीलेकडे पाहू लागला. शीला अन् विनू यावेळीं त्यांच्या अगदीं समोरच आलीं होतीं. शीलेचही लक्ष त्याच्याकडे होतंच ! ती देखील किंचितशी हसली आणि खालीं पाहूं लागली. तिची चलबिचल सुहासच्या ध्यानात आल्यावाचून राहिली नाहीं.

त्यानं लगेच आपण तोडलेले गुलाब आपल्या निळसर हात-रुमालात बांधले आणि जरा लवकर लवकर जाऊन आपल्या बागेच्या फाटकाजवळ थोडेसे पुढें गेलेल्या शीला आणि विनू याना गाठलंच.

" हे घ्या पांढरे गुलाब. " शीलेपुढें हात करीत सुहास म्हणाला.

शीला सुहासकडे नुसतं पहायला लागली,

" हं आलं माझ्या लक्षांत ! मी आपल्या ओळखींचा नाहीं

हें खरं ! पण क्षमा करा ह. तुम्हाला पांढरे गुलाब फार आवडत असावेत या गोष्टीचा नुकताच मला शोध लागला आहे. मला काहीं इतकीशी त्याची आवड नाही तेव्हा योग्य अशा रसिकाकडू-नच त्याच रसग्रहण झाल्यास त्यात त्यांनाहीं अन त्याच्या मालकालाहि धन्यता वाटेल, नाही का ? "

" मी आपली फार आभारी आहे. पण ....

" ताई, आता कसला ' पण " अन् कसली ' आभारी ' अन् कसल काय ? घे तीं गुलाबाची फुल अन् चल पुढ" आत्ता-पर्यंत आ वासून दोघाच्याही तोंडाकडे आळीपाळीन पहात अस-लेल्या विनून लुडबूड केली.

सुहास आणि शीला दोघानीही सस्मित नजरेन एकमेकाकडे पाहिल.

" घ्या ना ऽ ऽ ! " सुहास पुन्हा आर्जवाने म्हणाला.

" पण आपल्या घरीं आणखी कुणाला ती लागत नाहींत वाटतं ? " -- डोळे मिचकावित शीलेन हा प्रश्न केला.

छे छे तसं काहीं नाही आ अजून . ! माझ्या घरात मी अगदीं एकटा आहे. दुर्दैवान मला कुणीच उरलं नाही घरचं असं वडील माणूस वगैरे. "

" ताई, चल की. किती वेळ थांबायचं इथ ? " आपल्या ताईला मोठाच लाभ होत आहे या आनदात विनू म्हणाला

" आणा हो ते गुलाब इकडे! मीच घेतों ते! ताई नाहीं घेत तर नाहीं !!! – " पण विनूच हें वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच शीलेनं

ते गुलाब हस्तगत केले होते.

"ताई, हे कित्ती चागले आहेत ग ! " सुहासकडे बोट दाखवीत विनू ह्मणाला, " मला वाटलं होत कीं ..."

" हे फार दुष्ट आहेत ह्मणून, असच कीं नाहीं ? "

सुहासन स्वत कडेच बोट दाखवून विनूच वाक्य पूर्ण केल.

" अहं, आता नाहीं तस ! तुह्मी आत्ता फार फार चागले आहात हो !! आमच्या ताईला रोज रोज हीं गुलाबाचींफुल द्याल?"

' हो हो अगदीं जरूर देईन पण तुह्मी रोज रोज माझ्या बगल्यावर याल ? "

" हो हो अगदी जरूर येऊं. " सुहासच्याच शद्वात विनून प्रत्युत्तर दिल.

शीला खुदूकन हसली. सुहासलाही हंसायला आलं.

" बर तर येतें आता थॅक्स ह ऽ ! " कृतज्ञतापूर्वक शीला ह्मणाली.

" ओ नो, तन काही नाहीं. माझ्या गुलाबाच भाग्य फार मोठंच समजल पाहिजे आतां मला ! "

" हरबऱ्याच झाड जवळच आहे वाटत ? असा प्रश्न सुहासला विचारण्याच शीलेच्या मनात आल होत — पण पहिल्याच भेटींत इतकी सलगी दाखविणं चांगलं नाही. या विचारांन ती थाबली असावी तिन नुसत हसल्यासारखं केल, आणि सुहासचे पुन्हा आभार मानून, जाण्याकारिता पाठ वळविली तोंच — " ओ ! हाऊ स्टेंज ! विसरलेच होतें कीं मी अगदी. क्षमा करा ह " चटकन सुहासकडे वळत ती ह्मणाली,

" आपल नांव ?

" सुहास " जरा घुटमळत सुहास उत्तरला.

त्याची प्रश्नार्थक दृष्टि लक्षात घेऊनच कीं काय शीला ह्मणाली " माझ नाव शीला "

" अन् माझं नाव विनू " विनूनही आपल घोडं मध्यें दामटलंच !

सुहास आणि शीला कितीतरी मोठ्यानं हसले विनू मात्र जरा चिडल्यासारखा झाला तो किलकिल्या नजरेन आपल्या ताईकडे पाहू लागला आणि शेवटीं तिला ह्मणाला " ताई, चलायच आहे कीं नाही ? का मी जाऊ ? "

" हो हो चल आतां. "

" बर आहे, तुमच्या या पांढऱ्या गुलाबाकरितां इथ रोज यायला कांहीं हरकत नाही ! " सुहास शीलेला हसत ह्मणाला.

शीलेन संमतिदर्शक नुसती मान हलविली.

" अच्छा ! गुड् नाइट् ! ! "

" गुड् नाइट् ! "

बराच वेळ झाल्यामुळें शीला व विनू झपाझप पावलं टाकीत घराकडे परतलीं.

कित्ती मधुर आठवण सुहासच्या पहिल्या भेटीची !

बाबासाहेबांचा मुक्काम कोल्हापूरला आणखी दोन अडीच महिने होता.

तेवढ्या अवधींत आपली सुहासशीं दाट मैत्री कशी झाली, तिचं रुपांतर एकमेकांच्या प्रेमात कसं झालं आणि शेवटीं आपण

# पांढरे गुलाब

विवाहबद्ध देखील कसे झालों या साऱ्या गोष्टींची गोड आठवण शीलेच्या तसल्या चिंताग्रस्त मनालाही थोडा वेळ का होईना पण गोडशा गुदगुल्या करून गेली. ती गालांतच हसली आणि तिनं आपल्या पांढऱ्या गुलाबाच्या त्या ताटव्याकडे मोठ्या अभिमानानं आणि कौतुकानं दृष्टी फेंकली. ' याच पांढऱ्या गुलाबांनीं तीन वर्षांपूर्वी सुहासला अन् मला एकत्र आणलं नाहीं का ? हो खरच!'

लगेच तिनं एकदोन फुलांवरून अत्यंत प्रेमळपणानं हात फिरविण्याचा प्रयत्न केला, पण त्या रोपट्यांचे कांटे तिच्या नाजूक हाताला बोचताच शीलेनं

" अयाई ग ऽ ऽ ! " केलं

ती पुन्हा पूर्ववत फार गंभीर झाली. आपल्या आयुष्यांतल्या बोचक प्रसंगांचीहि तिला पुन्हां आठवण होऊं लागली.

*　　*　　*　　*

'सुहासविषयींची आपली अपेक्षा चुकली का ? नाहीं ना ? मग मनांत हा एवढा गोंधळ कशासाठीं ? ' शीलेचं विचारचक्र सुरूच होतं.

शीलेच्या खेळकर आनंदी वृत्तींत विरजण घालणारे लहानसहान असे तीनचार प्रसंग तिच्या डोळ्यांपुढून सरायला लागले.

सुहासनं कितीतरी प्रसंगीं कित्ती अरसिकता दाखवून आपल्याला उधळून लावलं आहे याची विषारी जाणीव तिच्या मनाला फारच दाहक वाटत होती.

सुहासनं तरी असं का करावं ? तर म्हणे आपण आपल्या कामांत अत्यंत गर्क असतों आणि पुष्कळदां त्यामुळं शीलेच्या

सौंदर्यशोधक दृष्टीनं शोधून काढलेली सौंदर्यस्थळं आपल्याला तितक्याच रसिकतेनं पहाता येत नाहींत म्हणून. पुढे स्वतःच कामही पडलेले असतच

शीला मात्र भारी हिरमुसली होत असे अशावेळीं. तिला प्रत्येक क्षणीं वाटे सुहासनं आपल्याबरोबर भाग घ्यावा, आपल्या-प्रमाणं सदैव आनंदानं उल्हासानं हसत नाचत खेळत रहावं. विवाहापूर्वीच आणि सुहास आपल्या वकिलीच्या धंद्यात शिरण्या-पूर्वीच शीलेनं आपल्या कितीतरी गोड आशा हृदयाशी बाळगून ठेवल्या होत्या. पण सुहासवर स्वतःच्या धंद्याची जबाबदारी येऊन पडतांच शीलेला बऱ्याच प्रसंगीं निराश व्हावं लागे.

एक मोठा नावाजलेला वकील असा नावलौकिक सुहासनं किती थोड्या अवधींत संपादन केला होता! अन् त्यामुळंच त्याच्याकडे लोकांची नेहमीं ये जा सुरूच असे. आपल्या कुटुंबाच्या सौख्याकरिता शक्य तितकं झटणं हे देखील आपलं कर्तव्य आहे, त्यांत कुचराई दाखवणं म्हणजे आपल्यावरील एक नैतिक बंधन झुगारून देणं होय असे त्याला नेहमीं वाटे. आपल्या शीलेला आणि सुधीरला आनंदात ठेवणं हेंही आपलं तितकच पवित्र कर्तव्य आहे, या गोष्टीचीही त्याला जाणीव नव्हती असं मुळींच नव्हे. पण शीलेचा आनंदी खेळकरपणा कांहीं प्रसंगी त्याला अयोग्यस्थळीं अन् किंचित्सा मर्यादेबाहेरचा वाटे, आणि म्हणुन क्वचित् प्रसंगीं तो चिडतहि असे.

मनुष्यस्वभावच नाहीं कां तो?

पण शीलेला मात्र त्याचं विलक्षण वैषम्य वाटे.

शीलेचाही दोष नव्हता त्यात! बालपणापासूनच 'आपल्या मनाविरुद्ध गोष्ट' ही बातच तिला ठाऊक नव्हती. तेव्हा सुहासच्या तोंडून एखाद दुसरा शब्द जरा तिच्या मनाविरुद्ध पडताच तिला भारी वाईट वाटे, आणि म्हणुनच ती आपल्या मनाला कितीतरी यातना करून घेई.

सुहासला मात्र आपण मोठे भाग्यशाली आणि सुखी आहो अस नेहमींच वाटे. रहायला सुंदर छोटासा बंगला, समोर लहानशी हसरी बाग, शीलेसारखी खेळकर सुंदर प्रेमळ पत्नी, सुधीर सारख गोजिरवाण बालक, धद्यांत बसलेला चांगला जम इत्यादि गोष्टी त्याला मोठ्या भाग्याच्या वाटत, आणि म्हणून त्याला कशाचीही फिकीर वाटत नसे.

शीलेची आपण कांहीं वेळां निराशा करतो याचं त्याला वाईट वाटे, पण त्या गोष्टीला त्याचा तरी काय इलाज होता?

शीला मात्र आपल्या मनाला थोडा वेळ का होईना पण इतक लावून घेत असेल, याची मात्र त्याला इतकीशी चांगली कल्पना नसावी. कारण शीलेचं रुसणं फुगणं म्हणजे वळवाचा पाऊसच!! तो केव्हा येऊन केव्हां निघून जाईल याचा नेम नसे.

× × × ×

आजहि अशीच एक गोष्ट घडली होती. दुपारीं चार वाजतां चहा झाल्यानंतर थोड्याच वेळान शीला सुहासला म्हणाली "—आपण आता बागेत गुलाबाच्या ताटव्याजवळ जाऊन बसूं या का? आज

गुलाब किती छान फुललेले दिसतात ! अन् शिवाय आज पौर्णिमेच चांदणं मिळणार आहे थोड्याच वेळात !! "

" तू सुधीरला घेऊन जाऊन बैस मला अजून बराच वेळ आहे. माझं अजून बरचस काम पडलय ! "

" मग ते उद्या नाहीं का होणार ? "

" नाही, हीं केस अत्यंत घोटाळ्याची आहे " पाहिजे असलेले कागद पत्रं कारकुनाच्या हलगर्जीपणाने लवकर सापडत नसल्यामुळ जरा त्रासिक स्वरांतच सुहास बोलत होता. उलट सुहास आज जरा त्रस्त दिसताहेत, मोकळ्या हवेत बागेंत जाऊन बसल म्हणजे त्याना बर वाटेल आणि आपलाही वेळ मजेंत जाईल या हेतून शीला सुहासला बाहेर ओढण्याचा प्रयत्न करीत होती. ती गंभीर चेहरा करुन पुन्हा म्हणाली, " केस ? अन् घोटाळ्याची ? अग्गबाई " ? शीलेन आपल्या हनुवटीवर बोट टेवल.

" हो फारच 'कॉम्प्लिकेटेड्' आहे ती ! " शीलेकडे न पाहताच — सापडत नसलेले कागद धुंडाळीत सुहास शीलेशीं बोलत होता.

" 'बाईची' का 'बुवा'ची आहे हो ती केस " ?— शीलेन जरा खवचटपणानंच विचारल.

" एका बाईची ! "

" वकिलांकडे बायकाच्याच 'केसेस्' जास्ती येतात कां हो! "

" हो. कारण बायकाच जास्त भांडखोर आणि त्रासदायक असतात ! " निर्विकार चेहऱ्यानं सुहास म्हणाला.

" अस्स काऽऽय ? — हो खरंच, मलाही तुमच्याजवळ एक केस् द्यायची आहे ! "

सुहासकडून ' कोणती ' – वगैरे या प्रश्नाची वाट न पहातां तींच पुढे खट्याळपणान डोळे मिचकावीत म्हणाली – " इकडे बघा वकीलसाहेब, ती केस अशी आहे की – एक तरुणी आहे. तिच नाऽऽव, नाव काय बर तिचऽऽ – ह ह आठवलं – तिच नाव शीला – ती मॅट्रिक झालेली आहे तिच्या नवऱ्याच नाव सुहास. सुहास एक बडे वकील आहेत त्याना इतक इतक काम असतंऽ कीं स्वत च्या बायकोशीं ती कितीही आर्जवानं बोलत असली तरी त्याना बोलायला वेळ नसतो सध्याकाळची वेळ फिरायची असतांना देखील ते गृहस्थ आपल्या कागदपत्रातच पुष्कळ वेळां रमलेले असतात — निदान स्वतःच्या बायकोकरितां तरी . ........ "

सुहासने शीलेकडे नुसतं रोखून पहाताच तिन तें वाक्य अपूर्णच सोडल, आणि मोठ्यानं हसूं लागली.

सुहासची दृष्टि दुसरीकडे वळताच पुन्हा ती बोलूं लागली " भारीच विचित्र नाहीं का वाटत तुह्मांला ते ? तेव्हां त्या शीला–बाईंची अशी तक्रार आहे कीं कसही करून सरकारनं इतकं काम न करण्याची तिच्या सुहासला सक्त ताकीद द्यावी, आणि त्याउपरहि न ऐकल्यास

शीलेचं वाक्य अर्धवटच राहिलं.

बाहेरून ' धपकन् ' आवाज येऊन सुधीरचं किंचाळणं एकदम ऐकायला आल्यामुळं ती झर्कन् बाहेर पळाली. सुहासही

तिच्या मागोमाग गेला. या गडबडींत मधेच शाईची एक बाटली उपडी होऊन सुहासचीं दोनतीन महत्वाची टांचण खराब झालीं.

सुधीर आतापर्यंत बाहेर ओटीवर खेळत होता. चुकून पाय निसटल्यामुळ तो एकदम खालीं रेताडावरच आदळला. त्याला कपाळावर लहानशी जखम होऊन थोडस रक्तहि बाहेर आल होतं.

लगेच त्याला आत आणण्यात येऊन मलमपट्टी वगैरे बाधण्यांत आली.

सुहास मात्र जरा चिडल्यासारखाच झाला एकदर प्रकारामुळें. तो शीलेला उद्देशून म्हणाला " शीलाऽऽ! "

शीलेन नुसतं त्याच्याकडे पाहिल.

" तुझ्या कामाची एकदर रीत असते ती ही अशी! सुधीर बाहेर एकटाच आहे म्हणून मी मघापासून सागतेय, पण तू तुझ्या शीलाबाईंची केस मांडण्यातच गर्क होतीस नाऽऽ! ! जा, आतातरी त्याला जरा जवळ घेऊन खेळवशील का मोकळ्या हवेत आपल्या बागेत ? " तीव्रदृष्टीनें शीलेकडे पहात सुहास म्हणाला.

शीला बिचारी एक अक्षरही न बोलता सुधीरला आपल्याबरोबर घेऊन हताश अंत:करणानं जाऊन बसली आपल्या आवडत्या पांढऱ्या गुलाबाच्या ताटव्याजवळ. जवळच पडलेल्या दोनतीन कॉट्सपैकीं एकीवर तिन सुधीरला निजवल. पाचदहा मिनिटांतच त्याला झोप लागली.

शीलेच अंत करण व्यथित करायला आणि तिला अश्रु गाळावयास लावायला एवढसही कारण पुरेसं होत.

\+ \+ \+

म्हणूनच शीला आज संध्याकाळीं मागे सांगितल्याप्रमाणें आपल्या आवडत्या जागीं बागेत येऊन उभी होती. तिला तिचे फुललेले पाढरे गुलाब देखील आनंद देईनात. सुहासच्या थोड्या-वेळापूर्वीच्या बोलण्यानं तिच्या कोमल हृदयाला लहानशी का होईना पण जखम केली होती.

किती निराश झाल्यासारख वाटत होतं तिला - तिचं विचार-चक्र अर्थात् चालूच होत. आजपर्यंत अनुभवलेल्या सुखदु.खाची चित्र तिच्या डोळ्यापुढून भराभर सरकतच होती. ती कितीतरी वेळ तिथेच तशा स्थितीत उभी होती. जवळ सुधीर स्वस्थ झोपला होता.

आता चादणेही चकाकायला लागल होतं. सबध बाग जणू काहीं चांदण्यान भारून टाकल्यासारखी झाली होती. रहदारीची विशेषशी गडबड नसल्यामुळ बरंच शात वातावरण वाटत होतं तें.

शीलेला कुणाची तरी चाहूल लागली तिन चटकन् मागें वळून पाहिल.

“ शीलाऽऽ ! – ” सुहास जवळ येऊन शीलेचा हात आपल्या हातात घेत म्हणाला.

शीलेन खालीं मान घातली.

सुहासलादेखील पश्चात्ताप झाल्यासारखं वाटत असावं. ‘ शीला, मी तुला बोलला- थोडं टोचून बोललो- यांत माझी चूक झाली असेल कदाचित् - आणि त्याबद्दल तुझी क्षमा -- ”

“ नाहीं सुहास. ” सुहासनं आपली क्षमा मागावी, हे कससंच वाटलं तिला. सुहासच्या ‘ क्षमा ’ ह्या शद्बानं मोठाच परिणाम केला तिच्या हळुवार हृदयावर ! सुहास तिला फारच मोठ्या मनाचा वाटायला लागला नेवऱ्यांत आपलंच कुठंतरी चुकलं असं वाटायला लागलं तिला. एका क्षणात तिची मनःस्थिति बदलली! ती पुढें म्हणाली -, “ मी देखील इथं येऊन अशा स्थितींत केव्हांपासूनची उभी आहे- सुहास, यात माझीच चूक झाली असेल कदाचित् - ”

“ शीला चूक कोणाची होत नाहीं ? – दोष कुणात नाहीं ! - आयुष्यांत कितीतरी प्रसंग असे येत नाहींत कां की ज्यावेळीं आपणांला प्रत्यक्ष शत्रूशींहीं मिळतं घ्यावं लागत. आपण तर दोघं लग्नाच्या पवित्र ग्रंथीनं बद्ध झालों आहोत ! तेव्हां- ”

“ सुहास, मला राग नाहीं आला तुमचाऽ- ! ”

“ मग हे सारं इतकं कशासाठीं ? ”

“ आत्मपरीक्षणासाठीं ! ”

“ झालं मग तें ? ”

“ पण माझ्या मनाचा मोठा गोंधळ उडाला आहे यावेळीं. माझ्या मनोवृत्ति बावरल्या आहेत आणि त्याना लवकरच ताळ्यावर आणायचं काम- — —

" मी खात्रीनं करूं शकेन —" सुहासनं शीलेचं वाक्य अभिमानान पूर्ण केल

" नव्हे— जवळ जवळ केल आहे अस म्हणा आतां—" —सुहासच्या दृष्टीला दृष्टि भिडवत शीला म्हणाली

' शीला, मी सुखी आहे — मला या उभ्या जगात थोडंसंही दुःख आहे असं कधीच वाटत नाही. सुख-दुःख मनाच्या वाटून घेण्यावरच अवलंबून असत. आयुष्य आपणाला बनवीत नसून आपण आयुष्याला बनविणारे असतो असले प्रसग मागेही तीन चार येऊन गेले आहेत, हें मी विसरलो नाही. शीला, कर्तव्य कठोर असते. त्याकरितां आपल्या कितीतरी आवडत्या गोष्टींना पुष्कळ वेळा तिलाजली द्यावी लागते" शीलेच्या गालावरून टपकन दोन अश्रु ओघळले. तिच्या मनावर सुहासच्या म्हणण्याचा खात्रीनं चागलाच परिणाम झाला होता. सुहास म्हणाला—" नकोच तें. मी स्वस्थच बसतो. तुला अधिकच वाईट वाटतसं दिसतंय शीला माझ्या बोलण्यान तुझ्या मनाला यातना होताहेत, असंच की नाहीं?" वेडाच पाघरूण घेत सुहास बोलत होता

" नाही सुहास क्षमा करा मला माझच चुकल. त्यागांतच खर प्रेम आहे, याची कल्पना आज आली मला. मी आज काही नवीनच शिकले सुहास. बालपणापासून सदान् कदा हसत-खेळत नाचत राहिल्यामुळें मला जगाची दुसरी बाजू अजून नीटशी दिसलीच नव्हती जी दिसली ती फारच अंधुक होती सुहास, माझ्या अमर्यादित उल्हासी दृष्टीला !"

शीलेचा कंठ सद्गदित झाला होता. तिला जास्त बोलवेना.

" सुहास मला क्षमा करायची ना ऽ ऽ ! ! " आणखी जरा जवळ जाऊन सुहासच्या पांढऱ्याशुभ्र सदऱ्याच्या कॉलरशी चाळा करीत शीला म्हणाली

त्याच्या पांढऱ्या स्वच्छ सदऱ्यावरून शीलेची दृष्टि लगेच जवळच्याच पांढऱ्या गुलाबांवर गेली. ती लगेच हंसून म्हणाली— " बर का सुहास — या साऱ्या गोंधळाला कारण कोण आहे माहीत आहे- हे पहा, हे पांढरे गुलाब— " शीलेनं त्या पांढऱ्या गुलाबाकडे मोठ्या अभिमानानं बोट केलं आणि सुहास यावर काय म्हणतो हे पहाण्याकरिता–त्याच्याकडे ती रोखून पाहू लागली सुहासनं लगेच प्रत्युत्तर दिलंच !

त्यानं चटकन जवळचं पांढऱ्या गुलाबाचं एक सुंदरसं फूल तोडून ते शीलेच्या अंबाड्यात स्वतःच्या हातानं खोवलं ! — आणि म्हणाला, " भारीच लबाड आहेत हे, नाही ? "

सुहास अन् शीला दोघेही खुदकन् हसली. सुधीर देखील नेमका याच वेळी जागा होऊन हसायला लागला गुलाम ! इतक्यात वाऱ्याची गोड झुळूक आल्यामुळं फुललेले पांढरे गुलाब देखील डोलायला लागले. ते म्हणत असावेत– " इतकं सारं होऊन जाऊन आम्हीच लबाड का शेवटी ऽ ऽ ! ! वा ग्वासा न्याय आहे! प्रेमाच्या राज्यांत सारंच विचित्र असतं म्हणायचं ! ! ! "

# शेवटीं काय ? : २

" हें काय ग आई, येऊन जाऊन 'मुलींची जात' 'मुलींची जात' तुझं आपलं ? मुलींची जात म्हणजे काहीं माणसांत नव्हे, कीं मुलींना काहीं मनं नसतात, कां त्यांचा जन्म म्हणजे पुरुषाच्या गुलामगिरींतच जायचा असतो, काहीं कळत नाहीं बाई तुझी काय कल्पना आहे मुलींच्या जातीविषयीं ती ! "

" पुष्प—" इंदिराबाईंनीं आपल्या लेकीवर एक तीव्र कटाक्ष फेंकला.

" हं काऽऽय ? मुलींच्या जातीवर आणखी एकादा डोज् पाजायचा विचार आहे वाटतं मला ? बरं बाई, ऐकते बापडी. 'अथ कन्यापुराणम्ऽऽ—' हं कर कीं सुरवात ! "

" काय बाई जिभेला धार आहे तुझ्या ! पुष्पे, बाळ तुला एवढं तर कळतंय ना कीं आतां तुझं लग्नाचं वय आहे म्हणून ? "

" बरं मग ? लग्न करून पारतंत्र्यांतच रहायचं कीं नाहीं ? "

" हो कबूल आहे मला तें. पण त्यांतच खरं सुख आहे बाळ ! "

" मला नाहीं वाटत तसं. ही पुष्पा गुलामगिरीच्या खांचेत स्वत:ला लोटून घ्यायला कधींच तयार होणार नाहीं. तिला स्वतंत्र मन आहे. स्वतंत्र विचार आहेत आणि आपलं आयुष्य पूर्ण स्वातंत्र्यांतच घालविण्याचा तिचा अढळ निश्चय आहे. "

" तारुण्यांतलि उसळत्या रक्ताच्या जोरावर हें सारं तूं बोलते आहेस हें मला कळतं; पण एक दिवस असा येईल कीं.... पण जाऊं दे तें. तुला अनुभवानच कळलं पाहिजे सारं. "

" तें मी माझं पाहून घेईन. " पुष्पेनें जरा फणकाऱ्या-नेंच उत्तर दिलं.

" तें खरं बाळ, पण यात आपल्या घराण्याच्या इभ्रतीचा प्रश्न येतो असं नाहीं वाटत तुला ? "

" काय कारण तसं वाटण्याचं ? घराण्यांतील मुलींची लग्न झालीत म्हणजेच घराण्याची इभ्रत कायम रहाते, नाहींतर ती धुळीला मिळते, हें तुझं मोठं चमत्कारिकच म्हणण दिसतं बाई ! स्वत:च्या शीलाची किंमत प्रत्येकाला कळत असते; आणि त्यांतल्या त्यांत माझा जन्म एका कुलीन घराण्यांत झालेला आहे, या गोष्टीची मला पूर्ण जाणीव आहे. आई, तुला पुन्हां सांगते, कीं लग्न करून मी कुणाचीही गुलाम होणार नाहीं, नाहीं. नाहीं; आणि असं पहा........" इतक्यांत काकासाहेब

कोर्टांतून आल्याची गड्याकडून वर्दी मिळाली व इंदिराबाई पुष्पाच्या खोलींतून दिवाणखान्यांत जाण्याकरितां पसार झाल्या.

⁂ ⁂ ⁂

काकासाहेब इस्लामपूरकर हे मुंबईतील एक नावाजलेले वकील. इंदिराबाई त्याची पत्नि. विलास आणि पुष्पा एवढीं दोनच काय तीं त्यांचीं अपत्ये. विलास दोन वर्षांपूर्वीच विलायतेहून आय्. सी. एस्. होऊन आला होता आणि गेल्या वर्षीच त्याला कलेक्टरची जागा मिळाली होती. पुष्पा नुकतीच सिनिअर बी ए. च्या वर्गांत गेली होती. काकासाहेब आणि इंदिराबाई दोघेही पुष्पाच्या लग्नाकरितां आताशा अगदींच अधीर झाले होते. पण काकासाहेबाना पुष्पेचीं मतं माहीत असल्यामुळें, तिच्या लग्नाच्या बाबतींत तिला स्पष्ट विचारण्याच काम त्यांनीं आपल्या पत्नीवरच सोपविलं होतं. पण मुलींनीं या वयापर्यंत अविवाहित रहाणं इष्ट नाहीं हा इंदिराबाईचा मुद्दा, तर स्वतन्त्रवृत्तीच्या आयुष्यांतच खरं सुख आहे आणि तसलंच आयुष्य आपण घालविणार हा पुष्पेचा मुद्दा असल्यामुळं त्या दोघात गेल्या दोन वर्षांपासून मधून मधून वरील प्रकारचा खटका उडत असे. पण त्यांत विशेष गोष्ट ही कीं, तो खटका कोणत्याही उच्चांशाला पोहोचला तरी पुष्पेला त्याचं कांहीं वाटत नसे. सदैव आनंदी वृत्ति होती तिची. ‘कुचभी फिकीर नहीं’— हा पुष्पेच्या स्वभावांतील विशेष होता.

⁂ ⁂ ⁂

" कुणाचं पत्र ग—तें?" पुष्पेच्या मैत्रिणीनं मंदेनं विचारलं पुष्पेला.

" कांहीं ओळखत नाहीं बाई कुणाच आहे तें. असेल मेल्या एकाद्या रंगेल तरुणाचं; आजकाल तरुणांना प्रेमाशिवाय दुसरा विषय तरी आहे काय मंदे!"

" अगदीं आजीबाईचाच आव आणून बोलते आहेस कीं ग!"

" तसं नाहीं गऽऽ. पण अगदी चीड येते या असल्या या वात्रटांची. असं वाटतं कीं—

" हं हं ......पुरे. अहो बाईसाहेब, आधीं तें फोडून तर पहा आणि मग उडवा तोफा काय उडवावयाचा तो आधुनिक तरुणावर!"

" बरीच तरुणांचा कैवार घेणारी दिसतेस ग!" मिस्किलपणानं हसत पुष्पेन म्हटलं.

" इश्य, हें काय पुष्पे?"

" तुला नाहींच कळायचं तें! माझी कुक्कुबाळ ती! वेडाचं पांघरूण घेतल्यावर.... ..."

बोलत असतांना पुष्पेनं हळूच पत्र फोडलं होतं.......
" अगबाई! हें बघितलंस मंदे, हें त्या महेश गोखल्यांचं पत्र!"

" कोण ग हे गोखले ? ते आमच्या शेजारी रहातात तेच का ? "

" कुणास ठाऊक बाई ! गेल्या आठवड्यात या गृहस्थाला काकांनीं पहायला आणलं होतं मला "

" वा छान ! कांहीं पत्ताच लागू देत नाहीस आधीं कशाचा ! पण काय ग, तू तरी समोर गेलीस कशी त्यांच्या ? तू स्वतःला मोठी स्त्रीस्वातंत्र्याभिमानी म्हणवितेस, आणि मग हें झालं तरी कसं ? "

' काय करूं बाई ? मला कांहींही न सांगताच काकांनीं अगदीं अनपेक्षितरीतीनं आणलं त्यांना घरीं. मी साफ नाकारलं पहिल्यादा. शेवटीं निव्वळ आईच्या भिडेस्तव गेले बाई मी दिवाणखान्यात. पण काय सोळा आणे दोघांची हजेरी घेतली आहे म्हणतेस ! त्या वेळीं नाहीं नाहीं ती खरडपट्टी काढली काकांची आणि ते गोखले कीं खोखले होते त्यांची. आणि त्याच प्रसगाच गोखल्याकडून हें उत्तर दिसतंय या पत्रांत. "

बोलत असतांनाच पुष्पेचं मधून मधून पत्र वाचन चालूच होतं.

" पण पुष्पे, तूं काकासाहेबांना प्रत्यक्ष तुझ्या वडिलांना वाटेल तसं बोललीस हे काय शोभलं बाई तुला ? आणि गोखल्यासारख्या त्या परक्या गृहस्थाला देखील ....... ? खूप आहेस बाई तूं ! "

" मग कुणाच्या बापाची भीति आहे की काय मला ?"

" अग, कुणाच्या बापाची नसली तरी निदान स्वतःच्या बापाची ? "

या वेळीं पुष्पेची दृष्टी पत्रातील एका वाक्यावर स्थिरावली होती. म्हणून ती स्तब्धच राहिली.

" काय ग काहीं विशेष आहे वाटत ? " मंदेनं विचारलं.

" हे बघ मंदे, काय मेला एकाद्या ऑफिसराचा आव आणून लिहितोय ' त्या दिवसाच आपलं बोलण-वागण शोभलं असं वाटत आपल्याला ? "

" मग त्यांत काय मोठस नाकाला मिरच्या झोंबण्यासारखं लिहिलंय त्यांनीं ? "

' अस्सं होऽय ! अग जा ' हू केअर्स ? '"

लगेच पुष्पेन महेश गोखल्यानं अत्यंत सभ्येतन लिहिलेल्या पत्राला कराच्या टोपलीची जागा बहाल केली, आणि मंदेला घेऊन, हसतच बाहेर फिरायला म्हणून चालती झाली ती.

तिला कांहींच वाटलं नाहीं एकंदर प्रकाराच, मंदेला मात्र फार वाईट वाटल. फार विचित्र मुलगी वाटली पुष्पा तिला.

❋ ❋ ❋

आणखी एक वर्षानंतरची गोष्ट. काकासाहेब अत्यंत चिंताग्रस्त असे आपल्या दिवाणखान्यांत बसले होते. आपल्या

आवडत्या लेकीची व आपली-निव्वळ तिच्या हट्टामुळेंच-ताटा-तूट होणार, या विचारानं ते अगदीं बेचैन झाले होते. तित-क्यांत त्यांनीं बोलावल्याप्रमाणें पुष्पा येऊन तेथें हजर झाली.

"बाळ, तू काय हा हट्ट घेऊन बसली आहेस?" काका-साहेबांनीं पुष्पेला विचारलं.- प्रश्न केला

"यांत हट्ट तो कसला काका? मी चांगली बी. ए. झालें आहे-अंगांत नवीन रक्ताचा जोम आहे शिवाय मला लग्न करायचं नाहीं हे मी कधींपासूनच सांगत आलें आहे. प्रत्येक बाबतींत स्वतंत्रतेचं आयुष्य असावं असं फार फार वाटतं मला आणि म्हणूनच-—

"इथं या घरांत तूं पारतंत्र्यांत का आहेस?"

"तसं नाहीं काका. पण आतां स्वतःच्या पायावर उभे राहण्याची माझ्यामध्यें शक्ति आली असतां मी काय म्हणून माझं ओझं अजूनही तुमच्यावर...."

"काय बोलतेस हें पुष्पे? तुझं ओझं? आणि तें माझ्यासारख्या श्रीमंत माणसाला? किती खुळी कल्पना! बाळ, तुला कल्पना नाहीं माझ्या पुढल्या बेतांची! तुझा विलासदादा आतां बडा ऑफिसर आहे. आज त्याला तसं पाहिलं असतां माझ्या एका पैची देखील गरज नाहीं. इतकंच काय पण त्यानं आपल्या मोठ्या मनानं माझी सर्व संपत्ति जरूर पडल्यास

तुलाच देऊन टाकावी असं मला स्पष्ट लेखी कळविलं आहे. असं असतांना–"

" क्षमा करा काका दुसऱ्यांनीं माझ्याकरितां कांहींहिं केलेलं खपत नाहीं मला. माझ्याकरिता कोणी कांहींच केलं नाहीं किंवा करीत नाहीं असं माझं म्हणणं नाहीं. जन्मल्या-पासून तुम्हींच मोठ्या प्रेमानं माझा सांभाळ केलात.ते तुमचे उप-कार आहेतच की माझ्या डोक्यावर ! हो खरंच काका, आणखी एक गोष्ट सांगूं कां तुम्हांला ? येथील ' मुलींच्या शाळेंत ' शिक्षकीण म्हणून पुढल्या आठवड्यापासून मी काम पत्करणार आहे हें मी परवांच सांगितलंय तुम्हांला. आणखी किनई काका, आपण माझ्या शिक्षणाकरितां वगैरे जी कांहीं रक्कम खर्च केली आहे, ती हळू हळू कां होईना पण परत करण्याचा विचार आहे माझा. "

" पुष्पे, काय बोलते आहेस हें ? तुला हें बोलवतं तरी कसं याचंच आश्चर्य वाटतं मला. "

" काका, हें पुष्पा बोलत नसून नव्या युगांतील स्वतंत्र व्यक्तित्वाची आकांक्षा बाळगणारी एक तरुणी बोलत आहे, यांत काय तें समजा. "

" अस्सं ? पण हे इतकं स्वतंत्र व्यक्तित्वाचं वेड शिरलं कुठून तुझ्या डोक्यांत ? "

“ परिस्थितीनं केलंय तें सारं, काका ! आपल्या समाजांतील स्त्रियांची गुलामगिरी पाहून पुरुषांविरुद्ध बंड पुकारावं असं वाटायला लागत मला. बालविधवांची दुःखं डोळ्या पुढें उभी राहताच, माझं हृदय हादरायला लागतं. कोंवळ्या पोरींना म्हाताऱ्याच्या गळ्यांत अडकलेल्या पाहून समाजांत होत असलेला हा अन्याय दडपून टाकण्याकरितां काय करूं न् काय नाही या विचारानं अगदीं सुचेनासं होतं मला. आणि या साऱ्या अडचणींतून निभावून जाण्याचा सुरक्षित असा माझ्यापुरता एकच मार्ग दिसतो मला. आणि तो म्हणजे ‘ स्वतंत्र जीवन. ’ यावर बोलण्याकरितां काकासाहेबांचो हालचाल झालोच. पण तितक्यांत पुष्पेबरोबर फिरायला जाण्याकरितां म्हणून मंदा आल्यामुळें, पुष्पा हंसतच मंदेबरोबर बंगल्याबाहेर पडली.

* * *

“ स्वतंत्र जीवना ’ ची भोक्ती म्हणून-काकासाहेबांचा रोष सहन करूनही पुष्पेनं आज स्वतःच निराळं ‘ स्वतंत्र ’ बिऱ्हाड थाटलं होतं. तिची काम करण्याची हातोटी व निसर्गतःच अंगी असलेली हुषारी पाहून तिला एकदम ‘ कन्याशाळेंतील ’ ‘ हेडमिस्ट्रेस ’ ची जागा मिळाली होती. आपल्या ऑफिसांत बसून सहज क्रॉनिकलचा अंक चाळत असतांना तिची दृष्टी फक्त एकाच बातमीवर स्थिर झाली होती.

एका तरुणीनं आपला पति थोड्याच वेळांत मरणार असं पाहून स्वतःवरच पिस्तुलाची गोळी झाडून घेऊन, पतीच्या स्वागताची तयारी करण्याकरितां आधींच स्वर्गाची वाट धरली होती' पुष्पेनं ती बातमी एकदां, दोनदां तीनदां वाचली, व स्वतःशीच ती तीव्र विचार करीत बसली होती . "पुरुषां-करितां स्त्रियांनीं स्वतःचे प्राण अर्पण करावेत, असे पुरुष त्यांच्याकरितां करतात तरी काय? पोटाला अन्न देऊन वस्त्रं पुरवितात एवढंच ना? तेवढं स्त्रीला स्वतःच्या कर्तबगारीवर कां करतां येऊं नये? पुरुषाची वाटेल तसली बोलणीं ऐकत, प्रसंगीं लाथाबुक्क्या खात-स्वाभिमानाची होळी होत असलेली प्रत्यक्ष डोळ्यांना दिसत असूनही पुरुषाचीं सर्व कामं निमूटपणें आमच्या स्त्रियांना करावीं लागतात, व तीं करावयाला यांची विशेष कुरकूर अशी कधींच दिसून येत नाहीं काय आहे काहीं समजत नाहीं गौडबंगाल याच्या मुळाशीं! आमच्या स्त्रिया इतक्या कां बुद्धीहीन असतात कीं त्यांना त्यांचीं गुलामगिरी, त्याची परवशता- दिसूच नये? मानवी प्रेम किंवा मानवी सहानुभूति ती हींच असतील कां?'

इतक्यांत समोरच तिचं लक्ष गेलं. एका पक्षाचं पिलूं झाडावरील आपल्या घरट्यांतून धाडदिशीं जमिनीवर आदळलं व गतप्राण झालं. त्याची आई-पक्षीण-तेथेच असावी. ती एकदम

चिव् चिव करीत आपल्या पिलाजवळ गेली. तिच्या चोचींत एक दोन वा याचे दाणे असावेत, ते त्या पिलाच्या तोंडात घालण्याचा ती प्रयत्न करीत होती. दाणे पोटांत गेल्याबरोबर आपलं बाळ पूर्ववत होईल ही त्या बिचारीची वेडीच आशा नव्हती का? प्रेम आंधळं असत. आपलं बाळ दुसऱ्या जगाच्या वाटेला लागल हे तिच्या लक्षात यायला फारसा वेळ लागला नाहीं. आपऱ्याच भाषेत ती आपला आक्रोश व्यक्त करीत होती " पुष्पा- ' बाई ' ना वाईट वाटायला लागलं होतं हा एकंदर प्रकार पाहून, आपले नेत्र किंचितसे ओले झाल्याचाही भास झाला त्यांना. इतक्यांत—

' बाई, मी घरीं जाऊं का? " लीला नांवाच्या एका अकरा वर्षांच्या विद्यार्थिनीनं विचारलं.

" का ग? '

" परवापासून माझा धाकटा भाऊ आजारी आहे घरीं. "

" मग तू काय करणार आहेस मोठंसं घरीं जाऊन? तुझ्यावांचून काय अडलंय आत्तांच तिथं. "

" अं, कांहीं नाहीं. ' लीलेच्या डोळ्यांत चट्कन पाणी आलं आणि ती स्फुंदावयाला देखील लागली. '

" रडायला ग काय झालं असं? जा बाळ, वर्गांत जाऊन बैस आपल्या "

" बाई, माझं आज लक्षच नाहीं लागत वर्गात. घरीं केव्हां एकदाची जाईन आणि केव्हा जाऊन बसेन माझ्या भावाजवळ अस झालंय मला. "

" बरं आज जा. पण नेहमी नेहमीं विचारायच नाहीं हं अं ? "

लीला बिचारा केविलवाण्या नजरेने तिच्या ' बाई ' कडे पहात निघाली ती थेट आपल्या घराकडे.

फार अस्वस्थ झाली पुष्पा आता. क्रॉनिकलमध्यें वाचलेली बातमी, आपल्या पिलाच्या मृत्युमुळे त्या पाक्षिणीची झालेली स्थिति आणि लहानग्या लीलेची आपल्या धाकट्या भावाविषयीं दिसून येणारी काळजी, इत्यादि गोष्टी एक समयावच्छेदेंकरून तिच्या डोळ्यापुढून सरकल्यामुळं विचाराचा मोठा कल्लोळ उडाला तिच्या मनांत. ' मला बरं नाहीं आज ' अस आपल्या असिस्टंटला सांगून निघाली ती आपल्या घरीं जायला.

❋ ❋ ❋

" मंदे– ' क्षीण आवाजांत पुष्पेनें हाक मारली आपल्या मैत्रिणीला.

" काय ग ऽ ? हे पहा, आतां डोळे मिटून स्वस्थ पडून रहायचं गडे. थोड्या वेळातच काका, आई वगैरे मंडळी येतील इथ. "

' इतकी का माझी स्थिति काळजी करण्यासारखी आहे? किरकोळ माडीवरची जखम....आणि.... '

" तसं नाहीं ग ! पण तू मोटार-अपघातात सांपडलीस व तुला डॉ. गोखल्याच्या दवाखान्यांत आणण्यांत आलं आहे हे देखील नको वाटतं त्यांना कळवायला ? अरे वा , ही पहा सारी मंडळी इकडेच आली हे बघ पुष्पे, काका, आई वगैरे इथ आहेत तोच एकदा घरून जाऊन येते मी शशिकांत रडत असेल माझा घरी. त्याला सभाळण्याकरिता एक बाई आहे घरीं, पण मला चैन नाहीं पडायच माझ्या लाडक्याला एकदां तरी भेटून आल्यावांचून, थोड्या वेळानें आले हं ! "

*** *** ***

" काय डॉक्टर साहेब कशी काय प्रकृति आहे आमच्या पुष्पेची ? " काकासाहेबांनीं पुष्पेजवळ बसत डॉ. गोखल्याना विचारलं.

इदिराबाईनी अगदीं अधाशीपणानं आधींच डॉक्टर काय म्हणतील याचा विचारही न करता, पुष्पेच्या उशाजवळच आपली जागा पटकावून तिला प्रेमानं कुरवाळण्यास सुरवात केली होती. डोळ्यांत अश्रु चमकत होते त्यांच्या.

' काळजी करण्यासारखं कांऽऽहीं नाहीं त्यांत ' डॉक्टर साहेब आत्मविश्वासानं म्हणाले.

" बरं झाल डॉक्टर, तुम्ही ऐनवेळीं त्याच स्थळीं भेटलात आणि तेहि मोटारसिह ! आमच सुदैवच समजायचं एकूण ! "

" योगायोगाच्या गोष्टी असतात काकासाहेब, या ! पुष्पाबाईसारख्याची अल्प प्रमाणात का होईना—पण सेवा करण्याची मला संधि मिळाली, यातच मोठ भाग्य समजतो मी माझं. '

" अपघात मोठ्या चमत्कारिकच रितीनं झाला. नाहीं? '

" हो. खर पाहिलं असता पुष्पाबाईंचीच चूक होती त्यांत. ' आपण आपल्या विचारातच गर्क होतो आणि मोटारीचा हॉर्न इतक्या वेळां वाजला असूनही आपल्याला ऐकूं आला नाहीं—आला असला तरी त्याकडे लक्ष देण्याइतकी आपली मनःस्थिति नव्हती मोटारीच्या मार्गापासून अलग होण्याऐवजीं उलट आपण एखाद्या माथेफिरूप्रमाणें तिच्या मार्गांतच गेलों. ड्रायव्हरनं वाचविण्याचा कमालीचा प्रयत्न केला, त्यात त्यांचा कांहीं दोष नाहीं, उलट त्याच्या कौशल्यानच थोडक्यावरच निभावल—' इत्यादि गोष्टी स्वतः पुष्पाबाईच कबूल करतात. माझी मोटार मागेंच होती. पुष्पाबाई ओळखीच्या — केव्हांतरी पाहिल्यासारख्या वाटल्यामुळच त्यांना मोटारींत घालून— त्या माझ्या नतलगापैकीं आहेत असं जमलेल्या लोकांना व पोलि-

सांना सांगून शुश्रुषेकरिता आणलं मी त्यांना माझ्या दवाखान्यांत. कदाचित् कुणाला यात अतिप्रसंग वाटेल आणि म्हणूनच—"

" छे हो ! यत कसला अतिप्रसंग ? हे तुमचे उपकार आम्हांला कसे फेडतां येतील ते येओत ! "

" यांत कसले उपकार काकासाहेब ! माझं कर्तव्य होतं तें मी केलं. "

" आपला हा विनय आहे डॉक्टर साहेब ! बरं पण आमच्या पुष्पेला घरीं न्यायला परवानगी देतां कां आज ? "

" छे छे ! मांडीवरील जखम. ती जरा किरकोळ स्वरूपाची असली तरी कमींत कमी आणखी चारपांच दिवस पुष्पाबाईंना इथंच ठेवलं पाहिजे आपण. "

" बर जशी आपली मर्जी ! "— असं म्हणत, काकासाहेब उठले व खिशांतून शंभराची एक नोट काढून त्यांनीं डॉक्टर साहेबांपुढें ठेवली—पुष्पेचं लक्ष होतच तिकडे. आपल्याकरितां काकासाहेबांनीं असं करूं नये — आपण स्वतःच तें करावं, ही तिची इच्छा. पण ' ते मागाहून पहातां येईल, उगाच डॉक्टरसाहेबांपुढें कांहीं नको, ' या पोक्त विचारानं ती स्तब्धच राहिली. डॉक्टर साहेबांनीं चटकन् ती उचलून काकासाहेबांच्या परत हातांत कोंबली. ' पारितोषक—मोबदला कोणत्याहि प्रकारानं कांहीं घेण्याची इच्छा नाहीं' अस अगदीं सौजन्य-

पूर्वक सांगितलं त्यांनीं काकासाहेबांना. कां कुणास ठाऊक पण काकासाहेबांजवळून कांहीं घ्यावं असं वाटेचना त्याना. त्यांच्याही मागें खर्च हा होताच! त्याच्या दवाखान्यावर ' मोफत दवाखाना ' अशी कांहीं फळी टांगली गेली नव्हती. त्यांनीं जें केलें ते कदाचित् त्यांनीं, आपल्या पुष्पेकडाल आकर्षणामुळें.... डॉक्टर साहेबांच्या मनाचा मोठेपणा ओळखून, काकासाहेबानींही विशेषसा आग्रह धरला नाहीं त्या बाबतींत. डॉ. गोखल्यांचे मन:पूर्वक आभार मानून, पुष्पेची जखम पुन्हां एकदां पाहून व तिचा निरोप घेऊन, कामाच्या तातडीमुळं काकासाहेब चालते झाले.

डॉक्टरसाहेबाहि आपल्या ऑफिसांत आनंदी मुद्रेनं निघून गेले.

पुष्पा पूर्ण दुरुस्त होईपर्यंत आपल्याला तिच्या जवळच राहूं द्यावं म्हणून इंदिराबाईंनीं डॉक्टरांकडून आधींच परवानगी काढून ठेवली होती, व त्यानीं आपला बेत आपल्या पतिराजांना अगोदरच सांगून टाकला होता व त्यांचेकडून संमति देखील मिळविली होती. जन्मदात्रीचीच माया ती!

मंदा बऱ्याच वेळानं आली आणि लगेच जाण्यास उठली देखील. तिचा चेहरा बराच खिन्न दिसत होता.

“ काय ग काय झालं? आज बरं नाहीं कां तुला? ” पुष्पेनं हटकलंच मंदेला.

" आज तिकडच्यांना किंचितसा ताप आला आहे, तेव्हां जाते बाई. क्षमा कर हं पुष्पे ! उद्यां येईन आणखीन. "

मद्रा तिच्या 'तिकड'च्याकरितां, पुष्पेच्या उत्तराची वाट न पहातां झपाट्यानें चालती झाली.

पुष्पा घरीं एकटीच विचार करीत बसली होती....
" माझं कुठतरी चुकतं आहे खास. माझ्या बाण्याप्रमाणं काकांचा एवढा बंगला सोडून, मी या लहानशा घरांत स्वतंत्र रीतीनें रहाते आहे आज मी स्वत:करिता स्वत च पैसा मिळवितें आहे, इतकंच काय पण काकांनीं माझ्याकरितां खर्च केलेली रक्कम त्यांच्या इच्छेविरुद्ध—त्यांचा राग सहन करूनही मी एकदा त्यांचेजवळ बोलून गेल्याप्रमाणें परत करण्यास हळूहळू सुरवातहि केली आहे आणि तसं करण्यांतच मला एकप्रकारचा आनंदहि वाटत असतो. माझ्या मनाप्रमाणं वागण्यास आज मी पूर्ण स्वतंत्र आहे. तसं पाहिल असतां एखाद्या नाचण्या—बागडणाऱ्या आनंदी फुलपाखरासारखं जीवन आहे माझं; पण अजून देखील त्यात कसली तरी न्यूनता वाटते खास आणि त्याच कमतरतेची—त्याच अपुरेपणाची—दोन दिवसापासून सारखी हुरहूर लागून राहिली आहे जीवाला माझ्या. शाळेंत काम करणं देखील सुचत नाहीं मला नीट, गेल्या आठवड्यांत पाहिलेली

चित्रंच पुन: पुन: डोळ्यांपुढं फिरतात माझ्या...... .चिमुकली शीला! पण तिला देखिल वर्गांत न बसता आपल्या लहानशा भावाकरितां घरीं पळावंस वाटतं! घरीं मुलाला सांभाळण्याकरिता बाई असूनसुद्धां आपल्या पोटच्या गोळ्याला एकदां तरी भेटल्या-वांचून मंदेला चैन पडत नाहीं, तिच्या ‘तिकड’च्याना थोडासा ताप येतांच ती खिन्न—गोरीमोरी होते आणि माझ्यासारख्या तिच्या जिवलग मैत्रिणीशीं—आणि ती देखील आजारी असता! —फारसं न बोलतां तडक घरीं चालती होते! दूर कशाला, माझ्या आईचीच गोष्ट... बिचारी चार पांच दिवस साऽरखी बसून असे माझ्याजवळ दवाखान्यांत! मी लहान कां होते? बिचारी लहानशी पक्षीण, पण तिचं बाळ तिला सोडून जातांच किती हळहळते ती! किती शोकाकुल होते! दुसऱ्याकरितां हळहळण्यांतच, दुसऱ्याकरितां देह झिजविण्यातच, दुसऱ्याला स्वत:ला वाहून घेण्यांतच कांहीं अनुपमेय सुख असतं कां? हो असंच असावं, हे एक गूढ आहे आणि या गूढांतच कांहींतरी आयुष्याचं संगीत भरलेलं आहे खास. याच संगी-ताच्या आधारावर सबंध जग झुलत असावं—हसत असावं—नाचत असावं! माझ्या आयुष्यात मला हे संगीत ऐकायला मिळतं का? मिळत? नाहीं. मग ते केव्हा आणि कसं मिळणार? हें काय? हा कुठला संदेश मला? माझ्या हृदया-चाच, काय म्हणतं तें? ‘आत्मार्पण कर’ आत्मार्पण कर!

खरं आहे. पण कुणाला 'आत्मार्पण' करूं मी? माझ्या अंत:सृष्टींत बघूं का एकदां? हो अस्संच करावं अगबाई, इथं तर जिकडे तिकडे डॉक्टर महेश गोखलेच दिसायला लागलेत मला! महेश गोखले! किती उदार मनाचे! किती जिवापाड परिश्रम केले त्यानीं माझ्याकरितां गेल्या आठवड्यांत! बर, त्याकरितां कांहो मोबदला? त्याला तर ते नुसते शिवलेदेखील नाहींत. हेच गोखले मला एकदां पहायला आले होते नाहीं का! त्यावेळीं मी त्यांची किती किती निर्भर्त्सना केली पण एका शब्दानेंही त्यानीं त्या बाबतींत काहीं बोलून दाखविलं नाहीं कधीं! ते क्षमा करतील का मला? त्यांना एक पत्रच लिहावं म्हणजे झालं.

लगेच पुष्पेनं एक कोरं पाकीट घेतलं आणि त्यावर आधीं पत्ता लिहूं लागली....'डॉक्टर महेश गोखले, एम. बी. बी. एस.' लिहितांनाच त्या शब्दांचा तिला न कळतच उच्चार झाला मोठ्यानं तिच्या तोंडून. इतक्यांत मंदा खोलींत दिसतांच 'पेन' एकदम बाजूला ठेवलीं तिनं. 'डॉक्टर महेश गोखले एम. बी बी. एस.' हे पुष्पेच्या तोंडून निघालेले शब्द स्पष्टच ऐकिले होते तिनं. पुष्पेचा डॉ. गोखल्यांशीं झालेला परिचय,– इंदिराबाईच्या समोरही या दोघाचं तासचे तास सारखं बोलत बसणं, एकमेकांची थट्टामस्करी करणं या गोष्टी मंदेच्या लक्षांत आल्या-

वाचून राहिल्या नव्हत्या; पण पुष्पेच्या 'स्वतंत्र जीवनाची' कल्पना मनांत येतांच तिला जरा मागेंपुढे पहावें लागे त्या बाबतींत पुष्पेला स्पष्ट काय तें विचारण्याकरितां. पण आतां तिची खात्रीच झाली.

'काय पुष्पाताई, काय विचार चालला आहे?'

'हं सहज आपला—'

'हा आपला' कोण आला आहे आज नवीन? डॉक्टर महेश गोखले वाटत? शेवटीं 'आपला' म्हटलंस तर कुणाला तरी!'

'मंदे—पुष्पेनं जीभ चावली. पण तिचा चेहरा खुलून आल्यावाचून राहिला नाहीं. मंदे, आज कशाचीतरी कमतरता भासते माझ्या जीवनांत.'

'हं, लवकरच भरून निघेल ती! पण काय बाईसाहेब, आपला स्वाभिमान, स्वतंत्र विचार, स्वतंत्र जीवन, हीं पळालींत कुठं सारीं आतां? माझ्या लग्नाच्या वेळीं तर मोठीं नावं ठेवलींत मला आपण!'

'मंदे क्षमा कर— तू कांहींही म्हण— पण मी आज पराभूत झालें आहे. या पुष्पेनं आपणहून आपली मालकी दुसऱ्या कुणाकडे तरी दिल्यावाचून तिला आनंदाचे सुंदर गुलाब फुललेले तिच्या आयुष्यात दिसणार नाहींत. आतांपर्यंत आनंदो-

पभोग मी घेतला— आजही घेत आहे.— पण तो सारा आभास आहेसं वाटतं त्या आभासाला सत्य सुंदर स्वरूप देणारा जादूगार——

‘ तो पहा इकडेच येत आहे. बघितलंस कां नीट ? ’

‘ अगबाईऽऽ ! ते तर डॉक्टर महेश गोखले ! आणि ते सरळ माझ्याच खोलीकडे येत असल्याचे दिसतात !

‘ ओ हो ! कायपण चेहरा खुलून आला आहे बाई-साहेबांचा ! प्रेमाचं शास्त्र असच असतं बरं कां पुष्पे ! समोरून येत असलेलं माणूस ‘ जादूगार ’ असलं तरी पण त्याला चांगलंच जाळ्यांत अडकवलं पाहिजे अं ! ’

‘ काकासाहेबाना निरोप द्यायला जाते मग मी आतां ! जाऊंना ? ...वुइश् यू गुड् लक्........ ’

मिस्किलपणान हसत हंसत मंदा बाहेर पडली.

“ अग किती वात्रट आहेस गऽऽमंदे !”

डॉक्टर महेश गोखल्यांनीं पुष्पेच्या खोलींत पाय ठेवण्या-पूर्वीच मंदा कुठल्या कुठं पसार झाली होती....

पुष्पेन ‘ शेवटीं काय ’ केलं, हाच प्रश्न तिच्या मनात आतां घोळत असेल.

# प्रेमपूर्ति : ३

भर वेगात असलेली ‘ पूना-एक्सप्रेस ’ एकदम एक भलीमोठी कर्कश शीळ देऊन थांबली. पुढील एक दोन डब्यात त्यांतल्यात्यात एंजिनमध्यें बरीच ओरड झाली भराभर लोक खाली उतरले आणि एंजिनपाशींच पळत गेले. मागाहून गार्डसाहेब देखील आपल्या हिरव्या तांबड्या निशाणांचे लटाबर घेऊन पळतच गेले एंजिनकडे. तेथे एका नीटनेटका पोशाख केलेल्या तरुणाभोवती सारी गर्दी झाली होती. किंचितसें दचकल्यासारखे होऊन ‘हें आता काय होत होतें ’ या कल्पनेने स्वत:शींच आश्चर्य करीत व गालां-तल्यागालांत हंसत तो तरुण धीटपणानें तेथें उभा होता. त्याच्या एका हातांत जाड कागदाचे एक पुडके व दुसऱ्या हातांत बारीक टोंक असलेली एक पेन्सिल होती. ‘ क्या हुवा ’ ‘ क्या हुवा ’ करीत गार्डसाहेब गर्दीतून मार्ग काढीत त्या तरुणाजवळ .. ... ...

“ माय गॉड ! मधुकर गुप्ते !– आणि इथं कसा ? ”

आश्चर्यातिरेकानें तोंड आ वासून गार्डसाहेब आपल्या मित्रा-कडे— त्या तरुणाकडे— मधुकर गुप्तेकडे–पहावयास लागले.

मधुकर हंसायला लागला.

लोकांना वाटले, तो कोणीतरी वेडा असावा. हो; वेडाच होता तो ! त्याला एक विलक्षण वेड होतें. प्रत्येक मनुष्य आपापल्यापरीनें ‘ वेडा ’ च असतो, नाहीं का ?

“ काय राजश्री आज कांहीं जीव वगैरे द्यायचा विचार होता कीं काय इथं ? ”

गार्डानें मधुकरला थट्टेच्या स्वरांत पृच्छा केली.

" छे ! तस नाहीं हो ! त्याच अस झाल की मी . .

" चला, आपण माझ्या डब्यातच बसू या " साहेब म्हणाले.

तावडतोब आपापल्या डब्यात शिरण्याविषयीं जमलेल्या लोकाना गार्डसाहेबानीं ओरडून हुकूम केला नतर त्यानी मधुकरचा हात धरून आपल्या डब्यात नेले. गार्डानें शिटी देऊन आपला मार्ग आक्रमायला सुरवात केली

मधूकरनें बोलायला सुरवात केली . 'नशिब माझ साहेब, की आज आपणच या गाडीवर सापडलात नाहीतर माझ्या अब्रूचे अगदी धिडवडे निघाले असते नाही ? पहिल्याने मला त्याबद्दल आपले आभार "

" ते राहू द्या. पण हे अस का केलत तुम्ही आज ? "

" त्याला कारण माझ चित्रकलेच वेड ! समोरच्या निसर्ग-सुदरीच चित्र काढण्यात मी इतका तल्लीन झालो होतो की, मला गाडीचं मुळींच भान नव्हतं. बरं, यावाचून चागलीशीं जागा सापडेना मला बसायला ! माझ्या कामाकरिता अगदी प्राणावरच बेतली होती आज ! "

" शाबास! वा रे चित्रकार!– अन् वा रे कलेच वेड ! "

गार्डसाहेब व मधुकर हसायला लागले.

\+ + +

का कुणास ठाऊक पण पुढच्याच स्टेशनवर, निर्मला ज्या डब्यांत बसली होती त्या डब्यात मधुकर जाऊन बसला. त्याच्या

सौंदर्योपासक दृष्टीला निर्मला म्हणजे एक निराळेच खाद्य मिळाले पुन्हा!

गाडीनें स्टेशन सोडले. मधुकरनें आपल्या पुडक्यांतून जाड कागद बाहेर काढला व केली सुरवात त्यावर इकडून तिकडे आपली पेन्सिल फिरवायला जणू काय तो आत्तांच्या अपघाताची गोष्ट अ-गदीं विसरूनच गेला होता!

डब्यांतील बहुतेक लोकाचे लक्ष त्याच्यावरच वेधले होतें. कारण थोड्या वेळांपूर्वी होत असलेल्या अपघाताचा विषय तोच असून, त्याच एका विषयावर आत्तां पर्यंत बहुतेकांची चर्चा सुरू होती. आतां तो स्वत:च्या डब्यात येऊन बसल्यानतर मग काय वि-चारायला पाहिजे! तो येतांबरोबर त्याच्याकडे मधून मधून पाहून सर्वांची आपापसांत कुजबूज सुरू झाली. त्याच्यावर सर्वांचे डोळे अशा प्रकारे खिळून रहायला आणखी एक कारण होते आणि ते म्हणजे तो दिसायला बराचसा देखणा होता. तो एक कलावंत आहे ही गोष्ट त्याच्या रुबाबदार पोषाखाच्या सफाईदारपणावरून कोणालाही सहज कळून येण्यासारखी होती. आपल्यावर साऱ्या डब्याची दृष्टि खिळून बसली आहे याची कल्पनाही नव्हती त्याला

त्याची स्वत:ची दृष्टि मात्र एकाच एक व्यक्तीवर स्थिरावली होती आणि ती व्यक्ति म्हणजे– ' निर्मला '' निर्मलेच्या नैसर्गिक सौंदर्यानें एक प्रकारची मोहनी घातली होती त्याच्या मनावर. ती खिडकींतून बाहेर पहात होती. तिला मधुकरविषयीं कांहींच कुतूहल वाटत नसेल असें मुळींच नाहीं. ती मधून मधून त्याचेकडे दृष्टि-क्षेप करीतच होती. त्याच्याकडे पहाण्याचा मोह तिला खरें पाहिले

असता जवळ जवळ अनावर असाच होता. पण स्वतःच्या मनावर लोकलज्जेमुळे नियंत्रण घालणे तिला भाग होतें.

एकाद्या तरुणीने एकाद्या तरुणाकडे अशा रीतीनें सारखें टक लावून पहात बसणे कसेसेच होय. या विचारानें तिनें स्वतःच्या मनाला मोठ्या कष्टाने लगाम घातला होता त्यावेळी. मधुकराचा मोहक– करारी चेहरा तिला पुनःपुन पहावासा वाटे.

पुणें स्टेशन येईपर्यंत मधुकर आपल्याच कामांत गुग होता. आपल्याचकडे तो आत्तांपर्यंत पहात असून कागदावर पेन्सिलीनें काय करतो आहे याची निर्मलेला नीटशी कल्पना होईना. तिला रागही आला असेल थोडा! स्टेशनवर गाडी थांबली. निर्मला खाली उतरली मधुकर अजून डब्यांतच भ्रमिष्टा सारखा इकडे तिकडे पहात बसला होता.

" काय मधुकरराव, आणखी कुठ गाडीच्या रुळावर जाऊन बसण्याचा विचार चालला आहे वाटत ?" गार्डसाहेब डब्याजवळ येऊन हसतच ह्मणाले.

" ओ नो! आय् ॲम् नॉट सो स्टुपिड " – मधुकरनें हसत हसत उत्तर दिलें.

त्यानें एका कागदाची गुडाळी केली अन् तिच्याकडे अभिमानानें पहात डब्याच्या खाली तो उतरला.

" अरे वा! ही काय भानगड बुवा पुन्हां ! हें आणखी कांही नवीनच दिसतंय!" साहेब उद्गारले.

" ही आजची आमची बहुमोल कमाई आहे मिस्टर!"

मधुकर मोठ्यानें हंसला, गार्डसाहेबाशीं आणखी इकडच्या तिकडच्या थोड्या गप्पा मारून आणि त्याचे पुन्हा एकवार आभार मानून तो स्टेशनच्या बाहेर पडला.

*  *  *  *

त्या तरुणाचे नाव 'मधुकर' आहे, हें डब्यांतील लोकांच्या बोलण्यावरून निर्मलेला कळलें होते. पाच सहा दिवसपर्यंत तिच्या डोक्यात मधुकराचाच विषय सारखा घोळत होता ' मधुकरनें आत्महत्येचा प्रयत्न केला असेल का ? – केला असल्यास तो त्यानें कशाकरिता करावा ? त्यानें डब्यांत आपल्याचकडे सारखें निरखून इतक्या वेळपर्यंत का पहावे ? – त्याला शिष्टाचार ह्मणून काही नसतील का – अगदी पुणे येईपर्यंत त्यानें कागद पेन्सिल व रबर यातच डोके का खुपसून ठेवावे ? – दोन तीन सद्गृहस्थानी डब्यात त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करूनही त्यानें त्याकडे नुसतें हं हं ' ह्मणण्यापलीकडे विशेषसे लक्ष का देउ नये, तो इथला पुण्याचाच राहणारा असेल का ? -- असला तर तो इथ काय करीत असेल ? '-- एक ना दोन – शेकडों प्रश्नाचा गोंधळ माजून राहिला होता निर्मलेच्या मनांत.

पुढेंपुढें तर मधुकराची आठवण होऊन त्याची मूर्ति तिच्या डोळ्यापुढें उभी राहिली नाही असा तिचा एकही दिवस जाईनासा झाला. त्याच्या डब्यांतील वागणुकीवरून – किंवा एकंदर प्रकारावरून जरी तो तिला विचित्र वाटत होता तरीपण त्याच्या आठवण प्रसंगीं तिला एकप्रकारचा अज्ञात आनंद होत असे खास !

आणखी एक महिन्यानतरची गोष्ट !

निर्मला व तिचा वसंत दादा ( तिचा वडील भाऊ ) सहज पुण्यास भरलेल्या प्रदर्शनातून निरनिराळ्या गोष्टी पहात फिरत होते. निर्मला किंचित्‌शी मागे राहिली होती वसत आता चित्रांच्या दालनांत शिरला होता. एका चित्राजवळ येतांच त्याला भान न राहून तो—' ओ व्हाट् अॅन् एक्सेलंट ब्यूटी ! ' ह्मणून ओरडला. " निमाताई, 'कम् ऑन् – कम् ऑन ' ही पहा काय मजा आहे ती ! "

निर्मला चपळाईने गेली तेथे. तिची दृष्टी त्या चित्रावर एकदम स्थिर झाली. तिचा चेहरा गभीर झाला.

" निर्मलाताई एक गोष्ट सागू तुला ?

निर्मलेनें फक्त ' हू ' ह्मणून म्हटलें. ती चित्र निरिक्षणात अत्यत मग्न झाली होती

' हे बघ निमाताई .. .... अग इकडे बघतेस कीं नाहीं ? फक्त पातळाचाच रग निराळा. या चित्रातल्या रगाचं पातळ तुला नेसवावं आणि या चित्राच्याच शेजारीं तुला बसवावं ह्मणजे इथं दोन निर्मलाताई झाल्या ! "

यावर निर्मला कांहीं बोलली नाहीं. हा अगदीं हुबेहूब आपलाच फोटो आहे हें तिच्या तावडतोब लक्षात आलें.

" आणि हें बघ – ताई, पहिलं बक्षीस आहे या चित्राला पहिलं ऽ ऽ ! आहेस कुठ ? "

चित्राच्याच कोपऱ्यांत चित्रकाराचे नाव ' मधुकर गुप्ते,

अगदी बारीक अक्षरांत लिहिलें होतें, तें निर्मलेनें ताबडतोब वाचलें. ती स्वतः यावेळी कॉलेजच्या पहिल्या वर्गांत होती. कॉलेजच्या विषयात तिचें मन फारसें रमत नसे. आतांशा ती कॉलेज सोडण्याच्या विचारात होती. तिला चित्रकलेचा विलक्षण नाद. कॉलेज सोडून एखाद्या उत्कृष्ट चित्रकाराजवळ ही आपली कला वाढवावी असे तिला फार फार वाटे. एक दोनदां तिनें आपला हा विचार वसंत दादाजवळ बोलूनही दाखविला होता, पण त्यानें त्याकडे लक्ष दिलें नाही.

चित्रकाराची नावें त्याच्या चित्रातच कुठे कशी बेमालूम दडून बसलेली असतात हें निर्मलेच्या चांगल्या परिचयाचें असल्यामुळे तिला चित्रातील 'मधुकर गुप्ते' हें नाव ताबडतोब सापडलें. वसंताला मात्र त्याचा पत्ता लागला नाही.

' चल ताई, आता घरीं परत जाऊ या ! का ? नाहीं मोह आवरत त्या चित्राचा ? अग आहे काय त्यात एवढ ?— जर तें चित्र तुला इतक पहावेंसच वाटत असल, तर आपल्या घरीं तो मोठा आरसा आहे ना ऽ त्याच्यापुढं तूं जाऊन बसायच म्हणजे झालं — अगदीं अगदीं हेंच चित्र समोर ! " वसंत हसत म्हणाला.

निर्मलेनें वसंताकडे तीक्ष्ण नजरेनें पाहिलें.

निर्मला आणि वसंत आपल्या घरीं परतलीं.

" कोण बाई, हे, मधुकर गुप्ते ' — निर्मलेचें चालत असतानाच विचारचक्र सुरू झालें. ' मधुकर ' हें नांव तिच्या चांगल्याच परिचयाचें होतें. तेच मधुकर तर हे ! मधुकर गुप्ते '

नसतील ' पण त्याना हें चित्र — जवळ जवळ माझा फोटोच — मिळाला कसा व कुठून ? माझी अन् त्याची .

तिचे विचार तेथेच थांबले. त्याचा बंगला आला व वसंत व निर्मला आन शिरलीं

' आता अगदी फक्कडसा चहा मिळाला पाहिजे ह ताईड,

वसंत कोट टोपी काढीत निर्मलेला म्हणाला.

निर्मला ' स्टोव्ह ' जवळ जाऊन बसली. पण तिचे विचार सारखे चालूच होते. वसंताच्या ते लक्षात आले आणि त्याने मुद्दाम - ' ललना मना ' ' असे पति देवची ललनाना ' या ओळी गुणगुणायला सुरवात केली.

निर्मला स्तब्धच होती.

* * * *

दोन दिवसांनीं लगेच वर्तमानपत्रात मधुकर गुप्तेचे ते चित्र व जवळच त्याचा स्वतःचा फोटो प्रसिद्ध झाला. त्याची वर्तमानपत्रानी अगदीं मुक्तकंठानें स्तुती करून त्याच्याजवळ असल्या प्रकारची कला असल्याबद्दल त्याचें अभिनंदन केलें होते. आजपासून महाराष्ट्राला तो एक अभिमानाचा व कौतुकाचा विषय झाला होता.

तो फोटो अगदीं निर्मलेचाच दिसत होता यात शंका नव्हती. निर्मले या मैत्रिणी व इतर ओळखीची मंडळी यांचा आज चर्चेचा तोच विषय झाला होता. निर्मलेने स्वतः तें पाहिल्यानंतर ' मधुकर गुप्ते ' ही व्यक्ती कोण, याबद्दल तिची खात्रीच झाली

होती. ज्या व्यक्तीविषयी कितीतरी वेळ सारखा विचार करीत बसतों, तीच ही व्यक्ती असे तिला आढळून येताच तिच्या आगावर रोमांच उभे राहिले. सबंध शरीरातून एक मधुरशी लाट कुठुनतरी उसळून गेल्यासारखें तिला वाटलें ' मधुकर गुप्ते ' - आणि त्याचा फोटो आपल्या फोटोच्या शेजारी – दोन्ही फोटो जवळ जवळ –?' जरा चमत्कारीक वाटलें तिला हें ! पण त्या ' वाटण्यात ' तिला एक प्रकारचा अननुभूत आनद होत होता.

आतांशा मधुकर गुप्तेकडे तिंच मन तिला खूपच खेचायला लागलें होतें. तिच्या हृदयात त्याच्याविषयीची बरीच आपलेपणाची भावना निर्माण होऊ लागली होती इतकेंच नव्हे – तर मधून मधून आपल्या मैत्रिणींजवळ ती त्याचा ओझरता विषय काढून, प्रसंगीं त्याच्या कलेची मनसोक्त स्तुती देखील करीत असे. ' मधुकर गुप्तेला आपला फोटो कसा मिळाला, ही गोष्ट तिच्या आता पूर्ण लक्षात आली होती. आगगाडीच्या डब्यातील त्याचे तिच्याकडे एकसारखे पाहणें व जाडशा कागदावर पेन्सिलीचे काम – थेट स्टेशन येईपर्यंत -- करीत बसणे, या त्याच्या कृतींचा आता अगदी स्पष्ट उलगडा झाला होता. मनश्चक्षूपुढे मधुकर गुप्तेचीच मूर्ती खेळायला लागली होती आताशा. त्यामुळें बोलताना वगैरे तिचे जरा भ्रमिष्टासारखेंच होई.

" काय विचार आहे निमाताई यापुढें ? साभाळून रहा हो असें तिला काहीं कोणी थट्टेनें बोलल्यास ' इश्श हें काय गडे ! असानं मी बोलायचीच नाही जा ! ' या पलीकडे तिच्याजवळ

दुसरें उत्तर नसे.

सुदैवाने – दुर्दैवाने – किंवा आणखी कोणत्या दैवाने म्हणा पाहिजे तर – ही गोष्ट ' येन केन प्रकारेण ' तिच्या वसंत दादाच्या कानावरदेखील जाऊन आदळली होती. वसंताला त्यात आनंदच होता !

*        *        *        *

" निमाताई, हे बघ पत्र बघितलंस का ? मुंबईहून रमेश पाठकाचं आलं आहे आज. पुढल्या महिन्यात लंडनला टी. डी. करिता जायचं नक्की ठरलं आमचं. तेव्हा तू एकटीच .

" मग त्यात काय आहे रे दादा ? मी राहीन आपल्या या बंगल्यात. तूं मात्र पत्र वगैरे वेळच्यावेळीं पाठवीत रहा म्हणजे झालं. " निर्मला आपल्या वसंत दादाला काळजीच्या स्वरात म्हणाली. यावेळी तिला आपल्या मृत मातापितरांची आठवण झाल्यावाचून राहिली नाही.

" हं हं तें सारं होईल पण तुझी कांही तरी निराळीच व्यवस्था करण्याचा विचार आहे माझा. तुला सांगू ? "

" हं. "

' मला वाटतं तुझ्या सोबतीला जवळच असं कुणीतरी असावं ! " चेष्टेच्या स्वरात वसंत म्हणाला

" म्हणजे ? "

" म्हणजे असं पहा ऽ ऽ – तुला चित्रकलेचा नाद आहे, त्या अभ्यासाला उत्तेजन देणारा तुझ्या म्हणण्याप्रमाणें एखादा

चित्रकार, किंवा तुझ्याशी गोड गोड गोष्टी बोलून तुझ्याच भोंवती गुजारव करीत राहणारा एकादा ' मधुकर ' – तुला आपला भोंवती ह्मणून "

" इश्श, हे काय रे दादा ? तुझं आपल येऊन जाऊन

" – मधुकर आणि मधुकर – असच कीं नाही ? "

मिष्किलपणानें हसत हसत वसंताने तिचे वाक्य पूर्ण केलें.

' मी नाही बोलत जा -- " रागाचा आव आणून पाय आपटीत निर्मला आपल्या खोलीत पसार झाली

*　　*　　*　　*

वसंत मॅट्रिकमध्यें असतानाच मधुकर गुप्ते त्याच्याच वर्गांत होता. ते दोघे अगदीं ' जानी दोस्त ' नसले, तरी त्याची बोलण्याचालण्याइतकी चांगली ओळख होती निर्मलेच्या विवाहाचा प्रश्न वसंताला सोडविणें भाग होते आता कारण दुर्दैवानं घरात वडील माणूस कोणीच राहिले नव्हतें

वसंत दुसऱ्याच दिवशीं मधुकर गुप्तेला भेटला. त्यानें त्याला सारी हकीगत सांगितली. स्वर्ग फक्त चारच बोटं उरला मधुकरला आता ! निर्मलेच्या सौंदर्यात त्याला कांही अजब जादू भरली असल्याचें वाटे, त्या दिवसा पासून ' निर्मला ' –विषयक विचार त्याच्या डोक्यात तासन् तास थैमान घालीत असत. मधल्या अवधीत ती एकदाही त्याच्या नजरेला पडली नव्हती तो बराच निराश झाला होता त्या बाबतींत. पण वसंत होऊन त्याचे घरीं चालत आला, मग त्याच्या आनंदाला काय पारावार !

त्यानें वसंताला एकदम रुकार दिला.

"पण मधुकर, ह पहा, वधूपरिक्षेचा फार्स झाला पाहिजे अं!" वसंत ह्मणाला.

"ते का बुवा?"

"ते कळेल मागाहून!"

वधूपरिक्षेची वेळ ठरवून, वसंत निघून गेला

*           *           *           *

संध्याकाळी पाचाचा सुमार!

निर्मला अत्यंत चिडल्यासारखी झाली होती....

"दादा तुला साफ सांगत्ये. मी त्या गृहस्थापुढे यायला तयार नाही. कसली 'वधू अन् परीक्षा' घेऊन बसला आहेस? मी कांहीं प्रदर्शनात मांडण्यासारखी एकादी वस्तू आहे कीं काय?"

"ते काय सांगायला पाहिजे? प्रदर्शनात मांडली गेल्याचीच तर फळं ही सारी! भोग बाई ती निमुटपणे! 'आलीया भोगाशीं असावें सादर' – वसंता डोळे मिचकावीत ह्मणाला.

"म्हणजे?"

"प्रदर्शन, चित्र आणि चित्रकार!"

"नान्सेन्स - मला नाही कळत काय म्हणतोस तूं!"

"तूं नुसती बाहेर चल म्हणजे कळेल सारं!"

"मी येत नाहीं जा. दादा तुला अगदीं शेवटच बजावून सांगत्ये कीं, मला भलत्याच गृहस्थाशीं लग्न ... ..

"पण निमाताई, यावेळीं तू बाहेर आली नाहींस तर त्या

गृहस्थांचा अपमान व माझी अब्रु .......

" पुरे बाबा—चल, तुझा अगदीं असा दुराग्रह असतो नेहमी ! " निर्मला त्रासिक स्वरात जळफळत म्हणाली

" हा दुराग्रह नाहीं ताई ! हा किनई तुझ्या सुदैवान अन् माझ्या ' दुर्दैवान ' म्हणू पाहिजे तर— तुला माझ्यापासून ' दूर ' नेणारा ' आग्रह ' आहे ! " वसंताला थोडं वाईट वाटले असेल ह वाक्य उच्चारताना.

निर्मला कांहीं न बोलता वसता बरोबर दिवाणखान्यात गेली. नाइलाज होता !

" दादा, व्हाट् ए नॅस्टी चाइल्ड यू आर ! " निर्मला दिवाणखान्यात बसलेल्या व्यक्तीकडे पहाताच एकदम विजेचा धक्का बसल्याप्रमाणें होऊन उद्गारली

लाजेनें तिचे गौरवर्ण गाल आरक्त झाल्यामुळे अधिकच मोहक दिसत होते यावेळी तिने आपला पाय केव्हाच मागे घेतला होता, पण तिचा मार्ग वसंतदादानें आधींच अडवून धरला होता.

" का ताई, सोळा आणे पसंत ? अगदी पसत ! — शाबास पठ्ठे वसत " वसंतानें स्वतःची पाठ थोपटून घेतली

" काय मिस्टर मधुकरराव ! यू आर ए लकी लॅड ! निमाताइ, कॉंग्रेटस टु यू बोथ ! " वसंतानें मोठमोठ्याने हंसायला सुरवात केली,

मधुकर गुप्तेनेंही त्याला साथ दिली.

निर्मला बिचारी गालातल्या गालात हसत खाली मान घालून आपल्या पदराशी बोटाचा चाळा करीत त्याचजागी उभी होती.

# यांत चूक कुणाची ? : ४

विश्रामच्या दारांत पाय ठेवण्याचा अवकाश ! तोंच —

" कृष्णराव, माझ्या विश्रामला वांचवा हो कुणी, कसं हं। करून ! पहा त्याची काय गत झाली आहे ! माझ एकुलत एक बाळ तें ! आमचा वाली कोण आहे का हो ! धावा ! या वेळीं ? — "

विश्रामच्या आईनें एकदम एक करुण किंकाळी फोडली.

विश्राम पडल्या पडल्या माझ्याकडे टक लावून पहात होता. त्याचे डोळे खोल जाऊन चेहरा अगदी फटफटीत दिसत होता सगळा ! त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या आता. माझ्या हृदयांत चर्रर्र झाल

" कृष्णराव, ही अगदीं शेवटची भेट बर का आता ! "- विश्राम अत्यंत क्षीण आवाजांत बोलायला लागला.

" असं काय ह्मणतोस विश्राम, वेड्यासारख ? तूं अगदीं लवकरच बरा होशील हं आतां ! " मी त्याची समजूत घाल· ण्याचा प्रयत्न करीत म्हणालों.

" बरा ! आणि मी ? तें विसरा आता ! कृष्णराव, मला भयंकर कॉलरा झाला आहे, हें कळतय मला चागलं ! माझ्या हातापायांत येणारे पेटके, ह्या उलट्या मला तेंच सांगताहेत ! कॉल-ऱ्याची सा ऽ री लक्षणं प्रत्ययास येताहेत माझ्या ! कृष्णराव, मी फार तर आणखी दोन तासांचा सोबती ..... अयाई ग ऽ ऽ " — विश्रामला अगदीं भडभडून आल.

राधाकाकू आपलं दुःख कसं तरी दाबण्याचा प्रयत्न करीत

होत्या. त्या विश्रामच्या उशाजवळ बसून, आपल्या प्रेमळ हातांनी थोपटीत, धीर देत होत्या त्याला. विश्राम बोलत असतानाच केविलवाण्या दृष्टीनें त्या माझ्याकडे मधून मधून पहात होत्या

त्याचा आशय माझ्या ध्यानांत यायला वेळ लागला नाहीं.

" राधाकाकू विश्रामला काहीं औषधपाणी ऽ . ... "

" वेडे का आहांत कृष्णराव ? आह्मीं गरीब - दरिद्री लोक – अन् आह्माला कुठलं औषध नि पाणी? औषधाचं बिल .."

गहिंवरून आलं राधाकाकूंना या वेळीं. त्यांच्या नेत्रांतून टप् टप् अश्रु टपकायला लागले.

मी माझेहि डोळे पुसले एकीकडे तोंड करून. साहजिक माझं लक्ष समोरच कोपऱ्यात बसलेल्या जानकीकडे गेलं. ती बिचारी मनांतल्या मनात झुरत कुढत असावी ! तिची चर्याच सांगत होती हें सारं !

विश्रामचं दोन महिन्यांपूर्वीच लग्न झालं होतं ! माझ्या मनाला एक भयंकर कल्पना चाटून गेली–विश्रामच काहीं बरंवाईट झालं तर जानकीसारख्या तरुण कोवळ्या पोरीला वैधव्य --' सहन होईना ही कल्पना मला ! माझ्या अंगावर शहारे आले.

मी मनाशीं कांहीं तरी ठरवलं आणि " आलो हं काकू कांहीं घाबरूं नका तुह्मी ! सा ऽ ऽ रं कांहीं ठीक होईल परमेश्वर-कृपेनं ! " – असं त्यांना सांगून तडक बाहेर पडलों.

" ईश्वर तुमचें कल्याण करो ! " राधाकाकूंचे, गहिंवरून आलेल्या कंठांतून बाहेर पडलेले उद्गार, माझ्या कानांवर पडले.

" आता कसं काय वाटतय विश्राम ? " डॉक्टर गोडबोले यांनीं प्रश्न केला

डॉक्टरसाहेब विश्रामच्या बाजेजवळच बसले होते. मी विश्रामच्या चेहऱ्याकडे पहात उभा होतो त्याचे डोळे कांहीं चमत्कारिक रीतीनेंच फिरत होते. विश्राम आता डॉक्टर साहेबांना काय उत्तर देतो तें ऐकण्याकरिता मी माझे कान टवकारलेले होते.

" अगदी ठीक, भाऊसाहेब ! माझ्या डोळ्यात आता लख्ख प्रकाश पडल्यासारखं वाटतंय मला ! "

विश्रामचा चेहरा खरोखरच एकदम खुलून आल्यासारखा दिसला. मला फार बरं वाटलं !

डॉक्टर साहेब विजयी मुद्रेने नुसते हसले.

" पहा ! आहे कीं नाहीं कृष्णराव ! या ' इन्जेक्शन ' चा तावडतोब ' इफेक्ट ' झालाच पाहिजे ! बर झालं तुह्मी माझ्याकडे लवकर आलात बोलवायला ! नाहीतर ........"

' भाऊसाहेब, मला लवकर बरं करा हो ! मी तुमचे सगळ ' बिल ' देऊन टाकीन शक्य तितक्या लवकर ! पण मी अत्यंत गरीब आहे, ही गोष्ट देखील आपण ध्यानांत घ्यालच ! मी शक्ती प्रमाणं

" किती खुळा आहेस विश्राम तूं अगदीं ! बिल – बिल, कसलं बिल घेऊन बसला आहेस तूं या वेळीं ! तूं आधीं बरा हो ह्मणजे झालं ! त्यांतच माझं ' बिल ' मिळाल्याच समाधान आहे मला ! अरे तुझ्या जिवापुढे पैशाची काय किंमत ? " डॉक्टर

गोडबोले 'गोड – गोड ' बोलत होते.

विश्रामच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु उभे राहिले उठून डॉक्टर साहेबाचे पाय गच्च धरावेत व त्यावर आपल्या अश्रूंचा अभिषेक करावा, असं खास वाटलं असेल विश्रामला ! पण अशक्तपणामुळें त्याला कम उठता येणार !

स्वत:वरून जग ओळखायच असत !

निदान माझी स्वत:ची तरी हीच स्थिति झाली होती खास ! मला डॉक्टर साहेबांविषयीं तेव्हां फारच आदर वाटायला लागला. डॉ. गोडबोले किती उदार आणि सरळ मनाचे ! विश्रामसारख्या एका गरीब मुलाचे घरीं कोणत्याहि प्रकारचे आढेवेढे न घेता ते सरळ चालत आले होते किती निगर्वी स्वभाव होता त्यांचा! माझ्यासारख्या तिऱ्हाइताची ही स्थिति ! मग राधाकाकू–विश्रामची प्रत्यक्ष आई – तिला, व जवळच्या जमलेल्या त्याच्या नात्यागोत्याच्या मंडळीला डॉक्टरसाहेब अगदीं देवाप्रमाणें वाटले असल्यास त्यांत काय नवल !

डॉक्टरसाहेब उठले.

" बरं, आतां जातों मी. घाबरण्याच आतां कांऽहीं कारण नाहीं ! बरं का राधाबाई " डॉक्टर ह्मणाले.

दयाघन परमेश्वराच्या मूर्तीकडे भक्त ज्या मुद्रेनें पाहतो, त्याच मुद्रेनें, राधाकाकू डॉक्टराकडे पहात होत्या. त्यांनीं हात जोडले होते.

" आज तुमच्या विश्रामला मृत्यूच्या दाढेंतून मागे खेचलें

आहे ! आणखी तीन चार दिवस त्याला व्यवस्थित औषधपाणी दिलें ह्मणजे तुमचा विश्राम अगदी पूर्ववत् घोड्यासारखा उभा राहील तुमच्यापुढं ! हं. ठीक आहे. जाऊं मग मी आतां. ? "

" हं ! " — राधाकाकूनी झटकन् उठून अत्यंत नम्रतेनें त्याच्या पायांवर डोके ठेऊन नमस्कार केला डॉक्टरसाहेबांना.

" छे, छे ! हें काय ! " – डॉक्टरसाहेब अभिमानानं जमलेल्या मंडळीकडे पहायला लागले.

सर्वांनीं त्यांना नम्रतापूर्वक ' राम राम ' केला. प्रत्युत्तर ह्मणून डॉक्टरसाहेबांनीं आपला फक्त एक हात हलविला.

" हं, चला कृष्णराव ! — उचला आपलें सामान ! "

मी सामान गोळा करून, डॉक्टरसाहेबांच्या मागून जायला लागलो. साहेबांनीं मागें मान वळविली. " काय, कृष्णराव, तुह्मी अजूनहि काळजींतच दिसतां ! — अहो तुमच्या विश्रामला काऽऽहीं भीति नाहीं आतां ! – पाहिजे तर मी तुह्माला तस अगदीं लेखी लिहून देतों ऽऽ – मग तर झालं ऽऽ आणखी काय सांगूं तुम्हाला ऽ ! "

" छे छे, भाऊसाहेब ! माझा पूर्ण विश्वास आहे आपल्या कामावर ! पण ........"

" यस् – बोला कीं काय तें ! अहो, तुम्हाला परका का आहे कृष्णराव, मी ! "

" डॉक्टरसाहेब, थोडंसं वाईट इतकंच वाटतं कीं — विश्रामसारख्या, चार आणे रोज मजुरी मिळवून पोट भरणाऱ्या

पोराकडून आपलं बिल ताबडतोब देणं कसं शक्य होईल ? याचीच जरा शंका ऽऽ — "

" नॉन्सेन्स् ! हे काय घेऊन बसला आहांत कृष्णराव तुम्ही ? मी याच्या घरीं तेंच सांगितलंय आणि आतांही तेच सांगतों- अहो त्याच्याकडून मला एक पै मिळाली नाहीं तरी तो जन्मभर निदान माझं नाव तरी घईल कां नाहीं ? " – डोळे किलकिले करीत डॉक्टर साहेब म्हणाले.

" वा वा ! हं काय सांगायला पाहिजे ! " मी म्हणालों.

" झालं तर ! त्यांतच मला सारं मिळालं ! – पण तुम्हांला मात्र थोडी तसदी घेतली पाहिजे बुवा ऽऽ – अन् ती अशी –" मी तोंड आ करून साहेबाकडे पहात होतो —" की, विश्रामच्या औषधपाण्यावर तुम्ही स्वतःच जरा नजर ठेविली पाहिजे ! हे लोक आहेत अडाणी ! – तो अगदीं ताबडतोब बरा होईल पहा ऽ ! "

" मोठ्या खुषीनं करीन मी तें ! " खुषीत येऊन मी म्हणालो.

" दॅट्स् व्हेरी गुड् देन् ! "

साहेबांच्या दवाखान्यांत मी त्यांचे सारें सामान ठेवलें व त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून, मी बाहेर पडलों.

" वाचला बिचारा विश्राम एकदाचा ! शाबास आहे डॉक्टर गोडबोल्यांची ! "

मी घरीं आलों व आरामखुर्चीवर अंग टाकलं जरा.

आपल्या प्रयत्नाचं चीज झालं, या कल्पनेनं किती बरं वाटत होतं मला !

*　　*　　*　　*

आमच्या लहानशा शेतात काम करणाऱ्या रामजी गड्याचा विश्राम हा मुलगा रामजीबरोबर तो पुष्कळदा आमचेकडे येत जात असे विश्राम खरोखर किती गोड मुलगा ! तेव्हा साहजिकच आम्हा साऱ्याना त्याच्याविषयीं एक प्रकारचा आपलेपणा वाटत असे. त्यांतल्यात्यात रामजी एक महिन्यापूर्वींच विषम--ज्वराने वारल्यामुळं विश्रामविषयीं माझ्या मनात प्रेमळ सहानुभूतीची भावना निर्माण झाली होती. विश्रामच्या मातुश्री राधाबाई आमच्या येथे मधून मधून धुणीं भांडीं यासारखीं काहीं किरकोळ कामे करीत असत. त्याचे विषयीं आम्हास एक प्रकारचा आदर वाटत असल्यामुळें, आम्ही त्याना ' राधाकाकू ' म्हणत असूं.

बाप वारल्यामुळे घरचा बोजा बऱ्याच अंशीं विश्रामवरच पडल्यासारखा झाला होता. त्याला नुकतेंच अठरावें वर्ष लागलें होतें. त्यानें आपली शिक्षणाची गाडी मराठी सातव्या इयत्तेपर्यंत कशी तरी रेटीत आणली होती पण आता मात्र त्याला शाळेला ' राम राम ' ठोकावा लागला होता. इकडे तिकडे मिळेल तें काम पत्करून तो चार पांच आणे मिळवित असे व आपला एकंदर प्रपचाचा गाडा रडतखडत कसा तरी आपल्या आईच्या मदतीनें तो चालवीत असे. खरोखरच अति कींव येण्यासारखी त्याची परिस्थिति होती सारी !

विश्रामच्या दुखण्याचा आज तिसरा दिवस.

मी माझ्या खोलीत कांही तरी लिहीत बसलो होतों. तोंच माझा धाकटा भाऊ छोटू माझ्याकडे धांवतच आला धापा टाकीत. " दादा " – म्हणून त्यानें एकदम हांक मारली मला.

" काय आहे रे ? "

" दादा – हें पहा किनई – " अजून त्याचा श्वासोच्छ्वास जोरानें सुरूच होता. तो घाबरल्या सारखा दिसत होता. मला कळेना काय प्रकरण आहे तें !

" दादा, राधाकाकूंचं आणि डॉक्टर गोडबोले यांचें भांडण चाललंय ! चल जरा पहा तर खरं " – छोटू माझा हात धरून मला ओढूं लागला.

मी ताबडतोब उठलो व दवाखान्याकडं पळलों. माझ्या कानावर शद्ब पडायला लागले.—

" भाऊसाहेब, असे निर्दय नका होऊं आम्हां गरीबांविषयीं विश्रामचं दुखणं एकदम उलटल्यासारख दिसतंय हो आतां ! घरांतलं कांहीं धान्य वैगेरे विकून, माझ्या जवळ होतं नव्हत तें सा ऽ रं मिळून, आपल्याला दहा रुपये दिले मी कालच संध्याकाळीं ! यावेळीं मी बायको माणूस काय देणार बर आणखी ! तेव्हां माझ्यावर दया करा, अन् विश्रामला निदान कांहीं औषध तरी .... "

" औषधाचा एक थेंबहि मिळायचा नाहीं, राधाबाई, तुम्हाला ! हा एखादा ' मोफत ' दवाखाना वाटला कीं काय ! तुम्हाला, आत्तांच्या आत्तां माझे बाकीचे पंधरा रुपये मोजा पहिल्यानें

व मग पुढच्या गोष्टी बोला ! ज्याला त्याला डॉक्टराचा दवाखाना म्हणजे घरचाच - असंच वाटत असत नाही का ? दुनिया उलटी आहे, त्याला मी काय करणार ? " डॉक्टरसाहेब कडाडत म्हणाले.

माझ्यानें स्वस्थ उभे रहावेना.

" पण भाऊसाहेब " मी बोलायला लागले.

" एक अक्षर बोलू नका कृष्णराव, तुम्हीं ऽ ऽ ! हे लोक उलट्या काळजाचे असतात ! यांचं असल गरीबीच बोलण म्हणजे ' कामापुरता राम राम ! ' या लोकांची हीच प्रवृत्ति अनुभवाला आली आहे माझ्या ! अनुभवानंच मनुष्य शहाणा होत असतो !, -- त्याच्याजवळून पैसे काढण्याची वेळ ती हीच असते कृष्णराव. डॉक्टरसाहेब रागाने धुसफुसत होते व आपले लालबुंद डोळे राधाकाकूवरून व माझ्यावरून क्रमाक्रमानें फिरवीत होते

' गोडबोले ' हें नाव सार्थ लागू पडते डॉक्टरसाहेबाना ही गोष्ट आता चांगलीच लक्षात आली माझ्या !

राधाकाकूनी आपली केविलवाणी नजर माझ्यावर रोखली होती. मी या बाबतींत कांहीं तरी करीन अशी आशा वाटत असावी त्यांना पण ही आशा वेडीच नव्हती का त्याची ? माझ्यासारख्या कारकुनी पेशाचा किरकोळ मनुष्य -- मी महिन्याकांठीं फक्त २५ रुपये मिळवून हिशेबाची दोन्ही तोंडे मोठ्या मुष्किलीनें मिळविणारा मजुर काय करणार तेथें !

मी अगदीं विचारात गर्क होतो. राधाकाकूंनीं थोडा वेळ वाट

बघितली व दु:खाचा एक लांबसा सुस्कारा टाकून परतल्या बिचाऱ्या घरीं जायला.

मला अत्यंत वाईट वाटलं. उभं राहवेना मला तेथें.

" अच्छा, भाऊसाहेब जातों मी ! " – उसनें हास्य आणीत बोलण्याचा प्रयत्न केला होता मी.

" हें बघा कृष्णराव, तुम्हीं कांहीं वाईट वाटू देऊ नका यांचं ! या ' हलकट ' लोकाशीं अशा फटकळपणानं वागल्यावाचून नाहीं ते ठिकाणावर येत ! मला दहा रुपये दिले म्हणजे काहीं उपकार केले माझ्यावर यानी ? माझ्या बाकीच्या पैशाचे काय ? ते सारे मिळाल्यावाचून त्या पोराला एवढसही औषध देणार नाहीं मी ! — मग काय वाटेल तें झालं तरी चालेल ! कळलं कीं नाहीं ! – " डॉक्टरसाहेब आपल्या मिशावरून हात फिरवीत म्हणाले.

" हं ! " मी म्हणालो.

जास्त कांहीं न बोलता , जड अंत:करणान मी दवाखान्यांतून घरीं परतलों.

पुढच्या आठवड्यांत कोणत्याहि कारणानं कां होईना पण मला विश्रामच्या भेटीला जाता आलं नाहीं. राधाकाकुंच्या नानाविध प्रयत्नांनीं पुढील तीन चार दिवसांतच विश्रामच्या प्रकृतीला ताळ्यावर आणलं होतं. आतां त्याच्या प्रकृतीला बराच आराम पडला होता. आमच्या ' साऱ्यां ' च्या प्रयत्नांना ईश्वरानं आज यश दिलं होतं. मनांतल्यामनांत किती तरी आभार मानले मी त्या दीनदयाळाचे !

डॉ. गोडबोल्यांना पैशाचा आता धीर निघेना, त्यानीं राधाकाकूकडे आपल्या गड्याला कितीकदां पाठवल होत ' तुमच्या दाराशीं शिपाई बसवीन ' — ह्मणून त्याना धमकीही दिली होती त्यानीं !

ती बिचारी गरीब अबला काय करणार असल्या परिस्थितीत ?

" भाऊसाहेब पुढल्या आठवड्यांत घरांतली कांहीं भांडीं विकून जितके देववतील तितके जरूर देईन मी पैसे आपणाला, पण माझी अब्रू अशी चव्हाट्यावर आणू नका " – अशी राधाकाकुंनीं कितीकदा काकुळतीनं विनती केली होती साहेबाना ! पण मनुष्याचं नांव ' गोडबोले ' असल तरीं त्याची कृती देखील ' गोड ' च असते, अस थोडंच आहे !

डॉक्टरसाहेबानीं मलाही त्या बाबतींत कितीकदा टोकलं होतं – मीच त्या गोष्टींत मध्यस्थ होतो, तेव्हां साहेबांची लोभी नजर आतां माझ्यावर वळली होती ! ' पगार मिळाला ह्मणजे व्यवस्था करतो ' ह्मणून दोनदा मी स्वतःच सांगून आलों होतों. आजहि त्याना मी तेंच सांगितल ! पण दुसऱ्या दिवशीं सकाळींच पहातों तों त्यांचा गडी पैशाकरितां माझ्यापुढें दत्त म्हणून उभाच ! तस पाहिलं असतां डॉक्टरसाहेब घरचे अगदींच ' हे ' होते, अस कुणालाही म्हणतां येण्यासारखं नव्हतं मला अत्यंत चीड आली त्यांच्या स्वभावाची ! माझ्या स्वाभिमानानं याच वेळीं पेट घेतला, आणि त्याच्या – त्याच दिवशीं डॉक्टरसाहेबांच्या

पुढें त्यांची बाकी - पधरा रुपये - फेकली मी, आणि सरळ निघून आलों.

*  *  *  *

" दादा, आपल्याला नवीन कपडे करावयाचे नाहींत ना दसऱ्याकरितां ? शेजारच्या वसतानें पहा किती छान कोट केला आहे ! मी देखील अगदीं तसाच कपडा घेईन बर कां ? " माझा धाकटा भाऊ छोटू माझ्या जवळ येऊन आनदान ह्मणत होता.

" आपण किनई–दिवाळीला करूं बाळ नवे कपडे ! "

" कां; आतां का नाहीं ? "

" आपल्या शिंप्याला वेळ नाहीं आतां शिवायला ! "

माझा छोटू निराश होत्साता काहीं एक न बोलता निघून गेला. त्याच्या डोळयांतील अश्रु मला स्पष्टच दिसले होते. केवढा धक्का बसला हृदयाला माझ्या !

मी विचार करायला लागलों -- " माझ्या मातृपितृविहीन सात आठ वर्षाच्या छोटूला आज मी निष्ठुरपणानं उडवून लावलं ! त्याचे हट्ट माझ्यावाचून पुरविणारा कोण होता त्याला ? मी तरी काय करणार ? -- मनुष्य परिस्थितीचा दास असतो ! " माझे कपडयांकरिता ह्मणुन इतर खर्चांत मोठ्ठी काटकसर करून निराळे काढून ठेवलेले पधरा रुपये डॉ. गोडबोल्याच्या खिशांत छन् छन् करीत होते.

डॉक्टर साहेबांशीं गेल्या दोन वर्षांत माझा बराच परिचय झाला होता. कां कुणास ठाऊक पण त्यांची प्रॅक्टीस फारशीं मुळींच

नव्हती. ते आधींच 'गोडबोले' असल्यामुळें मला त्यांच्याविषय आदर वाटत असे. विश्रामला त्यांनी बरा केल्यास राधाकाकूकडू आस्ते का होईना पण पाच सात रुपयांची प्राप्ती होईल त्यान यांच एका शुद्ध हेतूनें मी त्यांना तेथें नेलं होतं. मला त्या काय मिळाल ? पचरा रुपयाचा दंड मात्र भरावा लागला मला !

*　　*　　*　　*

राधाकाकूं विशेषेकरून आतां आमच्याकडे येत नाहींत का कुणास ठाऊक ! विश्रामनें आज दोन महिन्यात मला तों दाखवलं नाहीं !

मी त्याना डॉक्टराच्या 'बिला'च्या खड्यात टाकण्याच प्रयत्न केला असं त्याना वाटत असेल का ? व माझा राग येऊन त्यानी हें मौन स्वीकारलं असेल का ? काही कळत नाहीं -सुच नाहीं ! – नशीब माझं !

*　　*　　*　　*

अजूनही या गोष्टीवर मी खूप खूप विचार करतों व शेवटीं मात्र एकाच मुद्यावर येऊन थांबतों. — विश्रामच्या दुख ण्याच्या पहिल्या दिवशीं डॉ. गोडबोले, मी स्वतः व राधाकाकू अन विश्राम हे मायलेक-एकाच ओळींत अगदीं हातांत हात घालून उभे होतों. पण आज काय ? आजहि आह्मी आपल्या ठिकाणीं उभे आहोंत पण डॉक्टर साहेबांचं तोंड पूर्वेकडे, तर राधाकाकूं व विश्राम यांचीं तोंडे पश्चिमेकडे आहेत व माझं तोंड मात्र, मी मध्यस्थ असल्यामुळें उत्तरेकडे आहे ! 'दहिनें रुख्' केलं, तर डॉक्टराचा

चेहरा दिसत नाहीं ! --' बाय् रुव ' केलें, तर राधाकाकूं व विश्राम हे कोणत्या भीतीनं कुणास ठाऊक पण एकही शब्द बोलायला तयार नाहींत ! दोन्ही बाजूंना दुर्लक्ष करून ' घुमजाव ' -- हा हुकूम पाळला, तर ' दक्षिणे ' कडे सारं ' शून्य ' भासते ! काय करावं, का ऽ ऽहीं सुचत नाहीं समजत नाहीं, उमजत नाहीं !

विश्राम बरा होऊन मृत्यूच्या पकडीतून सुटला खरा ! डॉक्टर साहेबांच्या खिशांत एकंदर पंचवीस रुपयांची भरती झाली खरी ! ऐन वेळीं डॉक्टरांना नेऊन, विश्रामचे प्राण वांचविण्याचें श्रेय मला मिळालं खरं ! पण एकंदर गोष्टीचा शेवट काय झाला, असा प्रश्न पुन्हां जर मी मनाशीं टाकला, तर ' चांगला नाहीं ' हेंच उत्तर मिळतं.

" असं कां व्हावं ? "

" मला नाहीं सांगतां येत ! "

" का ? "

" ' यांत चूक कुणाची ' -- हें मला समजत नाहीं म्हणून ! " × × ×

# अभागी प्रेम. : ५

‘ किती रॅश्‌ली सायकल आणलीस रे ! ’ रमेश जरा चिडल्यासारखं करूनच मुकुंदला म्हणाला.

‘ तशी बातमीच आणली आहे मुळीं या पठ्यानं !’ मुकुं-दान देखील आढ्यतेनच उत्तर दिलं.

‘ अच्छा ! काय आहे बुवा एवढी तुझी बातमी ? ’

‘ अरे, आपली ती इंटरमधील कुसूम नाईक आहे ना—तिनं कॉलेज सोडलं आज आपलं. ’

‘ काऽय कुसूम नाईक ?... ... आपली कॉलेज-स्टार आणि तिनं कॉलेज सोडलं ? तें का बुवा ? झालं काय तिला असं एकाएकी ? ’

‘ तें कुणास ठाऊक बुवा ! इतकंच काय, पण ती आज पुण्यांतूनही आपल्या सर्व सामानासह बाहेर गेली, अशी अगदीं ‘ डेफिनिट् ’ बातमी आहे. ’

‘ अरेरे ! कॉलेजची निम्मं ‘ चार्म ’ गेली म्हणायची मग ! ’

‘ तें राहूं दे रे—कॉलेजची तर निम्मंच गेली, पण त्या बिचाऱ्या मोहन देशमूखाचं काय ? त्याची तर ‘ फुल चार्म ’

गेलों ना ! आतां फर्स्ट क्लास वगैरे विसरा म्हणावं बी. ए. मध्यें ' मुकुंद मिस्किलपणें हसत रमेशला म्हणाला.

येथें दोघांनाही निरनिराळ्या वाटेनं जावयाचं असल्यामुळें एकमेकांना ' गुड इव्हिनिंग ' म्हणून जो तो आपल्या घराच्या मार्गाला लागला.

※ ※ ※

आणखी चार दिवसानंतरची गोष्ट !

बिचारा मोहन देशमुख स्वतःच्या खोलींत चिंताग्रस्त स्थितींत स्वतःशीच विचार करीत बसला होता ... ... ' काय बरं झालं असेल कुसुमला एकाएकीं कॉलेजला राम राम ठोकायला ? आपला असला निष्ठुर बेत तिनं मला एका एका शब्दानंही सांगू नये अं ! ' Frailty thy name is woman '— स्त्रिया जात्याच चंचल असतात हेंच खरं ! आतापर्यंतचं माझ्यावरील प्रेमाचं कुसुमचं नुसतं ढोंग होतं तर एकूण ! पण तिनं जरी माझ्या प्रेमाला अशा रीतीनं लाथाडलं असलं, तरी पण माझं हृदय अजूनही मला तिच्याकडे खेंचून नेत आहेसं वाटतं मला. किती छान मुलगी होती कुसुम ! पुरीं दोन वर्षंहि झालीं नाहीत कॉलेजमध्यें पाऊल टाकायला तिला ! पण आपला गोड स्वभाव, मधूर सौंदर्य अभ्यासांतील हुशारी इत्यादि गोष्टींनीं साऱ्या कॉलेजला कसं भारून टाकलं होतं तिनं. आणि याच गोष्टाच्या पायावर

उभारलेल्या तिच्या यशोमंदिरावर गेल्या वर्षाच्या गॅदरिंगमध्यें तिच्या नितांत मधुर गाण्यानं अगदीं कळस चढविला होता खरोखर. पण शेवटीं काय ? . ...असो वादळापूर्वीचीच शांतता म्हणायाची सारी ! तिचं एखादं पत्र तरी कुठून येईल म्हणून चार दि स सारखी वाट पाहिली. पण त्या बाबतींतही निराशाच केली तिनं. मी कॉलेजमधला एक मोठा ' स्कॉलर ' —आणि माझी बी. ए. ची परीक्षा ....छे ! आतां कसली परीक्षा न् काय ? हा मोठाच आघात झाला माझ्या हृदयावर ! कुसुम पण किती वेडी ! आणखी दोनच महिन्यांनीं इंटरला बसली असती चांगली ! सारीच विचित्र घटना ! बरं, कदाचित् ती आपल्या एखाद्या नातलगाकडे तर गेली नसेल ? छे ! शक्य नाहीं तें. ती आणि मी, या एकाच इमारतींत भाड्यानं स्वतंत्र खोल्या घेऊन जवळ जवळ दीड वर्षापासून रहात आहों; पण आपल्याला कुणी नातलग असल्याचं तिनं कधीं चुकूनही सांगितलं नाहीं मला. उलट, तुम्हाला घरीं कोण मंडळी आहे, असं विचारतांच तिची मुद्रा कावरी बावरी होत असे. अर्थात् मी देखील खोलांत शिरण्याचा कधींच प्रयत्न केला नाहीं. एका इमारतींत रहाणं, एकाच कॉलेजांत शिकणं आणि प्रसंगीं स्नेहभावानं एकमेकांस मदत करणं, या पलीकडे कोणत्या गोष्टींनीं आम्हा दोघांत इतकं गाढ प्रेम उत्पन्न केलं असेल बरं ? कांहींहि असलं तरी तिच्याविषयीं फार मोठी ओढ माझ्या मनाला अजूनही लागली

आहे खास! कॉलेज मधील लायब्ररी व बगिचा, तिची खोली, फिरायला जाऊन बसण्याच्या जागा त्या त्या ठिकाणी आम्ही अगदी तासचे तास सारखे बोलत बसत असू ती सारी ठिकाण, आज मला—नकोच पण त्याची आठवण आता!' मोहनच्या डोळ्यात अश्रु उभे राहिले बराच शून्य दृष्टीन तो खिडकींतून बाहेर पहात होता. थोड्याच वेळात काहींतरी निश्चय केल्यासारखे करून तो कपडे घालून आपल्या खोलीकडे पुनः पुन्हा पहात खोली बाहेर पडला.

* * *

एक वर्षानंतरची गोष्ट!

आजहि रोजच्याप्रमाणें थिएटर अगदी खच्चून भरलं होतं. सर्वांच्या कौतुकाचा विषय एकच होता— आणि तो म्हणजे—' शैलबाला '! पधरा दिवसापूर्वीच मुंबईमध्यें या संगीत नाटक कपनींनं आपलं पदार्पण केलं होत, व तिचा ' संशयकल्लोळ ' चांगलाच गाजला होता त्या शहरांत नाटकांतील रेवतीची भूमिका करणारी ' शैलबाला '— नांवाची कुणी एक तरुणी होती. तिचा उत्कृष्ट अभिनय व स्वर्गीय कंठमाधुरी या दोन गोष्टींनीं मुंबापुरीच्या जनतेला तर बेहद्द खूष करून सोडलं होतं. आणि नाटकाला एवढ्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी खेंचून न्यायला कारणीभूत अशी व्यक्ति तरी

कोण होती ?— शैलबालाच ! मुंबईत 'शैलबाला' 'शैलबाला' —हेंच एक नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं आज पंधरा दिवसापासून नाचत होतं, आणि तिच्या कामाची जो तो अगदीं मुक्त कंठानं स्तुति करात होता. मोहन देशमुख खड्ड्यातील तिसऱ्या रांगेतील खुर्चीवर बसला होता. कामाच्या बोजामुळं त्याला आत्तापर्यंत नाटकाला यायला झालच नव्हतं. आजच्या खेळाला देखील त्याच्या मित्रानं—अरविंदानं—त्याला जवळ जवळ ओढूनच आणलं होतं.

ड्रॉप'चा पडदा उघडला. नाटकाला सुरवात झाली. साऱ्या प्रेक्षकांचे डोळे रंगभूमीवरील शैलबालेच्या प्रवेशाकडे लागले होते. तिचा प्रवेश होताच सबंध थिएटर टाळ्यांचा कडकडाटानं अगदीं दणाणून गेलं. शैलबालेकडे नजर जातांच मोहनला कांहां तरी एकदम आठवल्यासारखं होऊन तो दचकलाच जरा—त्याच्या डोळ्यापुढं एक नवीनच व्यक्ति थैमान घालायला लागली. तरी पण स्वतःच्या मनाचं कसं तरी समाधान करण्याचा प्रयत्न करीत, नाटक पाहूं लागला तो पुन्हां. पण त्याचा प्रयत्न सफल झाला नाहीं. जसजसा रेवतीच्या कामांत रंग भरायला लागला, तसतसा मोहन अधिकच बेचैन व्हायला लागला. तो रेवतीकडे—शैलबालेकडे—खूप निरखून पाहूं लागला. असं तिच्याकडे पहातांना कुणी आपल्याला पाहील

तर काय म्हणेल, या गोष्टीचा यत्किंचितही भ्रांत नव्हती त्याला. इकडे टाळ्या, शिट्या 'वन्समोअर' यांनी थिएटर हादरत होतं तर तिकडे मोहनचे कान या साऱ्या गोष्टींनी बधिर झाल्यासारखे होऊन कांहीं विचित्रिशी गोष्टींनी त्याचं हृदय मात्र भयंकर हेलकावे खात होतं. तो कांहीं निराळयाच सृष्टींत वावरत होता त्या वेळीं आपण घरीं आत्ताच चालतं व्हावं असं कितीतरी वेळा वाटलं त्याला पण आपल्या मित्राला त्यामुळें वाईट वाटेल या विचारानं कसेंतरी स्वतःला थोपवून धरलं होतं त्यानें. पण 'फुटता सागर सिकतासेतूचें काय त्यापुढें चाले' अशीच गत झाली त्याची शेवटीं. आज शैलबालेनं आपल्या अभिनयकौशल्याची कमाल केली होती अगदीं. ती जसजशी आपल्या भूमिकेशीं तन्मय होत होती, तसतशा मोहनच्या मनोवृत्ति मात्र अधिकाधिक प्रक्षुब्ध होत होत्या. रेवतीचं 'मजवरी तयाचें प्रेम खरें'–हें पद एकदां संपवून त्यालाच मिळालेला 'वन्समोअर' तिनं स्वीकारतांच, मोहनच्या हृदयात वणवा पेटला भावनांचा. तो उठला आणि 'आलोंच हं बाहेरून' अशी कांहींतरी आपल्या मित्राला थाप देत तो थियटरच्या बाहेर पडला त्याला थांबवायला अरविंद होता कुठं ठिकाणावर? सुंदर तें ध्यान उभें स्टेजवरी' तें पाहण्यांत गुंगून गेला होता तो अगदीं.

'संशयकल्लोळ' राहिला बाजूलाच! पण मोहनें मात्र आपल्या हृदयात अनेक विचार—विकाराचा मोठाच 'कल्लोळ' माजवून घेतला होता. सबंध रात्र अत्यंत अस्वस्थ चित्तानं काढली बिचाऱ्यानं शैलबालेविषयींच्या अनेक विचारांनीं कोलाहल उठविला होता त्याच्या अंतःकरणांत.

दुसराच दिवस. संध्याकाळीं पाचांचा सुमार. शैलबाला आपल्या खिडकींतून रस्त्यावरील शोभा पहात उभी होती. जेव्हा जेव्हां म्हणून तिला रिकामा वेळ मिळत असे, तेव्हा तेव्हां अशाच कांही प्रकारानं ता स्वतःच्या मनाचं रंजन करून घेत असे पण तिला त्याच समाधान फारच थोड- जवळ जवळ नाहींच म्हटलं तरी चालेल-असं मिळत असे. रिकाम्या वेळांत तिच्यापुढें प्रामुख्यानं कोणती गोष्ट थैमान घालीत असेल तर तिच कॉलेजमध्यें असतांनाचं आयुष्य-तिच मोहन देशमुखाच्या सहवासात गेलेलं आयुष्य आजहि अशाच कांहीं विचार करीत उभी होती ती तिथें. गाडीघोड्याची ये-जा सुरू होती. ट्रामगाड्या टण् टण्, घण् घण् करीत इकडून तिकडे फेऱ्या घालीत होत्या लोकांची देखील आपआपल्या कामाकरितां धांवपळ सुरूं होतीच. या साऱ्यांच्या गर्दीत तिची एका व्यक्तीवर एकदम दृष्टी स्थिर झाली. एकदम दचकल्यासारखं झालं

तिला. ती व्यक्ति झपाझप पावले टाकीत आपला मार्ग काढीत होती. ' अग्गबाई ऽ ऽ ! हे तर मोहन देशमुख ! हे इंथ कसे आले ? आणि ते इकडेच येत आहेतसं दिसतंय. यांनी देखील आपला अभ्यासक्रम माझ्या प्रमाणच सोडून दिला की काय ? ' मोहन देशमुख अधिकाधिक जवळ येत होता. शैलबाला उभी असलेल्याच इमारतीकडे त्याची दृष्टी खिळून राहिली होती. शैलबालेच्या हृदयांत कालवाकालव होऊं लागली तिच्या सर्व अंगाला कंप सुटला : काय करूं बाई मी आता? घेऊ का नको मी भेट त्यांची ? महादू, महादू ' अरे महादबा.... '

' जी बाईसाब '

" अरे त्या समोरून येत असलेल्या निळसर रंगाचा सूट चढविलेल्या माणसाकडे पहा. बघितलंस ? '

" व्हय '

" जा पळ खाली, आणि दारात जाऊन उभा रहा. आणि ते इकडे कुंठ जातात त सांग मला वर येऊन. जा, पळ लवकर ! '

महादबान शैलबालेकडे जरा चमत्कारिक नजरेनें पहात धूम ठोकली खाली.

शैलबालेला भोंवळ यायला लागली होती यावेळी. ती लगेच आपल्या बिछान्यावर पडली, आणि अंतःकरणांत

पेटलेल्या वडवानलावर अश्रूंचें सिंचन करावयास सुरवात केली तिनं.

" ह्यो चिठ्ठी दिली हाय बाईसाब, त्या रावसाहेबान सांगू का त्यास्ना आंत येगला ? ,

काय उत्तर द्यावं हे सुचेना शैलबालेला. ' नाहीं , म्हणावं तर केवढं पाप केवढा कृतघ्नपणा घडेल माझ्या हातून ? बरं, हो म्हणावं तर त्यालाहि तिचं मन तयार होईना'.

" मग काय बाईसाब ? ,

" त्याना म्हणाव आज माझी प्रकृति फार बिघडली आहे पुन: केव्हा तरी या ! ,

शैलबालेनं आजचा प्रसंग कसातरी टाळला.

बिचारा मोहन जड अंतःकरणानं, निराश होत्साता चालता झाला तेथून. फार मोठीच जखम झाली त्याच्या हृदयाला आज !

शैलबालेला मात्र थोड्या वेळानं पश्चात्ताप व्हायला लागला—' काय केलं हे मी असं वेड्यासारखं ? शोभलं का मला हें ? ज्या माणसावर थोड्या दिवसांपूर्वी मी जिवाभावानं प्रेम केलं, इतकंच नाहीं तर ज्याला मी त्यांच्याशीं विवाहबद्ध होण्याचं वचन दिलं, त्यांच मोहनरावाना आज मी राक्षसी

अंत:करणानं परतून लावलं. हाय ! हाय ! निदान शिष्टाचार म्हणून तरी मला त्यांची भेट घ्यायला पाहिजे होती आज. आणि त्यांतल्या त्यांत ....... ...पण नकोच ते विचार. ,

तिच्या मनांत विचारांची इतकी गर्दी उसळली कीं तिला त्यांना अश्रु—रूपानं कां होईना, पण वाट करून दिल्या-वांचून गत्यंतर नव्हतं. ती तावडतोब उठली. आपल्या खोलीचं दार अगदीं गच्च बंद केलं तिनं, आणि येऊन पडली आपल्या बिछान्यावर अश्रु ढाळीत.

* * *

पुढील पांच सहा दिवसांत शैलबाला आपल्या खोलींतून क्वचितच बाहेर पडली होती. आपल्याच्यानं पुढील आठवड्यात काम होणार नाहीं असं मालकाला स्पष्ट सांगून तिनं रजाच घेतली होती तेवढ्या दिवसाची म्हटलं तरी चालेल. स्वस्थ विश्रांति घ्यावयाची व गतायुष्याचा थोडाहि विचार करावयाचा नाहीं, हाच तिनं निश्चय केला होता आपल्या मनाशीं. पण तेवढं देखील भाग्य कुठं होतं तिचं ? आठवड्याच्या शेवटच्या दिवशी दुपारीं दोनच्या सुमारास पोष्टाच्या शिपायानं एक तार ठेवली तिच्या हातांत........तिनं तावडतोब वाचली ती....

'Seriously ill, see me immediately.,
Mohan Deshmukh Joshi's Bunglow No.6'
Bombay 2.

शहारे आले शैलबालेच्या अंगावर एकदम मोहनविषयीं नुसता विचार सुद्धा करावयाचा नाहीं, हा तिचा निश्चय— निश्चय कसला ?— निश्चयाचा पाचोळा डोलारा तावडतोब ढासळला त्या वेळीं बाहेर जाण्याकरितां तिनं आपलं पातळ देखील बदलल नाहीं—अगदा तश्शीच धावत गेली ती खालीं, आणि लगच एका टॅक्सीला गाठून जाऊन बसली ती आंत … धर्रर्र करीत टक्सी निघाली पुढ.

' या मिस शैलबाला ' अरविंद जिन्यातून खाली उतरत असताना शैलबालेला म्हणाला. त्याच्या हातांत औषधा करिता एक रिकामी बाटली होती तो औषध घ्यायलाच बाहेर निघाला होता.

" कशी आहे प्रकृति आतां मोहनरावांची ! "

" त्यांच्या हृदयाला कांहीं तरी जबरदस्त धक्का बसला असल्याच डॉक्टर म्हणतात.

पुढचं कांहीं न ऐकतां धावतच गेली शैलबाला मोहनच्या खोलीकडे.

शैलबालेला मोहनची स्थिति बघवत नव्हती डोळ्यांनीं. तो अगदीं पांढरा फटफटीत पडला होता. आवाज अगदीं क्षीण झाला होता त्याचा. त्याच्या डोळ्यांची हालचाल सुद्धां क्वचि- तच होत होती. तो अगदीं अचल नेत्रांनीं शैलबालेकडे अत्यंत

केविलवाण्या नजरेनं पहात होता. तिच्याशीं पुष्कळसं बोलावं असं वाटत असावं त्याला. त्याच्याकरितां त्याची सारखी धडपड सुरू होती. पण भयंकर अशक्तपणामुळें त्याचा हेतु सिद्धीस जाईना. तरी पण—

" माझ्यावर मोठेच उपकार झाले मिस् कुसु-—नव्हे-शैलबाला " मोहन क्षीण स्वरात उद्गारला.

' मोहन, कशाला उगीच तुमचा पहिला शब्द मागे घेता मी 'शैलबाला' झाले आहे आज-पण ते सारें फक्त मोहन व्यतिरिक्तच्या सृष्टींत. पण मोहन देशमुखांच्या सृष्टींत मी त्याची पूर्वींची— '

' कुसूम नाईकच. असंच ना. ? ' मोहननं वाक्य पूर्ण केलं तिचं.

' हो–असच अगदी ! '

मोहननं ' कुसूम ' या शब्दाचा उच्चार करण्या बरोबर शैलबालेला-आताच्या कुसूमला-भडभडून आलं अगदीं. तिच्या नेत्रांतील अश्रुधारा स्पष्टच दिसून येऊं लागल्या मोहनला.

' हें काय कुसुम ? मला नाहीं का सांगायचं ? '

' हो सांगितलंच पाहिजे तुम्हाला सारं त्यावांचून मला चैन पडायचं नाहीं. मोहन, पहिल्यानं या राक्षसिणीला क्षमा

करा. मला कळतं, मोहन, कीं तुमची अशी स्थिति व्हायला ही अभागी कुसूमच कारणभूत आहे. मी तुमची मोठीच प्रतारणा. केली मोहन मला तुमच्या माझ्यावरील प्रेमाची जाणीव होती आणि त्या प्रमाच्या खात्रीवरच मीं तुम्हाला विवाहाच वचनहि दिल होत— '

मोहन अगदीं स्वस्थ चित्तानं ऐकत होता.

' मोहन , किती आनंदात दिवस गेले आपले ते ! याची अजूनही आठवण झाली म्हणज ( कुसुमला बोलवेना पुढें—तिचा कंठ गहिंवरून आला. मोहन देखील एकाद्या मुलासारखा रडायला लागला. कुसुमन आपल्या पदरान मोहनचे व आपले स्वत चे डोळे पुसले. )— पण मोहन आपल्या या आनदांत माती कालविली जायची होती ! '

' ती कशी ? '

' मोहन, काय सागू तुम्हाला ! माझ्या मनानं फार निराळ्याच बाजून कोलांटी घेतली एकदम '

' हं ? तुझ दुसऱ्यावर प्रेम ! ' मोहननं मोठ्या कष्टानं बोलायला सुरवात केली. कुसुमनं लगेच त्याच्या तोंडावर हात ठेवला. कुसुम उद्वेगानें म्हणाली—

' काय बोलता मोहन हें तुम्ही ? तुम्हाला ही असली घाणेरडी कल्पना येते तरी कशी हो ! पण तुम्ही ' पुरुष '

म्हणून असला संशय येणं साहजिकच आहे तुम्हांला! पण ही कुसुम इतकी नीच–अधम नाहीं; ती अभागी आहे. तिनं आजपर्यंत–अगदीं या घटकेपर्यंत–एकनिष्ठ भावानं प्रेम केलं तं एकाच व्यक्तीवर. तिनं तिचं हृदयपुष्प अर्पण केलं तें एकाच व्यक्तीला, आणि तिचं प्रेम यापुढंही ती अभग–अटळ ठेवणार तें देखील त्या एका व्यक्तीवरच— '

मोहन त्या व्यक्तीचं नांव ऐकायला अधीर झाल्यासारखा दिसत होता.

" मोहन, ती व्यक्ति दुसरी तिसरी कुणी नसून–तुम्हीच –मोहन–देशमुख! असं असतांना तुमच्याशीं इतक्या निष्ठुरतेनं मी का वागलें, परवा तुमची भेट घेण्याचं मी कां नाकारलं– असा प्रश्न पडला असेल तुम्हांला."

मोहननं नुसतं तिच्याकडे पाहिलं.

' मोहन, माझं मन खात होतं आतून. तुमची गृहिणी होण्याचं भाग्य मला लाभलं असतं तर त्यांत मोठाच आनंद झाला असता मला आणि ती गोष्ट मला अशक्य होती किंवा माझ्यापासून दूर होती असंही नाहीं. अगदीं हाताशीं होती ती माझ्या. पण एकाच विचारानं आपला–माझा–घात केला शेवटीं. तो मला इतका बोंचायला–भेडसवायला लागला कीं, मला कॉलेज सोडून, तुम्हांला एका शब्दानंही न कळवतां पुणं

मोडणं भाग पडलं. मोहन, इथंच आहे सारं रहस्य माझं—स्पष्ट सांगते मी आतां—! मोहन, मी-एका-वेश्येची-मुलगी-आहे ! '

मोहननं एकदम उठून बसण्याची धडपड केली. पण कुसुमनं तिला तसं करूं दिलं नाहीं. तरी पण तो बोललाच—अगदीं स्पष्ट आवाजांत बोलला या वेळीं तो—' मग, त्यांत काय होतं मोठसं ! माझं तुझ्यावरील प्रेम—'

' हो अगदीं खरं आणि अढळ होतं याची कल्पना आहे मला '

' कुसुम, प्रेमाकरितां वाटेल तो त्याग केला असता मी. तेवढी तयारी होती माझ्या मनाची. '

' पण मी कच्च्या दिलाची होते ना ! झाल्या गोष्टी होऊन गेल्या मोहन. आतां पश्चात्ताप करून तरी काय उपयोग ? माझ्या आईनं तिच्या व्यवसायात खराच पैसा मिळविला आणि उधळला देखील. मी देखील त्याच व्यवसायाचा अवलंब करावा, ही तिची मोठी इच्छा. पण मी तिला मानलं नाहीं. त्या वेळेपर्यंत मीं माझ्या शिक्षणाची गाडी कशी तरी मॅट्रिक-पर्यंत आणली होती. तिच्या मनाविरुद्ध या गोष्टी होत असल्या-मुळें तिचे आणि माझे नेहमीं खटके उडत. एके दिवशीं तिच्या मनांत काय आलं कुणास ठाऊक ! तिनं मला हजार रुपये दिले,

व घराबाहेर घालवून लावलं मला. तिला कांहीं वाटल नाहीं त्याचं–तिला माझ्याविषयीं तीव्र तिरस्कार वाटत असे. मी शेवटीं बेळगांवलाच स्वतंत्र राहून, तेथेंच मॅट्रिक झालें, आणि नंतर पुण्याला येऊन इंटरच्या पहिल्या टर्मपर्यंत कशी तरी ओढली मी माझ्या शिक्षणाची गाडी. पण पुढं पैशाच्या अभावीं मला माझा शिक्षणक्रम बंद करावा लागला. तुमच्या जवळाहि मला त्या वेळीं रहाता आलं असत. पण—, या ' पण ' नेच सारा घोटाळा केला शेवटीं मोहन ! पैशाचा अभाव व मी ' वेश्येची मुलगी ' म्हणून अंत:करणांत वारंवार होणारी खळबळ यांनीं मला पुणं सोडायला लावलं. मी सहज भटकत नाशिकला गेले. तेथें त्या वेळीं ही नाटक मंडळी होती. माझ्या कंठमाधुर्या- मुळं मला ताबडतोब प्रवेश मिळाला तींत. मोहन, ' अगबाई ! पण मी बोलत काय बसले ? असं काय करता ? ...अरविंद अजून आले कसे नाहींत औषध घेऊन ? '

' म--ला आ--ता औ--ष--ध न-को. '

मोहननें गच्च डोळे मिटले होते आपले.

' असं काय मोहन ? मी जाऊं का त्याना पहायला ? ' मोहनकडून उत्तर मिळालं नाहीं.

' मोहन, मोहन,— असं काय गडे ! बोला ना, मोहन !'

कुसुम घाबरून पुन: पुन्हां विचारीत होती. कुसुम कुणाला तरी मदतीला म्हणून बोलवायला उठणार, तोंच मोहननं डोळे उघडले. ते अगदीं थिजल्यासारखे दिसत होते. कुसुमला दु:खाचा आवेग थांबवेना. ती त्याच्याकडे टक लावून पहात रडायला लागली.

‘ कु-सु-म तु-झ्या-व-र अ-ग-दीं ख्-ख-रं अ....अ....गदीं ....श....शे....व....टला....श द्ध.... ! मी प्-प्रे--म केलं; प--ण आ--प--लं प्रेम.... ..कुसुम, कुसुऽऽम .......’

झालं ! सपलं सारं ! मोहनची प्राणज्योत कायमची विझली

अरविंद औषध घेऊन आला. कुसुम मोठ्यान आक्रोश करायला लागली. अरविंदानंही तिचच अनुकरण केलं.

कुसुमनं—शैलबालेनं—आज रात्रीं मोठ्या नाखुशीनं- पण त्या बरोबरच आपल्या कर्तव्यजागृतीनं ‘ संशयकल्लोळांत ’ आपलं शेवटचं काम केलं. आपल्या कामाचा राजीनामा मालकाच्या हातात तिनं संध्याकाळींच ठेवला होता. अर्थात् ऐनवेळीं राजीनामा देण्याची चूक तिला स्वत:च कळत असल्यामुळं तिला त्या दिवशीं काम करणं भाग होत.

डोळे पुशीतच तिनं स्टेजवर प्रवेश केला एकामागून एक प्रवेश सपले — ‘ मजवरी तयाचे प्रेम खरें ’ या गाण्याला

सुरवात झाली. पहिली ओळ म्हटली कशी तरी तिनं. नंतर कांपरा आवाज बाहेर निघायला लागला तिच्या कंठांतून. डोळयातून अश्रूंचा जोरांत प्रवाह सुरू झाला.... ' प्रेम खरें.... प्रम खरें '.... गाणं एकदम बंद झाल. धाडकन् जमिनीवर आदळली ती घेरी येऊन. थिएटरमध्यें एकच गोंधळ माजला. मालक, मॅनेजर धावून गेले एकदम तिच्यापाशीं

' काय झाल मिस् शैलबाला ? ' मालकांनीं विचारल.

पण शैलबाला उत्तर द्यायला होती कुठ ठिकाणावर. डॉक्टरांनीं नाडी पहाताच त्याचं तोंड खर्कन् उतरल. नाडीची गति फारच मंद झाली असल्याच सांगितलं त्यानीं. तिची कांहीं आशाच वाटेना त्याना आता. हृदयावरील काहीं भयकर आघातामुळें एकाएकीं हृदयक्रिया बद पडण्याच्या बेतांत आल्या होत्या.

हळूच डोळे उघडले शैलबालेनं.

' चलायच ना बिऱ्हाडावर ? ' मॅनेजर साहेब म्हणाले.

' ना .हीं. मा जा .ते ... ' अत्यंत क्षीण आवाजात उत्तर आले.

' कुठं जाणार ? '

' मी ह न.. ब ..रो ब .?? ' सर्वत्र शांत झाल.

# मजूर : ६

रविवारचा दिवस. गिरजा आज हसत खेळत–नाचत होती. तोंडानं तिचं ' एक होता राऽजा, एक होती राऽऽणी ' हे गाणं वेडवाकडं का होईना–पण सुरू होत. गिरजा, अकरा बारा वर्षांची पोर आणि गाणं ते काय म्हणणार ? दुसऱ्या मुलाच ऐकून ऐकूनच शिकली होती ती तेवढ म्हणायला. त्या गाण्याचं नाटक आपणासहि पाहायला मिळाव अशी तिची फार इच्छा होती, आणि त्याविषयी तिनं आपल्या आबाला–सतोजीला तिच्या बापाला–कितीदा तरी सागितल होत. पण ' आपण उद्या जाऊं हं बाळ, परवा जाऊ हं बाळ ' अशी कशी तरी तो तिची समजूत घालीत होता. पण असल्या प्रसगीं त्याच्या अत:करणांत मोठीच कालवाकालव होई. अगदी रडे कोसळे त्याला- सुदैव त्याच की गिरजा ही हट्टी पोर नव्हती

अकरा वाजण्याची वेळ. या वेळी संतोजी स्वयपाकाला बसला होता. गिरजेचे उड्या मारणे अन् ' एक होता राजा, एक होती राऽऽणी ' मोठमोठ्यान म्हणण अजून चालूच होतं. ' अचळ नयाची अनुपम प्रीति . .' ह्या ओळीवर देखील घसरली गाडी तिची कशीतरी. सतोजीच लक्ष तिकडे होतंच. त्याच्या हृदयाचा ठाव घेतला त्या ओळीन, आत्तापर्यंत कसेतरी थोपवून धरलेले अश्रू, आता आवरेनासे झाले त्याला. एका हातानं चुलींतील लाकूड पुढे सरकवत, आपल्या गुडघ्याशीं त्यानं डोळे पुसले आपले ..' खरच माझी राणी–सखू-असती तर, आज असला प्रसग माझ्यावर कशाला आला असता ? किती प्रेमळ, किती कष्टाळू होती गिरजेची

आई ! माझ्याकरिता किती किती अडचणी सोसल्या तिनं ! तिच्या करिता ह्मणून काम करण्यात मला किती आनंद आणि उत्साह वाटे ! पण आमची ती 'अचल, अनुपम प्रीति' काळाला बघवली नाही एका महिन्यापूर्वीच मृत्यूनं--कॉलऱ्याच्या स्वरूपात-- झडप घातली तिच्यावर आणि अवघ्या तीनच तासांत गट्ट केलं तिला. औषधपाण्यावाचून तडफडतच काळाच्या उदरात गडप झाली बिचारी ! गिरणींतील माझ्यासारखा एक किरकोळ मजूर--महिन्याकाठी अवघ्या बारा टिकल्या मिळविणारा मजूर--कुठून आणणार डॉक्टर ? आणि कुठून भरणार त्याचं 'बिल' ? 'राणी' गेली, 'राजा' मात्र येथे रडत बसला आहे निराशेचे सुस्कारे टाकीत ! जवळ पैसा नव्हता, म्हणून राखरांगोळी झाली माझ्या प्रेमाची . . . . !' असल्या किती तरी दुःखपूर्ण विचारांनी मनोजीचं हृदय भरलं होतं या वेळी !

त्यानं गिरिजेला जेवायला हाक मारली

*       *       *       *

'आज, चटणी फारच तिखट झाली आहे, आबा !' गिरिजेन चटणीबरोबर भाकरीचा घेतलेला पहिलाच घांस तोंडांत घालीत म्हटलं.

'तेल घे बाळ, तीत थोडं.'

गिरजा आनंदानं उठली आणि तेलाचा डबा घेऊन, उघडला तो तिनं. डबा रिकामा होता.

"त्यांत कांहीं नाहीं आबा !" तोंड जळाल्यामुळं हा. हाः करीत

येऊन बसली ती परत आपल्या ताटाजवळ.

संतोजीला भडभडून आलं आपल्या पोटच्या गोळ्याला, चटणीला तिखटपणा मारायला, पळीभर तेलहि मिळू नये ना आज आपल्या घरात ! 'थांब हं बाळ आत्ता आलोच मी तेल घेऊन !'

तो तावडतोब उठला. त्याने हातात एक पितळी भांड घेतलं.

'त्या भांड्यात का आणणार तेल आबा ? तो तेलाचा डबा न्या ना आपला ?'

'हो खरंच !'

डबादेखील नेला संतोजीनं आपल्याबरोबर. तो परत आला डब्यात तेल होतं, पण हातात नेलेलं पितळी भांडं मात्र नव्हतं

गिरिजा भारी चौकस !

'ते दुसरं भांडं कुठं आहे आपलं ?'

'ह. विसरलोच तें आणायला त्या दुकानातून !'

संतोजीनं गिरजेची समजूत घातली.

तो ते भांड गहाण ठेऊन आला होता.

पुन्हा त्याला ताटावर बसावस वाटेना. अजूनहि त्याच्या नेत्रात अश्रु तरंगत होतेच.

'आबा, तुम्ही रडता का आज ?'

**'अंहं, काही ना ......'**

*　　　*　　　*

'अरे, सत्या ! सत्या ! वाटेल तसा सामान आणला शेटजी-

कडून उधार! अन् त्याचे पैसे कोण देणार? तूं का मी, की तुझा बाप? देऊन टाक आत्ताच्या आत्ता शेटजींचे अकरा रुपये सव्वा अकरा आणे!' शेटजीचा तगादा आला होता.

'पण मीं तर नऊ रुपये तेरा आण्याचा सामान आणला पाहिजे तर माझ्याजवळ हिशेब—'

'कसला हिशेब घेऊन बसला आहेस कपाळाचा! शेटजींचा जमाखर्च खोटा आहे वाटत? काय न्याय आहे पहा! चोरच्या चोर आणि वरून पुन्हा शिरजोर!'

'आणखी मला दोनच दिवसाची सवड द्या. पगार मिळाला म्हणजे आणून देतो मी सारे पैसे तुमचे.' सतोजी काकुळतीन म्हणाला.

'अरे हे तुझे एक दिवस, दोन दिवस, चालणार आहेत किती दिवस असे? उद्या सध्याकाळपर्यंत पैसे नाहीं आले तर मात्र दिसेल ह मजा काय आहे ती!'

गेली एकदाची पीडा! संतोजीचा अवमानित आत्मा आतून होरपळून निघाला होता!

*　　　*　　　*

सुदैवान सतोजीला दुसऱ्याच दिवशीं पगार मिळाला. शेटजींना त्याचे देणे देऊन आला तो लगेच. किती पैसे शेटजींनी जास्त मारले, हें एक तर त्यानाच ठाऊक किंवा देवाला ठाऊक! हातात शिल्लक पहातो तों फक्त पावणे पाच आणे! पावणे पांच आण्यांत सबंध महिन्याचा खर्च कसा चालवायाचा? खोलींच भाडं

अडीच रुपये राहलंच होत अजून द्यायच !

पुन्हां त्याला आपल्या मृत पत्नीची आठवण झाली. धुणीं, भाड्यीं वगैरे करून ती देखील आठनऊ रुपये महिन्याला मिळवीत असे आणि अशा रीतीन त्याचा संसाराचा गाडा कसातरी लोटला जात होता पण त्या गाड्याचं एक चाकच आता मोडून पडलं होत आणि त्यामुळ सतोजीचीही कंबर खचल्यासारखीच झाली होती.

सध्याकाळीं तो एका कापडवाल्याच्या दुकानात जाऊन आपल्या कारभारणीचे एक कोर लुगड आणि आठ दहा खण विकून आला तेथे सात रुपये किंमतीला. हीं सर्व तिला इकडून तिकडून मिळालेलींच होतीं. तेवढीच काय ती पुजी होती तिची.

'हे कुठून चोरून तर आणल नाही ना, आबा ?'

दुकानदारान आपल्याच तोऱ्यात प्रश्न केला होता संतोजीला.

'रावसाहेब '

'बरं. जा जा, काही नको सागूस पुढं !'

अपमानाचे तडाखे किती भयंकर असतात हें त्याला चांगलच कळल होत आता !

* * * *

आठच दिवसानतर गिरजेचं लग्न सतोजीनं एका बरेंच वय झालेल्या माणसाशीं–म्हाताऱ्याशीं लावून टाकलं, आणि पाठवून दिली तिला आपल्या घरीं.

त्याच्या श्रान्त मनाला विश्रांति देणारं स्थान देखील अशा रीतीन दूर झाल त्याच्यापासून गिरिजेच्या–खेळकर गिरिजेच्या–लडि-

वाळ स्पर्शानं किती बरं वाटत असे त्याला! अपत्य प्रेमच ते! पण परिस्थितीनं नाडला होता बिचारा! गिरजेसारख्या इवल्याशा मुलीच्या पोषणाचं देखील सामर्थ्य आपल्या अंगात नाही, या एकाच कल्पनेनं त्याला अगदी जर्जर करून सोडलं होतं. त्या म्हाताऱ्या-जवळून पाचशे रुपये घेऊन, आपल्या पोटच्या गोळ्याचा-आपल्या गिरिजेचा सौदा केला होता त्यानं. पण हें अधमपणाचं कृत्य आपण केलं या गोष्टीची जाणीव होती त्याला, पण तो आता मनाचा दुबळा झाला होता. काय करणार? या कृत्यानं त्याच्या हृदयाची आग कशी शमणार? उलट तींत अधिक तेल ओतल्या-सारखं झालं आता.

*　　*　　*　　*

सतोजीच्या आयुष्याला काही निराळंच वळण लागलं होतं. पत्नीचा कायमचा वियोग, गिरिजेशीं झालेली केलेली--ताटातूट, पुढील एकाकी जीवन, या गोष्टींनीं त्याच्या संसाराचं एक भयाण चित्र उभं केलं त्याच्या डोळ्यासमोर. अशा स्थितींत तो भ्याला-दचकला असल्यास त्यांत काय नवल? हें भयाण चित्र डोळ्याना अंधुक दिसावं, गिरिजेच्या करुण किंकाळ्यांनीं आपले कान बधिर व्हावेत, आणि एकंदरींत आपल्या दुःखाचा आपणास विसर पडत जावा, या करिता त्यानं शेवटीं 'सुधाकरा'नं भरून दिलेल्या 'एकच प्याल्या'चा आश्रय करायला सुरवात केली.

अजूनहि त्याचं आयुष्य कसं तरी चाललंच आहे. पण जेव्हां जेव्हां म्हणून त्याच्या अंतःकरणांत कल्पनांची होळी पेटते

त्या त्या वेळी 'एकचप्याल्यातील अमृतानं' तो ती विझविण्याचा प्रयत्न करू लागतो. 'सतेजी, दारू पिण वाइट—घातक आहे बाबा!' असं त्याला कोणी सांगितलं, तर तो ती गोष्ट अगदी मोकळ्या मनान कबूल करतो, पण त्या वेळीं त्याच्या डोळ्यांतून गंगायमुना खळखळ वाहायला लागतात व तो गहिंवरून म्हणतो, "त्याला माझा नाइलाज आहे, क्षमा करा मला!"

# कर्तव्योत्तर प्रेम : ७

" कॉंग्रॅच्युलेशन्स ! प्रभे ! शेवटी हायस्कूलमध्यें भाषणाच्या चढाओढींत पहिलं बक्षीस पटकावलस तर ! फार सुंदर बोललीस तूं, अस ऐकतो ! "

" सुंदर विषयावर सुंदर कुणाला बोलता येणार नाही श्रीकांत ? " प्रभेनें डोळे किलकिले करीत म्हटले

' बरं, पण बोललीस तरी कोणत्या विषयावर ? "

" ' मजुराची आजची स्थिति ' ! श्रीकांताच्या सहवासात इतके दिवस राहिल्यावर मला यापेक्षा आणखी दुसरा कोणता चांगला विषय सांपडणार ?

' शाब्बास ! आम्हाला काही आधी कशाचा पत्ताच लागू दिला नाहींस ! "

" काय कारण तस करण्याच ? मला हे पहिलं बक्षीस जरी मिळाल असल, तरी ते माझं नव्हे ! " प्रभा हसायला लागली

" म्हणजे ? " आश्चर्याने पहात, श्रीकांताने विचारले.

" माझ्या भाषणाकरितां त्याची तयारी ' करविता धनी, वेगळाची ' आहे. त्याचं आहे ते बक्षीस ! " श्रीकांताच्या चेहऱ्या-वर दृष्टि स्थिर करून, मोठ्याने हसत प्रभा म्हणाली.

हे सारे आपल्यालाच उद्देशून आहे, या गोष्टीचा श्रीकां-ताच्या डोक्यात आत्ता कुठे प्रकाश पडला.

"अस्स होय ? ठीक ! खूप केलीस एकूण ! पण प्रभे ...

' तें राहू द्या श्रीकांत, आता, ही माझी ' अल्जिब्रा ' मधील एक ' डिफिकल्टी ' आहे ती सोडवा पाहू आधीं ! "

प्रभेनें आपणास अडलेलें उदाहरण श्रीकाताला दाखविलें.

श्रीकांताने फक्त एकदाच नजर फिरविली त्यावरून, " अ त्यात काय आहे ? साधं ' डिफरन्स ऑफ टू स्क्वेअर्सच उदाहरण आहे तें ! "

" अय्या ! खरंच की ! आधीं कस नाही लक्षात आलं हे माझ्या ? दोन दिवसापासून जरा भ्रमिष्टासारखीच झाले आहे मी ! "

" का ? "

" हे सागतें मी पण त्याबाबतींत भलतीकडेच काही उडी घ्यायची नाहीं अ ! "

" मुळींच नाही ! अगदी तुझ्या गळ्याची शप. .

" ओ नो ! तेवढा माझा पूर्ण विश्वास आहे तुमच्यावर! "

"आपल्या गळ्याची शपथ घेण्याइतका आपलेपणा श्रीकांत दाखवितो, याबद्दल अगदीं आनंदाच्या उकळ्या फुटत असाव्या प्रभेच्या पोटात.— " त्याच असं झालं, तुम्ही त्या दिवशी कल्याणला गेला होता — अगदी त्याच दिवशीं तुमच्या मॅनेजरसाहेबांनीं त्या बिचाऱ्या विठोजीला — मरूच्या नवऱ्याला — बेदम मारलं लाथाबुक्यानीं मधल्या मुटीत ! " प्रभेचे डोळे भरून आले.

" का ? काय गुन्हा केला होता त्यानं असा ? " एकदम दचकल्यासारखे होऊन श्रीकांताने पृच्छा केली

" अत्यंत दमल्यासारखं झाल्यामुळं झोप लागली होती त्याला थोडा वेळ. तेव्हा साहजिकच कामावर हजर व्हावयाला

५–७ मिनिटं ' लेट ' झाला त्याला. झाल ! - तुमच्या मॅनेजरसाहेबांनीं जमदग्नीचा अवतार धारण केला त्यावेळी आणि —

" असं आहे का एकूण ? " ओठावर ओठ दाबून, विचारांत पडल्यासारखे होऊन, मान खाली वर करीत श्रीकांत उद्गारला.

" खरोखर हा एक प्रकारचा मूड आहे. श्रीकांत ! "

" प्रभे, पाणी कुठ मुरतय याची कल्पना आहे तुला ? "

प्रभा प्रश्नसूचक मुद्रेनें श्रीकांताच्या तोंडाकडे पहायला लागली.

" विठोजीची बायको सरू जरा दिसायला चांगली आहे. हें माहीतच आहे तुला. आणि आमच्या मॅनेजरसाहेबाची दृष्टि सर्वसाधारणरीत्या पाहिलं असतां ..... "

" हं खबरदार ! काय बरळता आहां तुम्ही हे ? " प्रभेच्या खोलींत एकदम पाय आपटीत शिरतच दटावणीच्या स्वरात मॅनेजरसाहेब कडाडले.

प्रभा बिचारी एकदम घाबरल्यासारखी झाली.

श्रीकांत अगदीं शांत होता.

" खरं तेंच बोलतो आहे साहेब मी ! " निर्भयवृत्तीने श्रीकांत म्हणाला.

" श्रीकांत, तुम्ही या हलकट मजुरांची अशा प्रकारें बाजू, नेहमी उचलून धरतां आणि त्यामुळं मालकांचं अपरिमित नुकसान होतं याची तुम्हांला जाणीव असावयास...."

"आहे ती चागली, मला ती करून द्यायला आपल्यासारख्या 'बड्या' लोकानी उगीच तकलीफ घ्यावयास नको! ढोंगी लोकाना साऱ्याच जगाच कल्याण पहावस वाटत, पण हातून कृतीच्या नावान मात्र शखच असतात ते!" श्रीकातानें सणसणीत टोमणा मारला.

'तुमच्यासारख्याशी जास्त न बोलणच चांगलं! पण लक्षात ठेवा, या गोष्टीचा जाब तुम्हास लवकरच मालकापुढे द्यावा लागेल!'

"ते माझ मी पाहीन! तुम्हांस नको त्याच्या उटाठेवी!" श्रीकांताने आपल्या नेहमीच्या करारी बाण्यात उत्तर दिलें.

"ठीक आहे होऊंच दे आता दोन हात मग! अच्छा मला गेल पाहिजे. उगीच प्रियकर व प्रेयसी यांच्या गुलगुल गोष्टींत अडथळा नको माझा!" प्रभेकडे पहात मॅनेजरसाहेब म्हणाले.

"शटअप् दॅट् नॉन्सेन्स, यू फूल! गेट्आऊट फर्स्ट! कुणाला विचारून माझ्या खोलींत शिरलात तुम्ही?" प्रभा खवळून म्हणाली.

प्रभेच्या प्रश्नाचे उत्तर द्यायला मॅनेजरसाहेब होतेच कुठे मुळीं तेथे! विकट हास्य करीत त्यानीं आधींच य.पलायन केलें होतें.

"या राक्षसाची चागलीच खोडकी जिरविली पाहिजे मला." श्रीकांत आत्मविश्वासाने म्हणाला, व स्वत शींच काहीं विचार करीत "प्रभे, यातल कांहीं मनाला लावून घ्यायच नाही अ!" असे तिला म्हणत, खोलीतून बाहेर पडला.

श्रीकांत आता काय करणार, याविषयीं प्रभेला काळजी वाटायला लागली. ती बिचारी त्याच्याकडे पहात स्तब्ध उभी होती

* * * *

श्रीकांत दोन वर्षांपूर्वींच पहिल्या वर्गात बी. ए. झाला होता. तो आज मुंबईला एका गिरणीमध्यें सव्वाशे रुपये पगारावर हेड्क्लार्कच्या जागेवर काम करीत होता. गोविंदराव साठे– प्रभेचे वडील– यांच्याकडून त्याची या जागीं नेमणूक झाली होती. कारण ते त्यावेळीं त्याच गिरणीमध्यें मॅनेजरच्या जागीं होते. श्रीकांत हुषार देखणा व कार्यतत्पर असल्यामुळे साहजिकच गोविंदरावाचा तो 'पेट' होऊन राहिला होता. त्याचे गोविंदरावाच्या घरीं नेहमी येणें जाणें असे तेव्हां साहजिकच त्याचीं प्रभेशीं दाट ओळख झाली होती. त्या दोघांना एकमेकांविषयीं विलक्षण ओढ वाटत असे. गोविंदरावाच्या हे लक्षात आल्यावाचून राहिले नव्हतें. पण त्यांनाही श्रीकांतासारखा कर्तबगार जावई.... ...आनंदच होता त्याना त्यात.

प्रभा हल्ली मॅट्रिकच्या वर्गांत होती. श्रीकांताचे इंग्लिश, मराठी व गणित, हे विषय उत्कृष्ट असल्यामुळे त्याची तिला अत्यंत मदत होत असे. संध्याकाळी प्रभेच्या खोलीत कितीतरी वेळ ते निरनिराळ्या विषयांवर वादविवाद करीत असत. श्रीकांताचा बिनचूक कोटिक्रम प्रभेला पुष्कळदा अगदीं निरुत्तर करीत असे त्याची बोलण्याची हातोटी तिला अत्यंत आवडत असे. श्रीकांतापासून अनेक विषयाची माहिती मिळत असल्यामुळें तिनें 'डिबेटिंग' च्या चढाओढीत आत्तापर्यंत कितीक बक्षिसे पटकावलीं होतीं. तिला सभेपुढें फार सुंदर बोलता येत असे.

प्रभा दिसायला अत्यंत सुंदर नसली, तरी तिच्या सर्वांग शरि-रावर एकप्रकारचे मोहक तेज सदैव विलसत असे. त्यामुळे ती अत्यंत आकर्षक वाटे पहाणाराला.

गेल्याच वर्षी गोविंदराव साठे–प्रभेचे वडील–म्हातारपणामुळे सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या जागीं हल्लीच्या मॅनेजर साहेबांची नेम-णूक झाली होती. 'वशिलीझम्' चाच प्रयोग होता हा, त्यांच्या बाबतींत ! त्याचीं क्रूर नजर, फाजील शिस्त, सदैव कामुक दृष्टि, सहानुभूतिशून्य हृदय इत्यादि गोष्टींमुळें त्याच्याविषयीं अनादर व असतोष याच भावना त्याच्या हाताखालच्या लोकात पसरल्या होत्या गिरणींतील लोक याच्याकडे नेहमींच 'खाऊ कीं गिळू' या दृष्टीनें पहात असत.

श्रीकातासारखा सत्याकरिता कराग्री बाण्याने भांडणारा त्याना 'असिस्टट' मिळाला असल्यामुळें पुष्कळदा मजुराचाच फायदा होऊन, मॅनेजरसाहेबाचे डाव फसत असत. मजुराच्या कल्याणाकडे श्रीकाताचे फार लक्ष असे. त्याला या कामात प्रभादेखील प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीतीने बरीचशी मदत करीत असे. या गोष्टींचा परिणाम मात्र असा झाला होता कीं, त्या दोघाचा एकेक शब्द न् शब्द प्रत्येक मजूर मोठ्या आदराने झेलून धरायला तयार असे. या एकं-दर प्रकाराने मॅनेजर साहेबाची मर्जी श्रीकातावर बरीच खप्पा असे. असें होण्याला आणखी एक कारण होतें. त्यांचा प्रभेवर डोळा होता. श्रीकांत व प्रभा याची इतकीं दाट मैत्री असणें त्याला साहजिक खपत नसे. प्रभा आपल्याला मिळावी म्हणून त्यानीं जंग जंग

पछाडले होते, पण यश येण्याचे चिन्ह दिसेना. त्यानीं मालकाजवळहि श्रीकांताविषयीं कांहीं कमीं कागाळ्या केल्या नव्हत्या ! पण मालकापाशी गोविंदराव सान्याचे बरेच वजन असल्यामुळे मॅनेजर साहेबाची तेथेंहि विशेषसी डाळ शिजत नसे. प्रभेशीं बोलायला मिळावे, आपला अधिकार तिच्यापुढे प्रदर्शित करतां यावा, कसेही करून तिच्यावर आपल्याला ' इंप्रे···· मारायला मिळावे, म्हणून मॅनेजरसाहेबाची स्वारी, गोविंदरावाच्या घरीं त्याना सल्ला विचारण्याच्या निमित्तानें बऱ्याच वेळा जात असे व प्रभेशी– ती एकटी भेटल्यास–खूप बोलण्याचा प्रयत्न करीत असे. पण प्रभा कसली वस्ताद ! ती येऊन जाऊन श्रीकांताचा विषय काढून. व त्याची गनसोक्त स्तुती करून मॅनेजरसाहेबाच्या कमीपणाच त्याच्या नजरेपुढे आणून देण्याचा प्रयत्न करीत असे. अशावेळीं ' बिचारे ' मॅनेजरसाहेब विषण्ण अंतःकरणाने आपल्या घराची वाट धरीत असत.

आजहि संध्याकाळीं ते ' असेच ' येऊन बसले होते गोविंदरावांशीं बोलायला. गोविंदराव जरी त्याच्याशीं बोलत होते, तरीपण मॅनेजरसाहेबाचे सारे लक्ष जवळच्याच खोलींत चाललेल्या, श्रीकांत व प्रभा याच्या संभाषणाकडे होते. त्याच्या भाषणात स्वतःच्या नावाचा उल्लेख येताच–व तोहि वाईट रीतीनें–स्वारी ताडकन् उठून त्या खोलींत शिरून, श्रीकांत व प्रभा याच्याशीं वरीलप्रमाणें बरळून बाहेर पडली होती. ' उथळ पाण्याला खळखळ फार ' असते, ती अशीच !

* * * *

" श्रीकांत, तुम्ही माझं अन्न खाऊन, माझ्याच विरुद्ध असल्या प्रकारच्या गोष्टी कारस्थानं करीत असाल याची मला आत्तांपर्यंत कल्पनाच नव्हती नीटशी ! " गिरणीचे मालक बिहारीलाल शेट कोपाविष्ट पण खिन्न स्वरात श्रीकांताशीं आपल्याच खोलींत बोलत होते.

" मीं असं केलं तरी काय, हे आपण मला स्पष्टपणें सांगाल काय ? " आत्मविश्वासाने श्रीकांत बोलत होता

" ज्याला त्याला स्वतःचं मन चांगलच कळत असतं ! हातच्या कांकणाला आरसा कशाला हवा ? " शेटजी म्हणाले.

" म्हणजे ? "

" मला जास्त कांहींच बोलायचं नाही. मॅनेजर साहेबानी काल सांगितलेल्या गोष्टी अगदींच खोट्या कशा मानूं मी ! मोठ्याशा दुधाच्या भांड्यात मिठाचा एवढासाही खडा पडला तरी सगळ्या दुधाची नासाडी ही ठरलेलीच ! तद्वतच आहे हे ! मला आधी हे सांगा, तुम्ही मजुरांचा कैवार इतका का घेतां ? "

" ते गरीब असतात, आणि त्यांचा कैवार इतर कुणी लवकर घेत नाही म्हणून ! " श्रीकांतानें ठासून उत्तर दिलें.

" आह्माला त्यांची कांहीं काळजीच नाहीं असं समजता तुम्ही ? मानवाला मानवप्राण्याविषयीं प्रेम सहानुभूति वाटणार नाहीं, तर मग कुणाविषयीं वाटेल ? "

" माफ करा शेटजी ! हे तत्व फक्त बोलण्यांत पण प्रत्यक्ष कृतीचा तेथे मागमूसही नसतो, त्याला काय इलाज ? "

" अस्सं होऽय ?"

" हो असंच ! अहो जास्त कशाला ? परवाचच साधं उदाहरण घ्याना -- तो आपला विठोजी -- सरूचा नवरा, मधल्या सुटींत त्याला बरं नसल्यामुळें नुसता थोडावेळ झोपला, पण त्याकरिता मॅनेजरसाहेबाकडून त्याला मिळालेली शिक्षा किती क्रूर, राक्षसी होती !" शेटजी नुसते श्रीकांताकडे पहात होते.

" शेटजी, यावरून दिसून येत ते हेंच कीं, मालक आणि नोकर हा संबंध दोन जीवामध्यें येताच, मानवी सहानुभूति, प्रेम, आदर, बंधुभाव या साऱ्या दुरून गोजिरवाण्या दिसणाऱ्या गोष्टींना ' मालक ' म्हणवून घेणाऱ्या व्यक्तीकडून बहुधा मूठमातीच दिली जाते. आणि तेथे एकच एक भावना वास करीत असते - आणि ती म्हणजे--' आह्मी मालक, व तुम्ही भावनाशून्य, मेलेल्या मनाचे गुलाम ! ' या पलीकडे काऽहीं नाहीं. डोंगर दुरूनच साजरे असतात शेटसाहेब !" श्रीकांत आवेशानें बोलत होता.

" पण आमच्याही पोटापाण्याचा प्रश्न आमच्यापुढें आहेच कीं नाहीं ?"

" अर्थात् ! कोण नाकबूल करील हे ! पण आधींच भरलेल्या पोटाकरिता, इतक्या लोकाच्या पोटाला चिमटा घेणं, याला मी शुद्ध अन्याय म्हणतो. शेटजी, मी आपला नोकर आहे. आपल्याला या गोष्टीकडे लक्ष देण्यास कदाचित् वेळ मिळत नसेल म्हणून........ "

"श्रीकांत, मला तुमच हें कोरडं तत्वज्ञान--हे वकिली

डावपेच नको आहेत. मी साऱ्या गोष्टीचा विचार केला आहे. तुम्हाला स्पष्टच सांगतो, आमच्याच सेवेत तुम्हाला रहायचं असेल तर या गोष्टी पहिल्यान बाजूला सारल्या पाहिजेत ! "

" शक्य नाही ! " श्रीकांत एकदम उसळून म्हणाला, ' हा घ्या माझ्या कामाचा राजीनामा ! असं काहीतरी होईल, याची कल्पना होतीच मला, आणि म्हणूनच घरून येताना हा कागद खिशातच आणला होता मी ! "

शेटजींच्या उत्तराची वाट न पाहता श्रीकांत उठला.

" का, माझं म्हणणं नाही येत ध्यानात ? "

" कसं येईल ? धडधडीत अन्यायाला न्यायाचं स्वरूप कसं देता येईल ? नाइलाज आहे शेटजी माझा ! ठीक आहे. येतो मी आपली परवानगी असावी! "

श्रीकांत शेटजींना नमस्कार करून तडक चालता झाला. शेटसाहेब मात्र आपल्या खिडकींतून त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो दिसेनासा होईपर्यंत पहातच होते. त्यांना काय वाटत होतं कुणास ठाऊक !

*　　*　　*　　*

प्रभेचे मजुरांपुढील भाषण साऽऽरखे पाऊण तासपर्यंत चाल्लच होते. सभेतील एक लहानसें पोरदेखील हू का चू करीत नव्हते. प्रभेने आपल्या भाषणानें श्रोत्यांचीं हृदयें पूर्णपणें काबीज केली होतीं- तीं इतकी की, प्रभा जो मार्ग दाखवील, तो आचरण्यास ते एका पायावर तयार असल्याचें दिसून येत होते. भाषण

कौशल्याची सीमाच झाली होती तिच्या आज! प्रभा आता शेवट कसा करते हे ऐकण्यास अत्यंत अधीर झाले होते तिचे श्रोते शेवटी प्रभा त्या पायरीला येताच–' मजूर बंधूनो, तुमच्यापुढे– श्रीकांताच्या राजीनाम्याची हकीगत मी आता निवेदन केलीच आहे त्यांनी तुमच्या करिता रक्ताच पाणी केल, हे तर कबूल ना?"

' कबूल कबूल ' सभेतून जोरात उत्तर आले ' त्यांनी आजपर्यंत जिवापाड मेहनत घेतली ती तुमच्याच कल्याणाकरिता! मॅनेजर-साहेब व मालक यांच्याशीं ते आजपर्यंत वाईटपणा घेऊनहि त्याचा घुस्सा सहन करूनहि–धैर्याने भांडले, ते तुमच्याच हिताकरिता! इतकच नाही तर त्यांनी आपल्या नोकरीवरहि पाणी सोडलं, तेही तुमच्याचकरिता–गिरणींतील दीन–गरीब मजुरांकरिताच! तुम्ही त्यांच्या उपकाराची फेड कशी करणार? याच उत्तर मला तुमच्या-कडून आत्ताच हव आहे. मी जास्त बोलू इच्छित नाही खरी परि-स्थिति तुमच्यापुढे मी ठेवली आहेच तेव्हा —"

"आम्ही योग्य तेच करणार! आपण निर्धास्त असाव."

मजुरांचे एकदम एकदोन पुढारी उठून प्रभेला आश्वासन देत म्हणाले

प्रभेनें त्यांना त्या भावनेच्या भरात ' ठीक आहे ' असें मोठ्यानें म्हणून ती एकदम खाली बसली

टाळ्यांच्या कडकडाटात प्रभेचे व्याख्यान संपले!

*  *  *  *

दुसऱ्या दिवशीं गिरणीच्या मजुरांनी संप पुकारला. ' श्रीकांत गिरणींत पुन्हां कामावर येतील तरच आम्ही काम करू, नाहींतर

नाहीं '— हाच सर्वांचा हट्ट होता आपल्या व्याख्यानाचे फळ आपल्याला मिळाले या विचाराने प्रभेला अत्यंत आनंद झाला होता. तो दिवस गेला पुढला दिवस — तिसरा दिवसहि गेला.-- तरी कोणत्याहि प्रकारच्या तडजोडीचे चिन्ह दिसेना प्रभेला अत्यंत काळजी वाटायला लागली श्रीकांताचीहि तीन-चार दिवसात भेट नव्हती आपल्या वडिलांना गोविंदरावांना- काही विचारावे, तर आत्ताशा तीन दिवसापासून त्यांचा रात्री बारा बारा वाजे-पर्यंत पत्ता नसायचा घरात स्वत दोन दिवसापासून आजारी असल्यामुळे बाहेर पडणे तिला अशक्य होते मोठी चमत्कारिक स्थिति झाली होती तिची.

संध्याकाळीं ती आपल्या खोलीत काहीं तरीं वाचीत पडली होती. हळूच कुणीतरी दार उघडल तिच्या खोलीच. ती एकदम घाबरून उठून बसली आपल्या बिछान्यावर.

बिहारीलाल शेटजी व श्रीकांत एकत्र आणि पुन्हा हसत तिच्या खोलींत आलेले पाहून तिला मोठेच आश्चर्य वाटायला लागले त्यांना ' या ' म्हणून म्हणावयाचे देखील भान राहिले नाहीं तिला.

श्रीकांतानें शेटजींना खुर्ची दिली बसण्यास.

तितक्यात गोविंदराव देखील हजर झाले ते देखील हंसतच होते.

काय गौडबंगाल आहे, काहीं कळेना प्रभेला.

शेटजीनीं बोलायला सुरुवात केली .

" फार कडक शिक्षा केली, प्रभाताई तुम्ही आम्हाला ! "

"हं असंच व्हायला पाहिजे आहे काहीतरी! त्याशिवाय "

"आणि आमच्या मॅनेजरसाहेबाना तर बेपत्ताच व्हाव लागल त्या दिवशी रात्री त्याचा काही केल्या शोध लागत नाही. मोठ पेचांत धरलंय तुम्ही मला!" काळजीच्या स्वरात शेटजी म्हणाले. पण गालातल्या गालात ते हसतच होते.

"पेंच कसला आला आहे यात? दुसऱ्या कुणाला मॅनेजर नेमा ऽऽ!" प्रभा श्रीकांताकडे पहात म्हणाली

"कुणाला नेमावं हाच तर विचार पडलाय मला!"

"हात्तिच्या! त्यात काय कठीण आहे? सांगू कां मीं? ..."

"सांगा बुवा! –तुमचं वाक्य आज 'वेदवाक्य' धरून चाललच पाहिजे मला–!"शेटजी उद्गारले

"श्रीकांताना!" प्रभेने जरा लाजतच श्रीकांताचे नाव सुचविले.

"छे, छे! त्याची एक फार मोठी अट आहे–आणि ती मी कशी पूर्ण करणार?"

शेटजी, गोविंदराव, श्रीकांत हसायला लागले मोठ्याने.

"अट? आणि ती कसली बाई?" आपल्या नाजुक हनुवटीवर आपली करंगळी टेंकत प्रभेनें विचारले

"ते तुमच्यावांचून काम करायला तयार नाहींत त्या जागीं."

"म्हणजे?"

"तें मी काय सांगणार? विचारा त्यानाच!"

श्रीकांत याच वेळी गॅलरीत निसटला.

आत्तां कुठे प्रभेच्या डोक्यांत प्रकाश पडला

" इश्श ! हे काय हो , शेटजी ! भलतीच आपली थट्टा!" रागाच्या आविर्भावानें प्रभा बोलत होती.

" प्रभे, तुझं श्रीकांताशी ....." गोविंदरावाचे वाक्य अपूर्णच राहिलें.

त्यांच्या घरापुढें बराच मोठा गलबला ऐकू यायला लागला.

शेटजींनीं व प्रभेने खिडकींतून डोकावून पाहिलें खाली.

" काय ! ठरलं मग शेटजी, श्रीकांतांचं लग्न प्रभाताईंशी ?" जमावातील एकजण मोठ्यानें ओरडून रस्त्यावरूनच विचारूं लागला.

" अरे, तें काय सांगायला पाहिजे ? चला, आलोच आम्ही सर्व गिरणीच्या मैदानावर !" शेटजी म्हणाले.

मजुरांचा तो जमाव आनदाने ओरडत उड्या मारीत गिरणीकडे चालता झाला. शेटजी अभिमानाने त्या लोकाकडे पहात होते.

" चला प्रभाताई !" शेटजींनीं मागें मान वळविली. प्रभा त्या खोलींतून दुसऱ्या खोलींत केव्हांच पसार झाली होती.

# दरिद्री लक्ष्मी : ८

विजया अशा अनपेक्षित रीतीनं एकाएकी नाहींशी झाल्या-मुळें लक्ष्मीबाईंना खूपच धक्का बसल्यासारखं झालं होतं. त्या आज दोन दिवसांपासून विजयेच्या येण्याकडे डोळे लावून बसल्या होत्या. पण शेवटीं निराशाच पदरीं आली होती त्यांच्या !

त्या आजकाल फारच बेचैन झाल्या होत्या. काय करावं न् काय नाहीं हें मुळींच सुचेना त्यांना. पश्चात्ताप व्हायला लागला होता त्यांना आपल्या कठोर बोलण्याचा ! ' लहानशी चूक, आणि तिच्याकरितां आपण विजयेला कित्ती कित्ती टाकून बोलली परवा ! माझी विजू— विजया एक पंधरा वर्षाची पोर— एक तरुण को-वळी विधवा—.... ' पुढले विचार सहन होईनात लक्ष्मीबाईंना. त्यांना रडें कोसळले अगदीं !

" आई तुला रडायला ग काय झालं ? " शकून—लक्ष्मी-बाईच्या धाकट्या मुलीनं प्रश्न केला.

" कांहीं नाहीं बाळ ! "

लक्ष्मीबाईंनीं शकूला आपल्या जवळ ओढलं आणि प्रेमानं कुरवाळायला लागल्या त्या तिला. लक्ष्मीबाईचे अश्रु शकूच्या गालावर —डोक्यावर पडायला लागले; शकूनं देखील आपल्या आईचं अनु-करण करायला सुरवात केली.

*　　　　*　　　　*

लक्ष्मीबाई या वासुदेवराव पेन्शनर यांच्या पत्नी. विजया व शकू या दोन त्यांच्या मुली. वासुदेवरावांना महिन्याकाठीं अठरा रुपये काय तें पेन्शन मिळत असे. एवढ्याशा रकमेंत ते आपला संसार

मोठ्या कष्टानं कसातरी चालवीत असत. गेल्या वर्षीच विजयेच लग्न सदानद या नावाच्या तरुणाशीं तो हृद्‌विकारानें पीडित असतांना-देखील झालं होतं. त्याकरिता काय काय दिव्यांतून पार पडावं लागल होत हे त्याचं त्यांनाच माहीत ! गरीब ‘ मुलींच्या ’ दरिद्री ‘ बापांनाच ’ त्याची कल्पना असणार !

विजयेच्या लग्नानंतर अवघ्या तीनच महिन्यांनीं वासुदेवरावांनीं इहलोक सोडला होता.

मोठीच आपत्ति ओढवली होती आता लक्ष्मीबाईवर. आपण व आपली धाकटी मुलगी शकू यांचं आतां कसं चालणार पुढं ? याच विवचनेंत पडल्या होत्या त्या. शकू नाहीं तरी आज अकरा वर्षाची होती. तीनचार वर्षांनंतर तिच्याहि लग्नाचा प्रश्न लक्ष्मी-बाईपुढ होतांच ! – पण आता त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहाची फिकीर होती !

त्यांनीं लोकांच्या घरी धुणी, भांडी, दळण इत्यादि हलकीं-सलकी कामें आताशा पत्करली होतीं. वार्धक्यामुळें होत नसे त्याना हें ! पण नाइलाज होता त्यांचा. ‘ ~ ी ’ कडून काम होत नाहीं असें ह्मणून त्यांना कामहि कोणीं फारसं देत नसे. सात आठ रुपये महिना मिळत असे त्याना मोठ्या मुष्किलीनं ! तेव्हां नांवाच्या या ‘ लक्ष्मीला ’ आज हातीं झोळी धरल्यावाचून गत्यंतर नव्हतं !

* * *

सकट यायला लागली ह्मणजे चोहोबाजूंनीं येतात ह्मणतात

अगदीं तशीच झाली होती स्थिति लक्ष्मीबाईंची आता ! वासुदेव-रावाच्या निधनानंतर आणखी फक्त चार महिन्याच्या अवधींनच विजयेचं सौभाग्य नष्ट झाल ! विजयेचा पति एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून चालता झाला होता या जगाचे पाश तोडून ! तेव्हां घरचें असे कोणीच न राहिल्यामुळें विजया आपल्या आईकडेच येऊन राहिली होती.

* * *

एके दिवशीं काय झालं कीं, लक्ष्मीबाईंना शेजारच्याकडून एका भांड्यात कांहीं शिळं अन्न मिळाल होतं. मधूनमधून त्यांच्यावर असली ‘ मेहेरबानी ’ होत असे शेजारपाजारच्या लोकांकडून ! त्या भांड्याला विजयेचा न कळत धक्का लागून आतील सा ऽ रं काही सांडलं गेल जमिनीवर ! दारिद्र्यानें गांजलेल्या लक्ष्मीबाईंना सहन नाहीं झालं हें ! त्यांनीं खूप तोंडसुख घेतल त्या दिवशीं विजयेवर.

विजया त्या दिवशीं जेवली नाहीं. आतां आपल्या वैधव्याची व त्यामुळें झालेल्या आपल्या हीनदीन दशेची अत्यत तीव्र वेदना — जाणीव व्हायला लागली तिला सबंध रात्र तिनं रडून काढली आणि मनाशीं काहींतरी ठरविल्यासारखं करून सकाळीं उजाडण्या-पूर्वीच मोठ्या जड अंतःकरणानं आपल्या माहेर घराला रामराम ठोकला तिनं.

अगदींच निराश्रित झाली ती आतां !

* * *

आणखी एक वर्षानंतरची गोष्ट !

हिवाळ्याचे दिवस. काळोखाची रात्र, सुमारें दहाची वेळ, थंडी सपाटून पडलेली. कुणी बाई रस्त्यानं कांहींतरी बरळत, मध्येंच कुणाच्या दाराशीं भिक्षा मागत, कुणी दिसलं तर त्याकडे वेडंवाकडं तोंड करीत, नानाविध चाळे करीत जात होती.

तिचे केस विसकटलेले होते. आणि चर्या कशीशींच दिसत होती. ती वेडी असावी अशी पाहणाराची सहज कल्पना झाली असती.

हो, खरोखर ती वेडीच होती !

ती लक्ष्मीबाईच्या दाराशीं आली. तेव्हां ती कसलंतरी गाणं ह्मणत होती. घरात यावेळी शकू एकटीच होती. लक्ष्मीबाई अजून आपलं काम आटोपून आल्या नव्हत्या घरी. त्या वेडीचे शब्द शकूच्या कानावर पडताच, तिला एकदम दचकल्यासारखं झालं आश्चर्यानं ! तिला तो आवाज परिचित वाटला. ती धांवली एकदम दाराकडे. खाडकन् दार उघडलं तिनं !

दार उघडतांच त्या वेडीचं गाणं थांबलं. थंडीमुळें काकड-ल्यासारखं करून, ती ' आई ग ऽ आई ग ऽ ऽ ' ह्मणून मोठमोठ्यानं ओरडत होती. दोनतीन मिनिटें शकू अगदीं निश्चल उभी होती दारात, तिला अत्यंत घोटाळल्यासारखं झालं होतं. ती त्या बाईचा आवाज कुणाच्या तरी आवाजाशीं ताडून पहात असावी.

आता खात्रीच झाली तिची कशाबद्दल तरी !

एकदम ती ' ताई -- विजू ताई — ह्मणून हाक मारायला लागली त्या वेडीला !

त्या वेडीकडून-त्या भिकारणीकडून ( होय भिकारीणच नव्ह-ती का ती ! ) – उत्तर मिळालं नाहीं. थंडीमुळे तिचं थरथरण स्पष्ट दिसत होतं शकूला.

शकूला तिची अत्यंत कींव आली. आपल्या अंगावरची कितीतरी ठिकाणीं ठिगळ दिलेली शाल तिनं एकदम त्या वेडीच्या अंगावर फेकली.

वेडीनं ती एकदम उचलली. आपल्या अंगाभोंवती कशी-तरी गुंडाळली आणि पळाली एकदम कुठल्याकुठं.

ती लांब उभी राहून शकूकडे पहात होती.

शकू ' ताई - ताई - ताई ' ह्मणून सारखी ओरडतच होती त्या वेडीला काय त्याचं ?

शकूला तिचं हंसणं काय तें ऐकूं येत होतं.

*     *     *

" कुणाला हाक मारते आहेस ग ? " मागून येऊन लक्ष्मीबाईंनीं प्रश्न केला.

त्या मागल्या दारानं आंत आल्या असाव्या.

शकू अजून ओट्यावरच उभी असून दूरवर उभ्या अस-लेल्या तिच्या ताईकडे पहात होती.

" शकू, अग तू कुणाकडे पहात आहेस ? थंडी नाहीं कां वाजत तुला ?.... आणि तूं आत्तां हाका कुणाला मारीत होतीस ?"

शकू काहींच बोलली नाहीं. ती आंत आली. तिचे डोळे पाण्यानें भरून आले होते नकळत.

लक्ष्मीबाईंचा पुन्हा आपला तोच प्रश्न !

शकूचही पुन्हा आपल तेच 'मौन'!

लक्ष्मीबाईंना राग आला थोडा यावेळीं. शकूचा रागच काय, आगींत तेल ओतल्यासारखंच झाल. त्यांचं आज जरा अंग ठणकत होत. तेव्हां उशीर झाला होता त्यांना कामाला जायला त्यामुळे त्यांना दोन तीन ठिकाणीं खूप बोलणीं बसली होतीं

नाइलाज होता त्यांचा त्या ठिकाणी !

दारिद्र्य हें असंच असत ! नाहींतरी कितीक दिवशी त्यांना घर मालकिणीच्या — किंवा स्वयंपाकीण बाईच्या अथवा बोवाच्या हलगर्जीपणामुळे कितीतरी वेळ तिष्ठत बसाव लागत असे भाडीं रिकामी होण्याची वाट पहात ! पण बोलाव कुणाला आणि कसं ?

गरीब लोकावर सर्वांचा अधिकार असतो, पण त्याचा मात्र कुणावरही नसतो — प्रत्यक्ष आपल्या नातलगांवरही नसतो !

लक्ष्मीबाईंना त्या लोकाचा असा राग आला होता यावेळीं कीं .. पण गरीबाला कुणावरही रागावून चालत नसत, त्यांना मूग गिळून स्वस्थच बसायचं असतं ! त्यांची गरीबी जेथे तेथें त्यांची मुस्कटदाबी करीत असते !

लक्ष्मीबाई देखील अशाच रागात परत आल्या होत्या घरीं. त्यांच्या मनात राग धुमसतच होता.

शकू त्यांच्यापुढ खाली मान घालून थंडीमुळें व त्याचबरोबर भीतीमुळें कांपत उभी होती.

" शकू, जा तुला नाहीं सांगायच तर नको सांगूस काहीं ! –पण थंडीनं अशी कांपत उभी राहूं नकोस ! तुझी शाल पांघर आणि नीज स्वस्थ. जा ! "

शकू आपल्या अंथरुणावर जाऊन तशीच पडली.

" अग, तुझी शाल घे कीं पांघरायला ! मी देऊं कां आणून, कुठं आहे ती ? " लक्ष्मीबाई शकूची शाल तिच्या नेहमींच्या जागेवर पहायला लागल्या —– इकडे शोध तिकडे शोध . .. ...

" कुठं आहे ग तुझी शाल ? " कटाकून लक्ष्मीबाईंनीं विचारलं.

शकूकडून एक नाहीं न् दोन नाहीं !

" आज तोंड उघडायचं नाहीं म्हणून ठरवलं आहेस कीं काय तूं ? "

लक्ष्मीबाईंचा ' पारा ' इतकी थंडी पडली होती तरी आता भलताच चढला होता.

शकूला भीति वाटायला लागली. तिला आतां बोलल्यावाचून गत्यंतरच नव्हतं.

" मी ती देऊन टाकली " शकूनं भीतभीतच उत्तर दिलं.

" काऽऽऽय ! देऊन टाकली ? अन् कुणाला ? "

" त्या वेड्या बाईला. ? "

" कोणत्या बाईला ! "

शकू अन् लक्ष्मीबाई ओटीवर आल्या.

" तीऽऽबघ, तीऽऽबाई — "

ती बाई पूर्वी उभी होती त्या जागेकडे शकूनें बोट केलें.

" अग, तिथंतर कांहींच दिसत नाहीं ! "

खरंच तिथ कांऽहीं नव्हत यावेळीं ! ती वेडी कुठंतरीं निघून गेली होती !

शकू देखील निरखून पाहूं लागली. तिचा चेहरा गोरामोरा झाला.

झालं आता आगींत खूपच तेल ओतल्यासारखं झालं !

लक्ष्मीबाईंना विलक्षण राग आला एकंदर घडलेल्या गोष्टीचा त्यांनीं शकूवर ' तोंडसुख ' व ' हातसुख ' खूप घेतलं त्यावेळीं !

कल्पनातीत मार बसला शकूला ! शकूकरितां दुसरं पांघरूण कस मिळावयाच हीच विवंचना पडली असेल लक्ष्मीबाईंना ! आपल्या पोटच्या कोवळ्या गोळ्याची थोडीही कींव आली नाहीं त्यांना !

त्या निष्ठुर होत्या कां ?

नाहीं !

हा दोष त्याचा नव्हता ! --

तो त्यांच्या गरिबीचा — त्याच्या कंगालपणाचा दोष होता !

* * *

दुसरा दिवस ! तशीच काळोखी रात्र ! ! तीच वेळ ! तितकीच थंडी ! ! !

शकू बाहेर निघाली — नव्हे - शकूला शेजारच्या दोघा तिघानीं बाहेर आणलं ! ओटीवर आणखी दोन तीनजण बसले होते.

शकूनं ' ताई - ताई - बिजूताई - विजयाताई '— म्हणत इह लोकचा निरोप घेतला होता !

भारीच आश्चर्याची गोष्ट नाही कां ! पण घडली होती खरी !

शकूच्या मागोमाग लक्ष्मीबाईही मोटमोठ्यान आक्रोश करीत बाहेर आल्या. बाहेर सर्व तयारी होतीच ! लक्ष्मीबाई थेट स्मशानांत पळत गेल्या एखाद्या वेडीप्रमाण --

*　　　　*　　　　*

मार बसला त्याच रात्रीं शकूला सण्पाटून ताप भरला एकांएकीं ! तिच साऽऽरं अंग सुजून गेल होतं -- ती शुद्धीवरच नव्हती अगदीं मरणघटकेपर्यंत ! तिलासुद्धा 'वेड' लागल्यासारखं झालं होतं ! 'ताई - ताई' म्हणत - तिन प्राण सोडला होता तिच्या ताईच्या नांवाचा जप करीत ! 'दरिद्रि' लक्ष्मीबाईंना शकूकरितां काय करता येण्यासारख होत ?

कांहीच नाहीं ! शक्य नव्हत त्याना काहीहि !

कारण ?

त्याच दारिद्य -- त्याची गरिबी !

*　　　　*　　　　*

स्मशानांत शकूच प्रेत आणून ठेवल. जवळूनच एक ल्हानशी नदी वाहात होती. एकजण पाणी आणावयाला गेला. त्या ठिकाणीं एक डोह होता. तो आपली कळशी पाण्यांत घालायला लागला. कळशी कशाला तरी अडली.

तें एक प्रेत होतं काठाशीं आलेल !

याला दचकल्यासारखं झालं !

त्यानं एकदम किंकाळी फोडली. सारेचे सारे धावत गेले तेथें कंदील घेऊन !

लक्ष्मीबाई देखील आल्या तेथें! दोघांनीं त्या प्रेताला जमिनीवर आणून ठेवलं भीतभीत.

तें एका तरुणीचं प्रेत होतं!

आता काय करावं, हें कुणालाच सुचेना. सारे एकमेकांच्या तोंडाकडे पहात होते कितीतरी वेळ!

लक्ष्मीबाई मात्र खूप निरखून निरखून त्या मुलीच्या तोंडाकडे पहात होत्या. काय झालं कुणास ठाऊक त्याना एकदम जोराचा हुदका आला—आणि--" माझी बाळी ती ऽऽ--" असं म्हणत, त्या एकदम बिलगल्या त्या प्रेताला. ' विजू, विजू, विजये, बाळे, काय केलंस तू हें असं? कुठं होतीस इतके दिवस तू बाळ? बोल ना मी चांडाळीण तुला किती किती वाईट बोलले त्या दिवशीं– मला क्षमा-- - - "

लक्ष्मीबाई मोटमोठ्यानं आक्रोश करायला लागल्या

त्यांची इतके दिवस हरवलेली विजयाच होती ती!

त्या जागेपासून दहापाच हातावर आणखी काहींतरी फड–क्यासारखं पडलं होतं. त्याकडे लक्ष जातांच एकानं तिथं जवळ जाऊन पाहिलं तें।

' अरेच्या, इथं एक शाल पडली आहे '! तो आश्चर्यानें उद्गारला.

त्यानं ती शाल भीतभीतच जवळ आणली आपल्या 'शकूची' ती शाल म्हणून लक्ष्मीबाईंनीं तीं तावडतोब ओळखली. त्यांनीं ती एकदम हृदयाशीं धरली. ह्याच शालीकरतां शकूला इतका मार बसला

होता आदल्या दिवशीं रात्रीं. ओटीवर उभी राहून शकू 'ताई - ताई' म्हणून कां हांका मारीत होती– या गोष्टीचा आत्तां उलगडा झाला असावा त्याना.

लक्ष्मीबाईंनी खूप खूप शोक केला.

वेड लागल्यासारखं झाल त्यांना अगदीं.

शकू व तिची लाडकी ताई ' विजया ' या दोघींना एकाच चितेवर निजविण्यांत आलं.

कडेलोट झाला होता लक्ष्मीबाईंवर आतां दुःखाचा !

चिता आतां पेटणार तोच—'नको' नको — माझी शकू - माझी विजू आहेत ना तिथं निजू द्या त्यांना स्वस्थ ! हात लावू नका कुणीच त्या पाळण्याला. पाहिजे तर ही शाल घाला त्यांच्या अंगावर!!

अगदीं वेडाचीच लहर— !

लक्ष्मीबाई ओरडतच पळाल्या कुठल्याकुठं ! आलेल्या लोकांनीं त्यांना धरण्याचा प्रयत्न केला पण अंधारांत त्या कुठल्याकुठं नाहींशा झाल्या होत्या

* * *

कुणी म्हणत , अजूनही त्या ठिकाणीं कुणी एक ' वेडी '— केव्हांतरी रात्रीं—अपरात्रीं येऊन बसते व ' माझी शकू—माझी बाळी किती खुळी !- माझी विजू- माझी विजया—माझी बायडी—- किती वेडी ! !—-— " असं कांहींतरी वेडाच्या भरांत ओरडत असते.

बिचाऱ्या 'दरिद्री लक्ष्मी' वाचून दुसरी ती कोण असणार ?

समाप्त